आंतरभारतीय पुस्तकमाला

आगगाडी

चंद्रवदन महेता

अनुवाद

माया चिटणीस

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

पहिली आवृत्ती: 1977 (शके 1898)
तिसरी आवृत्ती 1990 (शके 1912)

Original Title — Aagagadi (*Gujarati*)
Marathi Translations — Aagagadi
रु. 10.00
संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, ए-5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली-110016 द्वारा प्रकाशित.

भूमिका

क्षणे क्षणे यन्नवतामुपैति
तदेव रूपं रमणीयताः।

"क्षणा क्षणाला जे नवनवीन रूप धारण करते तेच रूप रमणीय होय."

महाकवी माघाने या ओळीत कलेची सुंदर व्याख्या केली आहे. कलेच्या गाभ्यात लपलेले सौंदर्य नव्या नव्या रूपाने आपल्या समोर येते, तेच पुन्हा पुन्हा पहायला आवडते, त्याच बरोबर पहाणाऱ्याला किंवा ऐकणाऱ्याला रसानुभूती देत राहते तीच खरी कला. यामध्ये मग चित्र असो, काव्य, संगीत किंवा शिल्प स्थापत्य असो. परंतु खरा कलासृजक आपल्या आंगिक दिव्य शक्तीशी संपर्क साधून प्रथम स्वतःच्या अंतरंगात पहातो आणि नंतर त्या कृतीला बाह्य स्वरूप देतो. नाटयकला पण त्याच दिव्य शक्तीचा आविष्कार आहे.

'काव्येषु नाटकं रम्यम् ।' काव्य श्रवण केल्याने जो आनंद मिळतो त्यापेक्षा तेच काव्य जेव्हा दृश्यरूपात समोर येते तेव्हा सामाजिक आणि रसप्रचुर भावुकतेच्या प्रदेशात घेऊन जाते.

एकशेबावीस वर्षांच्या पटावर पसरलेल्या गुजराती नाटयकलेचे आपण दोन विभाग पाडू शकतो.

1 व्यावसायिक रंगभूमी

2 अभिनव रंगभूमी

व्यावसायिक रंगभूमीची सुरुवात पूर्व बंगालात "जात्रा", उत्तर भारतात 'नौटंकी', 'स्वांग' किंवा 'भांड', 'राजस्थानात 'झूमर', बिहारमध्ये 'विदेशिया', महाराष्ट्रात 'लावणी' आणि 'तमाशा', त्याचप्रमाणे गुजरातेत 'भवाई' आणि 'रामलीला' या स्वरूपात आढळते. परंतु या सर्वांचे स्वरूप होते लोकनाट्याचे. ते नाटक नव्हते. परंतु यापूर्वीही मध्यकालीन युगात भरतनाट्यशास्त्र प्रणीत संस्कृत नाटके होत असत, आणि लिहिली जात असत. युरोपमध्ये शेक्सपिअरच्या नाटकांनी विदेशी रंगभूमीला स्थैर्य प्राप्त करून दिले होते. ब्रिटिश साम्राज्याची वसाहत समजल्या जाणाऱ्या कलकत्ता शहरात इंग्लंडहून नाटक मंडळया येत असत. आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन सर्वात प्रथम काही उत्साही पारशी लोकांनी 1852 मध्ये मुंबईत गुजराती रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली. दादाभाई नवरोजी आणि डॉक्टर भाऊ दाजी यासारख्या अत्यंत थोर पुरुषांचा आशीर्वाद त्यांना मिळाला आणि जगन्नाथ शंकरशेटनी थिएटर बांधून दिले. त्यानंतर या नाटक मंडळीच्या अनुभवातून दुसऱ्याही कंपन्या निघाल्या.

पारशी मंडळींनी केवळ मनोरंजन हाच हेतू ठेवून रंगभूमीच्चा प्रारंभ केला हे खरे आहे. परंतु शुद्ध गुजराती भाषा आणि साहित्यिक गुणवत्ता यांचा त्यात अभाव होता. याचवेळी भवाईमध्ये अश्लील तत्व जोडले गेले म्हणून श्री० रणछोडभाई उदयराम यांना फार वाईट वाटले. आपल्या दैनदिनीत त्यानी लिहिले आहे,"मी भरतमुनीचा अनुयायी असल्यासारखी माझी जी निष्ठा होती तीचेतवली गेली." आणि 1878 मध्ये 'गुजराती नाटक मंडळी', ची स्थापना होऊन रणछोडभाईची 'हरिश्चन्द्र' आणि 'नळ-दमयंती' ही नाटके रंगभूमीवर आली. यांच्यापूर्वी नर्मद-दलपत यांच्या नाटकांचे मधून मधून प्रयोग होत असत.

अंगी जन्मजात अभिनय कला व आवाजाची देणगी असलेले नायक, भोजक, मीर ज्ञातीची लहान मुले आणि तरुण सर्वजण या नाटक कंपनीस जोडले गेले. या कलाकारांनी इतर सर्व व्यवसाय सोडून देऊन रंगभूमीला स्वतः स वाहून घ्यावे इतकी आजीवन अभिनय निष्ठा त्यांच्यात दिसून येते.

व्यावसायिक रंगभूमीच्या नाटकात एक विशिष्ट प्रकारची नाटयशैली आकारास आली. त्यात कथानक, संवादाच्या विविध रंगछटा, मूळ नाटकामध्ये उपकथारूपाने विणलेले 'कव्हरा' वरचे कॉमिक, प्रासानुप्रासी ओवी, गीत संगीत, झगमगते पोशाख आणि फोकस लाईटमध्ये भूमिगत होऊन अदृश्य होणारी पात्रे दाखवून कंपनीच्या मालकांनी प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन केले आणि आपला चाहाता वर्ग

उभा केला. याचा इतका प्रबल परिणाम झाला, की आजही समाजातील एक मोठा वर्ग अशा प्रकारची नाटके पहायला उत्सुक असतो.

वर्षानुवर्ष व्यावसायिक रंगभूमी एकाच पद्धतीला अनुसरून नाटयप्रयोग करीत राहिली. त्यात काही उणीवा आहेत हे त्यावेळच्या नवोदित शिक्षित वर्गाला वाटत असे आणि त्याकाळचे सुधारक वृत्तीचे एक अग्रणी नृसिंह विभाकर (1888—1925) यांनी या क्षेत्रात पदार्पण केले त्यावेळी परदेशात हेन्रीक इब्सेनची वास्तववादी नाटके रंगभूमीवर दाखवली जात होती. विभाकर परदेशात असताना आंग्ल रंगभूमीवरील प्रयोग कसे आणि कोणत्या प्रकारचे होतात हे त्यांनी पाहिले होते. त्यामुळेच त्यांनी आपल्या स्वतःच्या नाटकात सामाजिक, गूढ समस्या आणि स्वदेश भावनांचा नवा उन्मेष रेखाटला होता. परंतु त्यांचे विचार प्रेक्षक वर्गाने फारसे उचलून धरले नाहीत.

दहा वर्षांनी विभाकरांचे अपुरे कार्य लब्धप्रतिष्ठ साहित्यकार, कवी, नट, नाटककार चंद्रवदन महेतानी उचलून धरले. व्यावसायिक रंगभूमीवरील नाटयशैलीहून अगदीच वेगळी लेखनशैली, अभिनय कला, दिग्दर्शन आणि नाटय-प्रयोगांद्वारा त्यांनी गुजराती रंगभूमीवर क्रांती करून दाखवली. आणि वास्तववादी अभिनव रंगभूमीची सुरुवात झाली. ते स्वत: एक कुशल नट असल्यामुळे नाटकामध्ये अभिनय क्षमतेला त्यांनी आवश्यक अंग मानले. त्यांची प्रथम नाटयकृती 'आग-गाडी' चे लेखन आणि प्रयोग झाले 1930 साली. आणि त्याची प्रथम आवृत्ती प्रसिद्ध झाली 1934 साली. आज 1974 साली अभिनव रंगभूमीने निर्मितीच्या क्षेत्रात नेपथ्य आणि प्रकाशयोजना यामध्ये जे अपूर्व यश मिळवले आहे त्याची खरी कल्पना चव्वेचाळीस वर्षापूर्वी लिहिलेल्या या नाटकात पहायला मिळेल. हे नाटक एक शोकान्तिका आहे. यात बाघर नावाच्या एका आगवाल्याचे जीवन आहे. परंतु हे लिहिण्यापूर्वी लेखकाने पुस्तकाच्या आत्मनिवेदनात लिहिले आहे की—

'पंधरा रनिंग शेडमध्ये महिनाभर भटकलो आहे. शेदीडशे मैल एका वेळी, भर दुपारी आणि कडाक्याच्या थंडीत एंजिनगाडी चालवण्याचा अनुभव घेतला आहे. रावरखाना पाहिला आहे, त्या जागी झोपलोही आहे…केबिनचा सांधा खेचला अहे.' वगैरे.

कामगारांच्या संसारात वावरल्यानंतर त्यांनी आगवाल्यावर झालेला जुल्म, त्यच्या जीविताची जोखीम वगैरेचे चित्र चितारले आहे. त्यामुळे ही कृती सजीव

भासते. गोरा देव 'काळया आदमी' ला कसा वागवतो, त्यांना कसा त्रास देतो याचे हुबेहूब चित्र या नाटकात दाखवले आहे. आणि नाट्यकथा एक नवीच मुरड घेते. त्यामुळे तोच गोरा देव बाघरचा चुलतभाऊ निघतो. जमिनीच्या एका तुकड्यासाठी त्याने आजन्म वैर धरले आणि बाघरला आगीत ढकलले. हे कसे घडले ? नाटकातील एक पात्र भैया रामचरणच्या शब्दात आगवाल्याचे चित्र दाखवले आहे ते असे-—

"आगवाले के पसीने से तो अंजिन की आग बुझ जाय."

दुसरे पात्र गुलाम महमद म्हणतो—

"आपल्या हाडाची लाकडं पेटतात या धुमाडयामुळं आणि रक्त उकळतं याच्या वाफेमुळं. अशी आगगाडी चाललीय." आणि त्याचा शेवट कसा ? बाघरची पत्नी रूखी म्हणते —

"माझा संसारच आज खलास झाला या आगगाडी पायी".

अशा प्रकारे अनेक पात्रे आपल्या बोली भाषेतून रेल्वेची नोकरी, प्रवाशांचे हाल आणि अधिकाऱ्यांची दंडेलगिरी बोलून दाखवितात 'बाराकोसांवर बोली बदलते' त्या प्रकारे पात्रांची विविधता, त्यांची भाषा आणि त्यातील वैशिष्टय येथे पहायला मिळते. सुरती, चरोतरी, तळपदी, अहमदाबादी, तसेच पारशी, बोहरी आणि मुसलमानही आहे. नाटकात अनुभवाच्या ऐरणीवरेटिपलेली रामचरणाची गीतेही आहेत—

"तूने अजब बनाया रेल, रामा !"

दुसरं गीत—

"काल घटा बजावे, महाकाल घंटा बजावे,
साधू हो के सेयां हो सब,
कोइ जावे कोइ आवे
कोइ समेटत बिस्तर तो फिर
कोइ रोवे, कोइ गावे."

आणि—

"अगनगाडी आंगण आवी."

ते लेखक, नाटककार शिवाय कवीही आहेत हे त्यांच्या 'इला काव्यो' ने सि

केले आहे.

पुस्तकामध्ये प्रवेशाला सुरुवात होण्यापूर्वी पार्श्वभूमीची कल्पना देऊन प्रयोग करणाऱ्यांची सोय करून दिली आहे. नाटकाच्या निर्मितीला कला-दिग्दर्शक निराळा असतो. परंतु नाटककाराच्या मनात जी सृष्टी रेखाटली आहे तिची कल्पना दिग्दर्शकाला असली पाहिजे.

व्यावसायिक रंगभूमीवर स्त्रियांच्या भूमिका पुरुष कलाकार करीत असत. याला विरोध दर्शवून श्री. चंद्रवदन महेतानी 'स्त्रियांची कामं स्त्रियांनीच करावी' असा आग्रह धरला.

रंगभूमीचा कायापालट होत आहे याचे समर्थन करणाऱ्या साहित्यकारांनी या अभिनव शैलीच्या 'आगगाडी' नाट्यकृतीसाठी 1973 साली लेखकाला 'नर्मद सुवर्णचंद्रक' पारितोषिक दिले.

यानंतर या लेखकाने 'नागबावा' लिहिले. रेल्वे जगतात उपेक्षित असलेल्या पात्रापेक्षाही विशेष तिरस्कृत असलेली भिक्षुक जमात त्यांनी या नाटकासाठी निवडली. त्यानंतर 'मूगी स्त्री' लिहिले. जनता अशा प्रकारची नाटके पहायला सरावली नव्हती. पण चंद्रवदनभाईना खात्रीने वाटत होते की एक दिवस ही अशी वास्तववादी नाटके आणि त्यांचे प्रयोग लोक स्वीकृत करतील. म्हणून त्यांनी मित्रांचे सहकार्य घेऊन स्वतःच्या नाटकांचे प्रयोग सुरू केले. त्यांना किती अडचणीना तोंड द्यावे लागले असेल ! रंगभूमीची थिएटरे जेव्हा सिनेमासाठी वापरायला सुरुवात झाली होती, तेव्हा एक स्वतंत्र अद्ययावत 'नाट्यमंदिर'असायला हवे असे जनतेला पटवणाऱ्या रंगदेवतेच्या पुजाऱ्याला मात्र एक थिएटरसुद्धा मिळत नव्हते. विद्यालयाच्या सभागृहात या नाटकांचे प्रयोग होत. श्री. ज्योतीन्द्र दवे यांच्या शब्दात 'प्रेक्षकापेक्षा आम्ही नटच जास्त होतो' असे, असूनही निराश न होता ते नाटक करीत होते, लिहित होते. शेक्सपिअर, मोलियर आणि शॉ यांनी रंगभूमीच्या उत्कर्षासाठी नाटके लिहिण्याखेरीज नाटकाचे प्रयोग बसवण्यातही लक्ष घातले होते. चंद्रवदनभाईनासुद्धा हे यश मिळाले, कारण गुजराती रंगभूमीच्या नव्या घडणीसाठी एक ध्येयनिष्ठ नाटककार—कलाकार किती मनोवेदना अनुभवतो याचा एक सुरस इतिहास घडवला जात आहे. आणि त्यांचे लेखनकार्य सातत्याने चालूच आहे. त्यांनी 'नर्मद', पांजरापोळ, 'अखो', 'देडकांनी पांचशेरी', 'धारासभा', 'संध्याकाल', 'आराधना', 'वरवहु', 'आणलदे', 'धरागुर्जरी', 'सीता', 'शिखरिणी', 'शेतलने काठे', 'सोनावाटकी', 'माझमरात', 'मोना पोपट' 'होहोलिका

(भवाई पद्धतीने लिहिलेला नवा प्रयोग)', 'मदिरा (Media चं नाट्य रूपांतर)' आणि इतर अनेक एकांकिका, अनेकांकिका, रेडियो-नाटिका लिहिल्या आहेत. यामध्ये मनोविश्लेषण, लग्न समस्या, प्रणय त्रिकोण, राजकारणात खेळलेले डावपेच वगैरे गहन प्रश्नांवर चर्चा केली आहे.

या सर्व नाटकांच्या प्रयोगाचे वेळी मिळालेला अनुभव, नाटकाच्या विविध अंगांचे सूक्ष्म अवलोकन, एवढेच नव्हे तर जगातील विविध देशातील नाट्य-प्रवृत्तींची घेतलेली नोंद या सर्वांचा अर्क त्यांनी लिहिलेल्या 'गठरिया' च्या मालिकेतील पुस्तकांमधून मिळे ल. यावरून प्रचीती येते, की केवळ भारतातच नव्हे तर जगातील बऱ्याच भागात भारताचे प्रतिनिधी म्हणून नाट्यदीपाची ज्योत त्यांनी तेवत ठेवली आहे. आज सत्तर वर्षांचे वय झाले असताही हा निडर नाट्यविशारद एका तडफदार तरुणाप्रमाणे कार्य करीत आहे.

बालरंगभूमीमध्येही त्यांनी तितकेच सक्रिय लक्ष घातले आहे. 'संताकुकडी', 'रमकडानी दुकान' आणि टागोरांचे 'डाकघर' ही बालनाटके त्यांनी लिहिली आहेत. 1971 मध्ये मुंबईल भरलेल्या चिल्ड्रन्स लिट्ल थिएटर परिषदेच्या अध्यक्ष-पदावरून त्यांनी बहुमोल सूचना केल्या.

अभिनव रंगभूमीचा प्रारंभ करण्यात डॉ० कन्हैयालाल मुनशी यांचाही वाटा आहे. त्यांनीही वास्तववादी नाटके लिहिली. 'काकानी शशी', 'ब्रह्मचर्याश्रम', 'डॉ० मधुरिका', 'ध्रुवस्वामीनी देवी' वगैरे नाटके त्यांनी लिहिली. आणि यामध्ये ही साहित्यिक मूल्ये, अभिनयक्षमता आणि हुबेहूब पात्रलेखन आहे. कवी श्री नानालाल यांनीही 'जया जयंत', 'इंदुकुमार' वगैरे नाटके लिहिली. असे असूनही चंद्रवदनभाई आपल्या समकालीन लेखकांहून वेगळे वाटतात. कारण त्यांच्या नाटकातील पात्रे बहुजनसमाजाच्या थरातील विशेषकरून आहेत. ती पात्रे वास्तव- सृष्टीमध्ये जगतात, मरतात.

व्यावसायिक रंगभूमी आणि आधुनिक तंत्राने बसवलेली नाटके असे दोन्ही वेगवेगळे प्रवाह एकाच वेळी चालू होते. त्यानंतर सिनेमा सुरू झाला, त्यामुळे व्यावसायिक रंगभूमीवरील मंडळी एका पाठोपाठ एक बंद होऊ लागली. या जुन्या पद्धतीने नाटके करणाऱ्या नाटक मंडळील आता एकच 'श्री देशी नाटक समाज', अजून जीव धरून आहे. कारण या मंडळीचा चाहतावर्ग अजून आहे. प्रश्न असा आहे की ही शैली किती दिवस टिकून राहू शकेल ? नायक, भोजक, मीर या जातीच्या कलाकारांनी आपली मुले अन्य व्यवसायाला लावून दिली आहेत. परदे-

शात परंपरागत चालत आलेली जुनी नाटके अजूनही टिकून आहेत. नाटयगुरू शेक्सपियरची नाटके बोलचालीच्या वास्तववादी किंवा स्वाभाविक शैलीत लिहिलेली नाहीत. या नाटकांची लेखनशैली आणि संवादपद्धत विशिष्ट प्रकारची आहे. असे असूनही आज अनेक शतके सारे जग या नाटकांचे स्वागत करीत आले आहे.

असेच दुसरे उदाहरण जपान च्या 'काबुकी' प्रकारच्या नाटकांचे आहे. त्यात संवादांचे उच्चारण नाभीमधून केले जाते. वर वर पाहिले तर हे सारे कृत्रिम वाटते. असे असूनही ही पद्धत एक विशिष्ट रसानुभूती प्राप्त करून देते. दुसरा प्रकार NOH नाटकांचा आहे. मुखवटे घालून नाटके केली जातात.

दुसरीकडे अभिनव रंगभूमीला वेग मिळाल्यामुळे याचा जलद विकास होत आहे. विशेष करून नाटयनिर्मितीमध्ये नवे नवे प्रयोग होत आहेत. एकाच सेटिंगवर करण्यात येणाऱ्या नाटकांत लेखकाला समय आणि स्थल यांची मर्यादा सांभाळावी लागत असे. ही अडचण टाळण्यासाठी आणि निर्मितीमध्ये विविधता यावी म्हणून फिरता किंवा सरकता रंगमंच आला. त्यानंतर 'जॅक माइक टेकनिक' दाखल झाले. त्यामध्ये फिल्मचा माइक लाँगशॉट मधे कॅमेरा मिड क्लोजपमध्ये येतो, तसेच मागचा मंच पुढे सरकता येतो. त्यानंतर 'बायोस्कोप' मधून नाटकाबरोबर फिल्मची दृश्ये दाखवण्यात येऊ लागली. प्रतीकात्मक आणि 'इनलेड सेट' चीही पद्धत सुरू झाली.

प्रकाशनिर्मितीमध्ये अनेक दशकापूर्वी जिथे पायदिवे (foot lights) आणि वरचे विद्युत दीप (Head lights) होते त्या जागी फ्लड, स्पॉट आणि डीमर्स येऊन दाखल झाले. आणि आता थ्रोबल्याइटचा सरसहा उपयोग करण्यात येतो. त्यामध्ये पात्रांच्या हालचाली, अभिनय नीट दिसू शकतो.

नाटककारही आता नुसते लेखनच नव्हे तर या सर्व प्रकारांचे उपयोग लक्षात घेऊन प्रयोगामध्ये त्याचा कसा उपयोग करता येईल यात लक्ष घालू लागले आहेत.

गुजराती रंगभूमीवर एक नवा प्रवाह सुरू झाला आहे. बालरंगभूमीवर एकांकी शिवाय दोन अडीच तास चालतील अशी सलग नाटके पण होऊ लागली आहेत. त्यांचे लागोपाठ तीस तीस प्रयोग होत आहेत.

निर्मिती क्षेत्रात जी प्रगती झाली आहे त्या तुलनेने नाटयलेखनावर तितके लक्ष दिले गेले नाही. त्याचा आशय जरूर विस्तृत झाला आहे. जातीय जीवनाचे

प्रश्नही लेखक निःसंकोचपणे हाताळू लागले आहेत. 'थिएटर ऑफ दि ॲब्सड' सुद्धा माणूस जसा आहे तसा दाखवून देते. माया आणि भ्रम यातून बाहेर काढून माणसाला वास्तविकतेचे भान करून देते. यातील हास्यामागे करुणा लपलेली असते. गुजराती रंगभूमीवर सॅम्युएल बेकेटचे 'वेटिंग फार गोदो' नाटक रूपांतरित झाले आहे. ॲब्सर्ड शैलीच्या आणखीही काही नाटकांचे प्रयोग झाले, आहेत.

भावनाप्रधान आणि बुद्धिचातुर्य यांनी परिपूर्ण अशी भरपूर नाटके होत आहेत, परंतु रसनिष्पत्ती होईल अशी फार थोडी ! गुजराती रंगभूमीवर मौलिक कृतीपेक्षा भाषांतर आणि रूपांतरांची संख्या वाढली आहे. अशा नाटकांमध्ये कित्येकांना फार यश मिळते. पण ती आपली नाटके वाटत नाहीत. त्यातील पात्रे, त्यातील वातावरण परकी वाटते. त्या ऐवजी आपल्याच भूमीची, आपल्याच मानवाची कथा, ज्यात प्रेम, आनंद, उत्साह उल्हास, आहे, एका डोळ्यात आसू तर दुसऱ्या डोळ्यात हासू दिसेल अशी पात्रे आपल्याला आपलीच कथा सांगत आहेत, अशी मौलिक कृती अंतःकरणाला भिडून जाते.

चंद्रवदनभाईंची ही कृती भारताच्या अन्य भाषांत प्रसिद्ध होत आहे या शुभवेळी त्यांचा सत्कार करून आणि अभिनंदन व्यक्त करून आपण शुभेच्छा करू या की, त्यांच्या जोरदार आणि जीवनाच्या स्पंदनाला संवेदनशील असणाऱ्या लेखणीतून अशा अनेक मौलिक कृती निर्माण होवोत.

प्रागजी डोसा

मनाची रुखरुख

माझी इच्छा आहे की सर्वांनी हे नाटक पुरं वाचावं. माझी विनंती आहे की जरुर वाचावं. या नाटकामध्ये जे कथानक आहे त्यापेक्षाही वास्तविक सृष्टीमध्ये याचं चित्रण फार मोठं आहे. याचा थोडासा निर्देश या लेखनाद्वारा करण्याचा यत्न केला आहे. म्हणून हे वाचणं आवश्यक आहे. नॅचरॅलिझम्, एक्सप्रेशनिझम्, रिॲलिझम् एक्सेन्ट्रीसिझम, आयरॉनिक, कॉमिक, इरॉटिक, मोरॅलिस्टिक वगैरे भावांतून भरपूर रोमॅन्टीसिझम, सेन्टिमेन्टॅलिझम् किंवा यातील एकापेक्षाही जास्त मिश्रित 'इझम' ची वर्गवारी चर्चा मला येत नाही. बी. ए., एम्. ए.च्या काही इंग्रजी पाठ्यपुस्तकांसाठी पुरवणी म्हणून जी टीका पुस्तकं असतात, त्यात ही विद्वत्ताप्रचुर चर्चा पहायला मिळेल. इथं अशा विद्वत्ताप्रचुर चर्चेशी अजाण असलेला मी अपंडित, इतकंच सांगण्याचं नम्र साहस करतो आहे की या इंग्रजी लेखकांची राहाणी, इंग्रजी मनोभावना, इंग्रजी स्थळ काळाचा इंग्रजी रंगमंच वगैरेंच्या व्यतिरिक्तही नाटकाची एक सृष्टी आहे. या सर्वांची पुसटशी कल्पना यावी म्हणून या नाटकात प्रयत्न केला आहे.

या नाटकातील कथानकाविषयी मी एवढंच जाणतो, की तेथील मूळ परिस्थिती जशीच्या तशी दाखवण्यात माझे डोळे म्हणण्यापेक्षा हातच निर्बळ ठरले आहेत. या प्रयोगातील हकीकत अपुरी आहे, त्यात काही कमतरता आहे, भाषा दुर्बल आहे, चित्रं अस्पष्ट आहेत. रेल्वेच्या कारखान्यात दर दिवशी जे जे प्रसंग घडतात त्यांचा विचार करता मिलमजुरापेक्षा एंजिन चालवणारे आगवाले यांची स्थिती कोणत्याही रीतीनं चांगली नाही असं मला वाटतं. यासाठी एकच विचार करा. हिंदुस्थानच्या समुद्र किनाऱ्याच्या पूर्वपश्चिमेकडील पन्नास ते शंभर मैल सोडून मध्यप्रदेश आणि उत्तरेत मधम मधन धावणारी रोजची आगगाडी, तिचा

विचार करा. दिवसरात्र धडधडाटानं चालणाऱ्या एंजिनवरच्या आगपेटीत कोळसा घालणाऱ्या आगवाल्याच्या स्थितीचा विचार करा. अहमदाबादहून दिल्ली, दिल्लीहून रतलाम, रतलामहून गोध्रा, मुंबईहून थेट खरगपूर, पुण्याहून मद्रास, कटकहून कांडला आणि असंच ठिकठिकाणी दुपारच्या बारा ते पाच या वेळात धावणारा आगवाला, गाड्यांना थांबावं लागावं अशी धुळवट रजपुतान्यातून येते, शंभर डिग्री वरचा ताप बिन पाण्याच्या मैदानात पेटत असतो त्यात, तसंच पावसात आणि कडाक्याच्या थंडीत अर्ध्या वरच्या उघड्या एंजिनवर मध्यरात्री, समोर वारा, धुकं, दव किंवा मेघांच्या गडगडाटातून कोसळणाऱ्या पावसाच्या पाण्यात सिग्नल पहाणारा, बायकापोरांना टाकून आलेला, नोकरी संभाळणारा आगवाला कोणत्या मनोबळाच्या जोरावर ही सक्ती सहन करीत असेल ? आगपेटीच्या झाकणाजवळ गरम राखण्यासाठी बांधलेली मोठी चहाची बाटली आणि दोन दिवस मोठ्या मुष्किलीनं राखलेला मळक्या फडक्याच्या चिंध्यात बांधलेला भाकरीतुकडा आणि कोळशाच्या ढिगांत धूळ खात पडलेलं अंथरूण-पांघरूण, एवढं घेऊन निघालेला आगवाला असतो कुठल्या तरी खेड्यातला—समजा बडोद्याजवळ गोरवाना इथला. मोठा कारखाना अहमदाबादला म्हणून नोकरीसाठी तिथं गेला. जा ये करीत होता अजमेर आणि साबरमतीच्या दरम्यान, कारखान्यात मुकादमला किंवा फोरमनला पुरती सलामी आणि दर महिन्याची चिरीमिरी मिळाली नाही, की 'बदली' मिळे रतलामची आणि खेचावी लागे कोटा रतलाममधील मालगाडी. यामुळे गाव तर बिचाऱ्याचं कुठं रहात असे दूर, अगदी दूर. त्याचे मालकही अनेक, पण सर्वांत जवळचा धनी ड्रायव्हर. तो त्याच्यापेक्षा दहापट जास्त पगार खाई. म्हणजे असायचा दारूचा शौकीन. भरपूर पिऊन तो ज्या दिवशी कामावर येई त्या दिवशी पहावे आगवाल्याचे हाल. तो ड्रायव्हरसाब त्याला मारी, शिव्या देई. दर दोन चार मिनिटांनी फावड्यातून कोळशाची आहुती अग्निदेवतेला मिळाली नाही की पुरती वाफ तयार होत नसे आणि गाडी वेळेवर धावत नसे. किंवा चालत्या गाडीत एंजिनच्या पोटात पुढल्या बाजूला एका हातात बत्ती आणि तेलाची कुपी घेऊन मशीनमध्ये बरोबर तेल घातलं नाही तर गाडी चांगली चालत नसे. आणि गाडी वेळेप्रमाणे किंवा चांगली धावली नाही की त्यावेळी ड्रायव्हर साहेबाचं उसळलेलं पित्त चालत्या गाडीत आगवाल्यावर निघे. त्यावेळची त्याची दगदग, त्याच्यावरचं संकट, हाणामारी, जीव वाचवण्याची धडपड या नाटकात कशी दाखवता येईल ? रेल्वेमधे चालणारं दारूचं साम्राज्य,

पाऊस पडत असताना टोपली भरून एंजिनची कोळसाटाकी भरणं आणि दुसरी अनेक जीवघेणी जोहुजूरी कामं या सर्वांची कल्पना एवढ्याशा लहान नाटकात कशी काय देता येईल ?

आणि या आगवाल्याच्या पगार ! वर्णभेदाच्या कलहात पडणाऱ्यांना कळलं पाहिजे की रेल्वेच्या जगात आगवाले आणि ड्रायव्हर यांच्यामध्ये अ, ब आणि क वर्गाचे रंगभेद आहेत. गोरा म्हणजे सर्वांत श्रेष्ठ ब्राह्मण—ए क्लास. त्याचा पगार सर्वांत जास्त. ब म्हणजे बी क्लास. त्यात नाही पुरा गोरा, नाही पुरा हिंदी अशांचा समावेश होतो. 'क' मधला जरा पांढरी कातडीवाला वर्ग फार मस्कामारी किंवा पैशाची लाच म्हणजे शंभराची हिरवी नोट पुढे करून 'ब' वर्ग मिळवू शकतो. पण 'क' चा काळा वर्ग—'सी' क्लास, यांना पगार कमी, अधिकारसुद्धा कमी. आणि वर भरीला 'ए' क्लासच्या गोऱ्या देवांकडून हरघडी 'काले आदमी—ब्लडी स्वाइन' असा प्रसाद.

कातडी धोरण ते काय रेल्वेतच आहे ? सर्वत्र आहे. सुशिक्षित आणि सुधारलेल्या समजल्या जाणाऱ्या सुविख्यात मुंबई विद्यापीठामध्येही आहे. हे 33 च्या जूनमध्ये सिनेटच्या एका बैठकीत एका सभासदानं स्वतःच्या भाषणात पुराव्यानिशी शाबित केलं होतं. पण छापील दफ्तरात हा ए, बी आणि सी असा वर्णभेद पाडण्याची प्रथा जास्त प्रसारित झाली ती रेल्वेच्या कारभारात. त्याशिवाय दुसरेही जातजातीचे ग्रेडभेद आहेत, हे रेल्वेचा कारभार तपासता कुणालाही कळेल. यामुळे खालच्या वर्गातील मनुष्याला जास्तीत जास्त काम आणि कमीत कमी पगार हे यावद्चंद्रदिवाकरौ ठरून गेले आहे.

रनिंगशेड म्हणजे कारखाना. परळ, बलसाड, बडोदे, अहमदाबाद, साबरमती, अजमेर, बांदीकुई, गोधरा, दोहद, रतलाम, शामगढ, कोटा, गंगापूर, मथुरा, दिल्ली, आग्रा, पुणे, कल्याण, भुसावळ, सोलापूर, रायचूर, राजकोट वगैरे अनेक ठिकाणी असलेली 'रनिंग शेडस्' एंजिनांच्या कारखान्यात चालणाऱ्या अनेकविध प्रवृत्तींचा अभ्यास करावा अशी जनतेला विनंती करतात. ताज, साची, अजंठा, जयपुर, भोपाळ उदेपूर, डाकोर, द्वारका, मथुरा, वृंदावन बोलपूर, बनारस किंवा हरद्वार वगैरे स्थळांच्या कलायात्रा करणाऱ्या किंवा विद्यालय पहायला जाणाऱ्या शौकिनांनी या कारखान्यातील काळया अग्निमंदिरातील देशी मेहनत-मूर्तींची वस्त्रप्रावरणं तसंच प्रसादपेय आणि कारभारातील व्यवस्थेचं अवलोकन एक खास अभ्यासाचा विषय मानून करावं असा त्यांना नम्र आग्रह करतात.

ट्राफिकमध्ये स्टेशन, स्टेशनमास्तर, तिकीट कलेक्टर, केबिन, गुड्‌सक्लार्क, सांधावाला, सफाईवाला, चहाचा स्टॉलवाला, शिवाय यांच्याबरोबर सरळ वहिवटीमध्ये येणारे लोको खात्यातील कॅरेज एक्झामिनर, शंटर वगैरे अनेकांचे व्यवहार, लटपटी रसभरित आहेत. त्यातही प्रवाशांना सतावणाऱ्या, कमी पगारामुळे पैसे काढणाऱ्या तिकीट कलेक्टरांचा आणि कामाच्या बोजानं दबून निर्बल बनलेल्या स्टेशन मास्तरांचा चिडचिडेपणा, त्यांची मिजास तसेच बेदरकारी-पणाचा दाखला ठिकठिकाणी मिळेल. तिथलं वातावरणच निराळं आहे, दुनियाच निराळी आहे. व्यवहारसुध्दा आगळाच आहे. हे सगळं बारीक नजरेनं तपासावं अशी रसिक विद्यार्थ्यांना मी विनंती करतो.

मुंबई विद्यापीठात बी. ए.ची परीक्षा पास झाल्यानंतर वकिलीच्या अभ्यासा-साठी लोटलेल्या जमावातून बाकी राहिलेले विद्यार्थी एम्. ए.च्या अभ्यासाकडे नजर वळवतात. त्यातल्या एका भागात वाणी, ब्राह्मण, नागर, कोळी, दुबळा, चोधरा वगैर जातजातींच्या पंचायतींवर त्याचप्रमाणे त्यांच्या जुन्या इतिहासावर पाच पंचवीस इंग्रज लेखकांच्या मताचा टेकू घेऊन केलेल्या संशोधन लेखनाला-सुध्दा ही डिग्री देण्यात येते. या अभ्यासाला समाजशास्त्राचा अभ्यास म्हणण्यात येतं. उदाहरणार्थ—वाणी हे श्रीमाळी का ? श्रीमाळ कुठं आहे ? कुठून आलं ? केवढं होतं ? दुभंगलं का ? तिथं रहाणारे गेले कुठं ? सांगितलं काय ? वेश कोणता ? विचारलं काय ? व्यापार कशाचा ? वगैरे बरीच माहिती एकत्र करणारा 'विद्वान' मानला जातो. अशा समाजशास्त्रज्ञाला माझी विनंती आहे, की आपलं भूतकालाचं ज्ञान फार छान आहे. परंतु आगगाडी, रेल्वे हीच एक सबंध वर्तमान समाजसृष्टी आहे तिकडे पहा. प्रस्तुत नाटकातील जोन्ससाहेबाच्या जातभाईंची जी एक वेगळीच जात रेल्वेत स्वतःचा जम बसवून राहिली आहे, त्या जातीचा नाही कुठला देश, नाही पुरी भाषा, नाही एक पेहेराव, शिक्षण तर असं की ज्यांच्या आचारविचाराला अनेक लोक बळी पडतात. या जातीच्या रचलेल्या, बांधलेल्या इतिहासाकडे, याच्या संमिश्रणाकडे, याच्या सहशिक्षणाकडे तुमच्या विद्येचे किरण फेकाल तर एका वर्गाच्या पायतळी चिरडल्या जाणाऱ्या दुसऱ्या वर्गाला काही सहाय्य मिळेल आणि खरी ज्ञानसेवा होईल, असा नम्र दावा या जागी अस्थानी गणला जाणार नाही.

बरं! ह्या जातीतील या 'अ'जातीतून म्हणजे श्रेष्ठ असलेल्या जातीतून—आणि खास करून ऑक्सफर्ड व केंब्रिज सारख्या समजल्या जाणाऱ्या विद्याधामातून-

दरवर्षी जे तरुण अमलदार इथल्या रेल्वेची व्यवस्था बघायला मोठ्या खुर्चीवर येऊन बसतात, त्यांच्या स्वतःच्या हस्ताक्षरातील ढीगभर लिखाण जिथे व्याकरणाचे नियम मुळीच मानत नाही तिथे मग ते बोलण्यात जे. सी. नेसफील्ड किंवा पी. सी. सेन यांना ठोकरीनं उडवणार हे उघडच आहे. त्यातील 'क' जातीचा सद्गृहस्थ बोलण्याचालण्यात जी भाषा वापरतो त्याचा परिचय या नाटकात कसा करून देऊ ? खच्चून शिव्या भरलेल्या त्यांच्या अपशब्दांनी अलंकृत झालेल्या सरस्वतीची अंगछटा ब्लडी फूल, डॅम, नीगर वगैरे शब्दांनी अगदी मामुली प्रमाणात या नाटकात दाखवली आहे. ती यथास्थित प्रमाणात देता आलेली नाही. तेवढ्यापुरती म्हणायचे तर या लिखाणाची भाषा जोर नसलेली, पांगळी आणि नीरस आहे. जोन्ससाहेबानं वापरलेली भाषा सागरातील बिन्दू एवढी !

नाटकात स्टेशन मास्तर दोन आहेत. एक सुस्वभावी, दुसरा दुष्ट. रेल्वेमध्ये वेगवेगळे स्टेशन मास्तर—पारशी, अनावला, वाणी, गोवानीज, देसाई, पाटीदार, ब्राह्मण, मुसलमान, हिंदुस्तानी वगैरे असतात. कुणी काही आपल्याला लावून घेऊ नये म्हणून त्यांना नावे दिली नाहीत. एकाची डेप्युटी म्हणून ओळख दिली आहे, दुसऱ्याची असिस्टंट म्हणून ओळख दिली आहे. डेप्युटी सज्जन आहे. असिस्टंट दुर्जन आहे.

गुलाम महमद आणि अब्दुल करीम मुसा ही दोन मुसलमान पात्रं आहेत. दोघं चांगलं गुजराती बोलतात. एवढंच नव्हे तर एखाद वेळी त्यांच्या तोंडातून भगवान् हा शब्दही येऊन जातो. या संबंधी एवढंच सांगायचं आहे की मजूर वर्गात हिंदू मुसलमान हा भेदभाव नाही. बऱ्याच कारखान्यांतून गुलाम महमद सारख्या अनेक व्यक्ती अजून हयात आहेत. एकत्र बसून सुकी भाकर सुखासमाधानाने खातात. धावत्या एंजिनवर, लोखंडाच्या, कोळशाच्या ढिगावर, एंजिनच्या मागच्या टाकीवर एकत्र खातापिताना हिंदू-मुसलमान जिज्ञासू नजरेला काही वावगं आढळत नाहीत. मेलेल्या गुरांची ने आण करणारा मुसासारखा मुसलमान गुराखी याची पशुभक्ती रेल्वेतील अनेक हिंदू नोकरांच्या पाशवी वृत्तीपेक्षा अनेकपटीने श्रेष्ठ आहे हे उघड्या डोळ्यांना जाणवल्यावाचून रहाणार नाही. गाय, म्हैस आणि घोडा, बकरा यांना रेल्वे सृष्टीत 'लाइव्ह स्टॉक' गणलं जातं. पण यापेक्षा मोटारींना 'डेड स्टॉक' गणूनही फार लवकर आणि सुरक्षितपणे नेलें जातें. अशा वातावरणामध्ये या दोन गरीब मुसलमानांना सर्वांबद्दल सारखीच आपुलकी वाटते हे स्वाभाविक आहे.

अशा विविध स्वरूपाची आहे ही रेल्वे सृष्टी. पण इथं सर्वात जास्त करुण दृश्य मला आगवाल्याचं वाटलं. गिरमीट मजूर, चहाच्या बगीच्यात काम करणारे मजूर, सोनं हिरे किंवा कोळशाच्या खाणीत काम करणारे मजूर यांच्यापेक्षा आगवाला जास्त दु:खी नाही हे मी कबूल करतो. दु:खी लोकांत हा दु:खी नाही हे निश्चित. असं असलं तरी आगवाल्याकडे आपलं लक्ष असावं तितकं जात नाही असं मला जाणवलं म्हणून मी हा प्रयत्न केला आहे. सेकंड क्लासमध्येएकाच रात्रीच्या प्रवासात नशिबानं वरचा बर्थ मिळाला असता शेखी मिरवणाऱ्या, की 'मला रात्रीचा प्रवास सहन होत नाही,' 'मला गाडीमध्ये झोप येत नाही,' वगैरे पत्राशी करणाऱ्या माणसाने बैल, घोड्यापेक्षाही ज्यांना जास्त त्रास सहन करावा लागतो अशी माणसंच त्याचा भार वाहतात एवढा जरी विचार केला तरी त्याला निवांत झोप येईल एवढ्यासाठी हे कथानक योजलं आहे.

या प्रवाशांच्या न संपणाऱ्या गैरसोयी आणि अडचणींची चित्रं तर राहूनच गेली आहेत. त्यात राजेरजवाड्याच्या शोभिवंत आणि अगदी निराळ्या ऐषारामी तसेच खास देखभालीच्या गाडीवर एक वेगळंच प्रकरण लिहिता येईल.

अशा अनेक गोष्टी बाकी राहून गेल्या आहेत. या रेल्वे जगातील अफाट विस्तारातून न संपणाऱ्या कथानकाच्या भांडारातून दोन तीन तासाच्या नाटकात कोणता विभाग संपूर्ण दाखवणे शक्य आहे ? म्हणून म्हणतो, की या नाटकातील कथानकापेक्षा वास्तविक सृष्टी अनेक पटीनं मोठी आहे. त्यावर तर व्यास किंवा वाल्मिकीच्या लेखणीतूनच एक सुंदर करुणरसप्रधान रसील अग्निरथ पुराण लिहिता येईल. माझा काय पाड ?

बाकी कुणालाही या नाटकात अतिशयोक्ती वाटणार नाही असं मला वाटतं. गाय, म्हैस आणि बकरी यांचा 'रनओव्हर' म्हणजे ट्रेनखाली कापल्या गेल्याच्या कित्येक तारा डी. टी. एस्. आणि डी. एल्. ओ. च्या ऑफिसात डोळ्यादेखत वाचल्या आहेत. पंधरा एक रनिंग शेडमध्ये कित्येक महिने भटकलो आहे. शे दीडशे मैल एकाच वेळी भर दुपारी आणि कडाक्याच्या थंडीत एंजिन गाड्या चालवण्याचा प्रताप केला आहे. मेल ट्रेनला स्टार्ट करण्यासाठी रेग्युलेटर नमवण्याचा आचरटपणाही केला आहे. कोळशाचं फावडं मला दुर्बलाला कसं उचलता येईल ? असं असूनही एकदा हा प्रयोग करून खांदे दुखावून घेतले आहेत. ड्रायव्हरखाना पाहिला आहे. तिथं झोपलो आहे. रेल्वेच्या मोठ्या डॉक्टराचा कडूगोड अनुभव घेतला आहे, जाणला आहे. केबिनमधून रुळांचा सांधा जोडला आहे. सिग्नल पाडले

आहेत, उचलले आहेत. धावणाऱ्या आगगाड्यांचा कंट्रोल ऑफिसात तयार होताच त्याचा तयार झालेला ग्राफ आलेख मी पाहिला आहे. गुड्स यार्डमध्ये नंबर टेकरांची दुर्दशा, कॅरेज स्टाफमध्ये 'मिनी अलो' चं संकट, कारखान्यात कोळसेवाल्यांची 'क्लीमॅनो', क्लीनराच्या अडचणी डोळे फाडफाडून पाहिल्या आहेत. नबाबी, जी हुजूरी, लादलेलं काम आणि अडचणी खूप खूप पाहिल्या आहेत. ठिकठिकाणच्या अनेकांच्या कैफियती ऐकल्या आहेत. रेल्वेमध्ये लाच घेणं तर उघड जाणिती गोष्ट आहे. पण नोकरी मिळवण्यासाठी किंवा हातून गुन्हा घडला असता नोकरी कायम राखण्यासाठी आणि एका पायरीवरून वरच्या पायरीवर जाण्यासाठी मोठ्या साहेबाच्या खिशात जाणारी पैशाची लाच कोणत्या रीतीनं आणि कशा रीतीनं जाते तेही मला ठाऊक आहे. इंजिनिअरिंग खातं, ब्रिज कॉंट्रॅक्टर, टेलिग्राफ इन्स्पेक्टर वगैरे दुय्यम खातीही पाहिली आहेत. प्रवाशांचा गलिच्छपणा, मंत्याची सालं काढून तिथंच टाकणं, थुंकणं, ओकणं, पाणी सांडून सारी जागा भिजवणं, मोठ्या तावदाना सारख्या सामानाचा ढीग रचून दुसऱ्याची गैरसोय करणं ही तर तिसऱ्या वर्गाची रोजची गोष्ट आहे. एका बर्थवर झोपून तीन जागा रिकाम्या असता रात्री स्टॉपर वर करून झोपून राहाण, रेल्वेच्या नोकरांची जागेसंबंधीची मोनॉपली, दुसऱ्याला त्रास होतो आहे हे लक्षात न घेता रात्री दिवा ढणढणीत पेटवून ठेवून, झोपलेल्यांकडे दुर्लक्ष करून मोठ्यानं गप्पा करणं ही दुसऱ्या वर्गाची नेहमीची कथा आहे. तसंच गोरा अथवा काळा, परदेशी किंवा देशी लोकांची आकाशाला हात लागल्याची मिजास, चेहऱ्यावर झळकता पैशाचा उन्माद, मोठेपणाच्या प्रशस्तिपत्रकाच्या रूपानं स्वतः संपादन केलेल्या गादीच्या बैठकीचा अभिमान, दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गाच्या बावळट उतारूच्या हातून नकळत उतावीळपणाने वरच्या वर्गाच्या खोलीचा दरवाजा उघडताच चेहऱ्यावर प्रकट होणारा तिरस्कार आणि असभ्यपणा, हेही मुख्यत्वेकरून पहिल्या वर्गाकडून घडतं. ही सारी विलक्षण सृष्टी पाहिल्यानंतर उत्तर हिंदुस्तानात कडाक्याच्या थंडीच्या कुडकुडाटामुळे रेल्वेच्या नोकरांना गारठून मरताना पाहिलं आहे, तसंच कडक उन्हाळ्यात उष्ण वाऱ्यानं होरपळत कारखान्यात जाऊन तडफडत मरणारे आगवालेही पाहिलेत. असे अनेक दाखले आहेत, पण त्यांची या नाटकात गोळाबेरीज कुठं करीत बसू ? अशा अनेक गोष्टी पाहून मनाचा थरकाप होई. त्या दृष्टीनं या नाटकाचं कथानक अगदी शामळू वाटणं साहजिक आहे. यावरून या नाटकात कुणालाही अतिशयोक्ती वाटणार नाही असं

माझ्या मनाला ठामपणे वाटतं.

शिवाय या नाटकाच्या कथानकाकरिता वर उल्लेख केलेल्यांसाठी भट-कल्यानंतर कित्येक स्टेशन मास्तर, डेप्युटी, कॅरेज एक्झामिनर, त्यांच्या स्टाफ-वरील माणसं, ड्रायव्हर, आगवाले, गार्ड, लिवरमेन, नंबरटेकर, अवांतर ऑफिसचे कारकून, त्यातही विशेषेकरून रेकॉर्ड क्लार्क, स्टोअरकीपर, केबिन-वाले, कंट्रोलर यांच्याशी वारंवार चर्चा करून जी हकीकत मिळवली आहे त्यासाठी या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. यातील काही तर माझे खास मित्र आहेत, काही वडील मंडळी आहेत. सर्वांचे जेवढे उपकार मानावे तेवढे थोडेच आहेत. त्यांच्या नावांचा उल्लेख इथं मला केलाच पाहिजे. पण व्यवहारी शहाणपण मला नकार देत आहे. त्यांच्या नावांचा उल्लेख केल्याने त्यांच्या नोकरीवर गदा आली तर ? रेल्वेचा कारभार चहाडीचुगलीनं पुरा भरलेला. पराचा कावळा व्हायला वेळ नाही लागत. वरिष्ठ अमलदारांच्या हलक्या कानाचा फायदा घेऊन नाहक भांडण उकरून काढण्यात ज्यांना लाज वाटत नाही असेही बरेच लोक आहेत. असं असता ही नावं नजरेला पडताच त्यांच्यावर वरिष्ठांची नाराजी ओढवणार आणि ते अन्नाला महाग होणार. हे कृत्य माझ्या हातून घडणं म्हणजे माझ्यासारखा कृतघ्न दुसरा कोण ? म्हणून एवढ्यावरच संतोष मानतो.

आणि आता शेवटची गोष्ट. हे नाटक लिहिलं आहे प्रयोगासाठी. यात पात्रं पुष्कळ आहेत. काही दृश्यं करायला महाग आहेत. दृश्यामध्ये कुठं कुठं खास प्रकारचा आवाज उत्पन्न करायची साधनं मिळणं अडचणीचं आहे हे मी जाणतो. परंतु दरवर्षी स्नेहसंमेलनासाठी मांडव बांधण्यापायी कॉलेजचे विद्यार्थी जो खर्च करतात त्या पैशाच्या तिपटीत हा खर्च महाग पडणार नाही. पहिलं दृश्य जरा-सुद्धा महाग नाही. फाटक करता येईल, विहीर दाखवता येईल, खोली बनवता येईल. दुसरं, पाचवं आणि सातवं अगदी साधं आहे. तिसरं, चौथं काही अवघड नाही. फक्त प्रकाश रचना करण्याची कल्पना असायला हवी. एक काळा पडदा पाहिजे. दृश्य बदलण्यासाठी पूर्ण वेळेची तीन लहान दृश्यं राखली आहेत. रेल्वेची खास साधन सामुग्री : बत्ती, कापड, बावटा, फर्निचर, टेलिफोन वगैरे चालू नाटकामधील भपकेदार राजाच्या फेट्यापेक्षा महाग नाही पडणार. ध्वनिप्रयोग जरा अवघड आहे. आगगाडी येण्याजाण्याचे आवाजसुद्धा सरावलेला कान या खेळात करून दाखवील. असं असलं तरीही कुणा उत्साही नाट्यमंडळीला ज्या काही अडचणी नडतील त्यावर उपाय सुचवायला मी केव्हाही तयार आहे. पात्रं फार

आहेत हे खरं, पण एकच व्यक्ती हुषारी दाखवून दोन तीन पात्रांची कामं करू शकेल असं आहे. क्लीनर, प्रवासी आणि भिकारी यांची कामं तीच तीच माणसं करू शकतील. पात्रांची भाषा पूर्णपणे ग्रामीण केलेली नाही. परंतु प्रयोगाच्या वेळी योग्य उच्चार समजून घेऊन करण्यात यावे असा माझा नम्र आग्रह आहे. गुलाम महमद जवळ जवळ शुद्ध गुजराती उच्चाराचा असावा. कारखान्यात वेगवेगळया जातीचे, पंथाचे लोक शंभुमेळयातील लोकांप्रमाणे म्हणून भाषेच्या उच्चारातील विविधता प्रयोगातील प्रसंगानुरूप दाखवायला माझी काहीच हरकत नाही. त्याचप्रमाणे या नाटकातील स्टेशन गुजरातेतील किंवा दुसऱ्या प्रांतातील अमुकच स्टेशन मानलं जावं याचीही जरुरी नाही.

आणि प्रत्येक नाटकात मी सांगतो ते इथंही पुन्हा सांगतो की स्त्रियांची कामं स्त्रियांनीच करावी.

गुजरातेत एक सुंदर आणि भव्य नाटचमंदिर बांधायची माझी हौस मी केव्हापासून बोलून दाखवली आहे. तो शुभदिन केव्हा येतो कोण जाणे ! पण जर मला हवं तसं नाटयगृह असेल तर या नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी सुरुवातीला तीन घंटा होतील, त्या तशा न वाजवता रेल्वे स्टेशनवर जसे टोल्ले होतात तसे करायला लावीन. नाटकातील पदांची पुस्तकं आगवाल्याच्या मळक्या कपडयात असलेल्या पाच सात जणांनी विकावीत. दरवाजावर असलेले डोअरकीपर स्टेशनवर आढळणाऱ्या तिकीट चेकरच्या वेशात असावेत. त्यांच्या हातात एकेक तसाच पंच असावा. आणि नाटकाची तिकिटं रेल्वे तिकिटांप्रमाणे नको का करायला ? रामचरण भैया ढोलकी बरोबर गाऊ शकत असेल तर हार्मोनियमला तिलांजली द्या. माझं स्वतःचं नाटकगृह असेल तर मी काय नाही करणार ?

—चंद्रवदन महेता

आगगाडी

स्थळ-समय

नाताळच्या रजेतील लागोपाठ तीन दिवस. शनिवारी संध्याकाळी ते सोमवारी सकाळपर्यंत.

अंक १ ला

शनिवार

प्रवेश १	आगवाल्याची झोपडी	संध्याकाळ
प्रवेश २	कारखान्याचा भाग	रात्र
प्रवेश ३	वेटिंगरूम	मध्यरात्र

अंक २ रा

रविवार

प्रवेश १	स्टेशन मास्तरचं ऑफिस	दुपार
प्रवेश २	रस्ता	संध्याकाळ
प्रवेश ३	प्लॅटफॉर्म	रात्र

अंक ३ रा

सोमवार

प्रवेश १	प्लॅटफॉर्म	मध्यरात्र
प्रवेश २	रस्ता	पहाट
प्रवेश ३	आगवाल्याची झोपडी	सकाळ

अंक १ ला,
प्रवेश १ ला

पात्रे

बाघरजी, रूखी, नारण, रामचरण भैयाजी, जोन्स साहेब, कॉलबॉय, डे. स्टेशन मास्तर, स्टोअरकीपर.

संध्याकाळची वेळ. समोर, रेल्वे फाटकाला असतात तसे दोन बंद दरवाजे. यातील एकावर लाल दिवा दिसतो आहे. एका बाजूला विहिरीजवळ एक आडवं नळकांडं दिसत आहे. त्यातून काहीसा धूरही मधून मधून निघताना दिसतो आहे. दुसऱ्या बाजूला दोन खोल्या. समोरच नव्हे पण विहिरीच्या बाजूला दार असावं अशा. खोल्यांच्या मागल्या भागात साहेबांच्यासाठी टेनिसकोर्ट असावं असं समजायचं.

('गोली, छोकरा-गोली ! गोली ! ए एय ब्लडी, जलदी जलदी' हे शब्द आतून ऐकू येतात. रंगमंचावर टेनिसचा चेंडू येऊन पडतो. तो घेऊन जायला एक मुलगा येतो आणि घेऊन जातो. एक चेंडू जवळच्या विहिरीत येऊन पडतो. तोच मुलगा त्याकडे निराश होऊन पहात रहातो. आतून टेनिस खेळणाऱ्या लोकांचा आरडा ओरडा ऐकू येत असतो. रूखी पाणी भरून येते. रिकाम्या कळशीसह परत जाते. अशा तिच्या फेऱ्या चालू असतात. हातात टेनिस रॅकेट फिरवीत जोन्ससाहेब प्रवेश करतो.)

जोन्स : तुम देखा कायकू नही ? हं ! यू ब्लडी—

नारण : साब, इसमे गिर गया.

जोन्स : बट टुम देखा कायकू नही ? डॅम—जाओ अंदर कुवेमे ओर लेकर आओ, बदमाश !

(रूखी येते. तिला ते ऐकू येतं.)

रूखी : काय रे, काय झालं नारण्या ?

नारण : कायी न्हायी आये ! सायबाचा चेंडू व्हिरीत पडलाय त्येचा-साठी.

रूखी : त्यो तू फेकलास आत ?

नारण : न्याही आये ! म्या कशापायी फेकू ? सायबाच्या फटक्यानं चेंडू इथं आला तो घेया म्या हितं यायच्या आत तो हिरीत पडला.

जोन्स : ये जूट बोलटा हय. बदमाश ! गद्धा.

नारण : न्हायी, आये, त्यो—

जोन्स : चुप रहो, यू नीगर ! बॉल गिरा तो कायकू नही देखा ? जंगली ! (त्याला पकडून रॅकेटने दोन चार फटके लगावतो.) अबी अवाज करता है ? (रूखी पहात रहाते) क्या, टुमारा छोकरा हय ? (जरा रूखीजवळ जाऊन) हॅ, बोलटा नही कायकू ? अबी जाने देटा हय. नही तो फाइन करता हम. (नारणला) जाओ टुम. (रूखीही जाऊ लागते) ब्लडी फाइन वुमन ! (डोळा मारतो, पहात रहातो. शीळ घालीत जातो.)

(बाघर प्रवेश करतो. खांद्यावर करंडी आहे. अगदी मळकट, फाटलेले काळे कपडे. थकलेला ओढाळलेला.)

बाघर : रूखी, ए रूखली !

रूखी : (मागाहून येऊन) आलायसा ! बगा, आज तुमच्या नारणला त्या सायबानं मारलं !

बाघर : कुनी, कुटल्या सायबानं ?

रूखी : त्येनंच, हिकडं बगा, त्यो थितं बसलाय. आत्ता खेलत व्हता. तर थितनं चेंडू जोसात हितं आला नि व्हिरीत पडला. त्येचा-पायी बिच्चाऱ्या नारणला बदडलं.

बाघर : हा तर आमचा जोन्ससायब !

रूखी : ह्यो जोन्स का फोन्स, चुकीवाचून मारत्यो कसा ?

बाघर : चल आता. असल, भाकरी आण. त्येचं काय हाय ? अरं देवा ! कोलसं टाकता टाकता दंड भरून आलयेत. रूखी, ठाव हाय तुज ? ह्यो जोन्स आमचा डरावर हाय.

रूखी : डरावर ऱ्हायला त्येच्या घरी. म्हून काय पोराला मारायचं ? आजची येळ सोडलं, परत ऱ्हायी बगत बसनार ! करंडयातून काय आनलायसा ?

बाघर : फळं हायत. उपसू नुको करंडी.

रूखी : कुनासाटी ? पोरांसाटीच ना ?

बाघर : व्हय. पोरासाटीच. खोलू नुको. करंडी पोचवायची हाय.

रूखी : कुनाकडं ?

बाघर : मला भाकर द्येतीयस की नसत्या पंचामती करतीयस ? बारा कलाक राबून आलोय तर हितं ही चिडफोड. भाकरी मळलं. बावडीवर जाऊन न्हाऊन येतो. आन करंडीला हात लावू नगस. सायबाकडं पाठवायची हाय. त्येंचा नाताल हाय. तुला ठावं नाय ?

रूखी : कुटल्या सायबाला ? दिवाळी आली आन ग्येली. पोरांच्या तोंडात साखरेचा कन पन गेला ऱ्हायी, की वाईच दारू उडवता आली ऱ्हायी. नि या मेल्या सायबाला ही मोटी करंडी. त्यांची दिवाळी नि आमचा काय शिमगा व्हय ?

बाघर : बास आता. तुला ऱ्हायी ते समजायचं. मूर्ख कुठची ! करंडी जाईल तरच दोन पैशे जादा मिळत्याल. इच्यार रामभैयाला. (शेजारी रामचरण येतो.)

रामचरण : क्या है भाई ?

बाघर : कुछ नही भाई. ही आपली फलांची गोष्ट. बारा बार घंटे एंजिनांत कोलसं घालीत ऱ्हावं तवा कुटं आठ आन्याची कमाई व्हते. तेतून सायबाची म्हेरबानी झाली तर कुटं धा आने व्हतील. त्यापायी करंडी आणलीया. पोराबालासाटीच ना ! काय करनार ? ह्ये पन थोडंच हाय. अजून दोन बाटल्यापन

आनायच्यात. पन इकता पैसा कुटं हाय ? आन रूखी वरड-त्येय. न्हाऊन येतो ग.

रामचरण : ए तो भाई, रेलवइका बोलबाला है. हमेरे डिपाटमेंटमे भी ऐसा ही चलता है. उसकी नाताल आयी तो दसबीस बाटल भेजना ही पडता. सब रेलवइ बोटल से ही चलता.

रूखी : पन भैयाजी, तुमचं अदुगरचं देनं न्हायी अजून फिटलं नि ह्ये दुसरं करून आनलं असल.

रामचरण : अरे बाई, हमारा देवा तो ठीक है. उसकी परवा मत करो, सब रेलवइ ऐसी. ए नातालमें देखो तो ए सब डी. टी. एस., डी एल ओ, एक्सीएन साब और ओ बडा डाकटर सब नाचरंग करेंगे, बाटल पीएंगे, और जुआ भी खेलेंगे. सब डरावर लोक ओर मडमसाब सब धूम मचायेंगे. कौन किसकी ओरत वो भी भूल जाएंगे. ओर ए सब मजा सारी लेन पर अपना पगारमेसे नीकलेगी. तुम जाओ बाई, बाघरकु रोटला दो. अच्छा, जेरामजीकी. मे भी थोडा पका लेता हूं. रातकु आज इसपीसल जानेवाली है, इस्टेसन मास्तरसाब आज नही आया अभी ?

रूखी : नाय. दिसलं न्हायीत अजून. बाकी रोज येत्यात या येळी.

रामचरण : आज नारण भी नही आया क्या ? रात हो गयी ने ?

रूखी : त्यो...थितं, टेनसच्या जालीला लपेटत असल. जोन्ससायबानं नातालची बोणी दिली ना त्याला.

रामचरण : क्या किया बाई ?

रूखी : पाठीवर दोन चार घपाटे सणकावून दिले, दादाजी !

रामचरण : अरे राम राम ! ओ साला जानवर जोन्स ऐसा ही कम्बख्त है. (रूखी, रामचरण आत जातात.)

(नारण येतो. करंडी पाहून त्यातून एक सवं काढून खाऊ लागतो. तसाच खात खात आत जातो.)

रूखी : (घाईने बाहेर येत) एय्, खाऊ नग नारण्या, नग खाऊ ! तुजा बा पाहील तर बोम्ब मारील.

नारण : का आये ? ही आपली नाय ?

रूखी : आपली कशी बाब्या ? ती लाच हाय, तुझा बाप सांगतव्हता.

सायबाला द्यायचीय. हात लावू नको त्या विखाला.

नारण : कुटल्या सायबाला ?

रूखी : असल कुनी काळतोंड्या.

(करंडी सारखी करून रूखी ओटयावर बसते.)

नारण : आये, भाकर खाऊन मला वाड्‌ल परत जायाचं हाय.

रूखी : रात झाली, आता काय हाय थितं ? अंधारात आता सायबाला खेलायचंय व्हय ?

नारण : आज त्येंची दिवाळी सुरू व्हते. मेजवानी हाय थितं.

रूखी : व्हय, व्हय. ही करंडी त्याच मढयावर घालायचीय. चल तुझा बा नाही आला. तू बस चल. बघ उपाशी न्हायी ऱ्हायचं. आज राती त्या काळतोंड्या लोकानी खाऊन ऱ्हायलेलं तुला दिलं तर त्ये खाऊ नगस. जा टाकीवरून न्हाऊन ये बाळया. (नारण जातो.) हा मेला सायब किती खायील ! ही काय एकच करंडी असल ? बिचारा नारण, गेल्या सा म्हयन्यात नुसत्या केल्याला न्हायी शिवला. ते कायी न्हायी. थोडी फलं काढून ठेवते. बिचाऱ्याला उद्या द्येयाला व्हतील.

(करंडी उघडते, थोडी फळं काढून घरात नेऊन ठेवते. इतक्यात रामचरण येतो.)

रामचरण : नारण आया क्या ?

रूखी : आलाय—टाकीवर न्हायला गेलाय.

रामचरण : ओ देखो इस्टेशनमास्तर साहब भी आ रहा है, बाई ! ओ कभी चुकनेवाला नही. आखी रेलवाइमे ऐसा अच्छा आदमी कोओी नही. सीधा चलनेवाला कलब बलब कुछ नही. यांही कलब इसकी. नही लायबरी, नही इन्स्टिटूट.

रूखी : खराय. लई चांगला. भगवान त्येचं भलं करो.

रामचरण : भगवान क्या भला करेगा इसका ? भलाई ही ऐसी इसकी के इसकू पगारमे बढती भी कदी नही मिलती.

रूखी : का त्ये ?

रामचरण : ओ सीधी लाइन का आदमी. नही किसीको सलाम करनेवाले, नही बाटल भेजनेवाले. इससे तो अभी रिटार होनेकी उमर

हुओ तो भी डीपोटीमें पडा रहा.

(डे. स्टेशनमास्तर प्रवेश करतो.)

भैया : आइये. जय रामजोकी मास्तरसाहब !

डे. मा. : काय ? बाघरजी नाही का ? (विहिरीजवळ बसतो.)

रूखी : आत्ताच आले नि न्हायला गेलेयत.

डे. मा. : आणि नारण ?

रूखी : त्यो गेलाय बापासंगती न्हायला.

(त्याचवेळीभैया आत जाऊन पाण्याने भरलेला लोटा घेऊन येतो.)

भैया : लो साहब !

डे. मा. : आण बाबा ! (पाणी पितो) आज रात्री धमाल उडणार आहे. या दिवसात जरा ती कशी झोप येत नाही.

भैया : हां साहब ! अभी ट्राफिक ऐसाही चलता.

डे. मा. : अरे बाबा, एका स्पेशलची धमाल आहे आज. सारी रात्र हैराण करतील हे लोक. आज इथंच बसायचंय. दूरवर फिरायला जायचं नाही.

रूखी : मायबाप, घर तुमचंच हाय बसाया. तुमी हितं येता, चार दोन गोष्टी व्हतात, मनावरला भार पार व्हतो. पन कायी म्हना, ही रेल जीव घेया बसलीय मानसाचा.

डे. मा. : अग जीव घेईल तरी बरं. पण ही बया जिवंतपणी मरण भोगायला लावते.

भैया : मैं जरा रोटी पका लाऊं साब ?

डे. मा. : जरूर ! तुझं काम आटप. रेलवे तुझ्यासाठी अडून रहाणार नाही. ड्यूटीवर जायची वेळ होत आलीय. (भैया जातो.)

रूखी : मास्तर साब, रेलमधे ह्येच चालतं ? बारा बारा आन् चौदा चौदा तास येकालाच राबावं लागतं ? त्यापरीस जास्त मानसं का नायी ठेवीत ?

डे. मा. : हो. ते तर खरंच. जास्त माणसं असली म्हणजे कमी तास काम करावं लागेल. पण या जास्त माणसांना पगार कोण देणार ?

रूखी : कोन म्हून काय इच्यारता ? कंपनी सरकार घेयील की.

डे. मा. : पण मग या साहेबांचे खिसे कसे भरणार ? त्यांना थोडा पगार चालेल का ?

रूखी : अरे देवा ! ह्या सायबावाचून दुसरं कुनी न्हायी मिलत ह्या कामाला ?

डे. मा. : अग, या गोष्टीला इतकं महत्त्व नाही. काम करायचं म्हटलं की कुणीही उभं राहील. आपल्या हिंदी माणसाची बडा ऑफिसर म्हणून नेमणूक झाली, तर तो बिचारा माणूस आजच्या माणसाच्या अर्ध्या पगारात काम करायला तयार होईल. कंपनीला फायदा पण चांगला होईल. माणसं वाढवता येतील आणि बारा बारा तास काम करणाऱ्याचं कायमचं ओझं दूर होईल. पण या लोकांना असं करायचंच नाही.

रूखी : सायब, ह्येचं कारन काय असल ?

डे. मा. : कारण कसलं ? या लोकांचे विलायतेत नातेवाईक असतात, त्यांचं कसं होईल ? आमच्या खात्यात एका साहेबाच्या जागी अकरा साहेब नोकरीत आहेत आज.

रूखी : पिडा पडो त्येंच्यावर ! आमच्या धन्याचं हाल पाहातायमा. जवा त्ये विंजीनातून घरी येत्यात तवा त्यांचा अवतार बगावा.

डे. मा. : आगवाल्याची नोकरी म्हणजे अशी तशी नाही. मात्र कामाच्या प्रमाणात पैसा मिळतो तो कवडी किंमतीचा.

रूखी : ह्येला कायी उपाय न्हायी का ?

डे. मा. : उपाय नसायला काय झालं ? पण त्यासाठी संघटना पाहिजे. आज काय चाललंय ? तुमच्या गळयावर मी सुरी फिरवायची. आणि तुम्ही माझ्या गळयावर सुरी फिरवायची. जिथं तिथं चहाडी नि चुगली चालते. आपला स्वार्थ कशात आहे तेसुद्धा समजत नाही या लोकांना. या पायी आम्हीच आमचं नुकसान करून घेतो आहोत.

(बाघर प्रवेश करतो. रूखी जाते.)

डे. मा. : काय बाघर, कसं काय आहे ? कुठून आलास ?

बाघर : फॉरटी वन डाऊन सायेब, आताच आंघोळ करून आलो. चाय घेऊन येतो सायेब, लई दिसानी भेटतोय !

डे. मा. : हो ना ! मी रोज येतो इथं. तुझी नोकरी खराब रे ! रात्रपाळी परवडली. पण या तुझ्या कामात शरिराचा चुथडा होतोय.

बाघर : सायेब, येळ आलीय तशीच. काय करनार ! जिवंत राह्यलोत ही परभूची किरपा ! तुमच्यासारखं हायेत, आमच्यावर माया करतायसा. बस्स हाय इवढंच ! मेरबानी हाय ?

डे. मा. : अरे बाबा, कसली मेहेरबानी ? काय घेऊन जाणार आहोत बरोबर ? तीस वर्षं झाली या नोकरीला. मी आहे तिथंच आहे. तिथून कुणीही हालवणार नाही मला. आणि आता तसा मोहही राहिला नाही. अब्रूनं शेवट गाठला या नोकरीतून म्हणजे मिळवली.

बाघर : व्हय सायेब, इकतंच बस्स. तुमच्यासारक्या चांगल्या मानसाची कंपनीत दरकार हाये कुटं ? तुमच्या मागून आलेलं कायी लोक टेसन मास्तर व्हऊन गेले आणि तुमी अजून डेपुटीच -हायलात, हा काय कमी जुलूम हाय ? ठीक हाय म्हनावं नि काय !

डे. मा. : आता कसं बोललास ! या भ्रष्ट दुनियेतून सहीसलामत बाहेर पडायला मिळालं, की गंगेत घोड न्हायलं म्हणून समजायचं, बाकी रेल्वेमधे अब्रू, न्याय, खरेपणा आता राहिलाय कुठं ? जा आरामानं भाकर खा. मी जातो. मलाही आज बरं वाटत नाही, कुठं गेला भैयाजी ? जय रामजीकी !

भैया : (बाहेर येऊन) हां साब, जय रामजीकी, जय रामजीकी !

बाघर : सायेबजी साब आवजो ! (डे. मास्तर जातो.) लयी बेस मानूस ! कुनाचंबी काम करतो, रेललाइनमधे असा दुसऱ्यासाटी झटनारा मानूस इरलाच.

भैया : बडे खानदान आदमी है. नही किसीकी खटपट. आप भला, अपना काम भला. वो दुसरा असिस्टंट है. वो तो कुत्ताका अवतार जैसा है. ओर ये देखो, कैसा भला आदमी !

बाघर : व्हय-व्हय ! चला, भाकर खाऊन घेतो. (करंडीकडे नजर जाते.) ए, करंडी कुनी खोल्ली ?

रूखी : (बाहेर येऊन) कुनी न्हायी खोलली ! हां—बांदून दिऊ ? उगी वरडू नका.

बाघर : अग ए मूर्खे. अर्दी करंडी पाह्यली सायबानं तर चिडल ना तो ? तुला न्हायी समजायचं.

रूखी : काय जालं त्यात ? दोन संत्रं नारणासाटी काढून ठेवली तर ? बिचाऱ्याला फल न्हायी पन निसतं सालसुद्दा बगाया मिलत न्हायी, नि सायबाला कुटं कलनार हाय ? अशा कित्ती करंडया सायबाकडं आल्या असत्याल.

बाघर : येत्यात ना, म्हूनच त्येला समजतं—

रूखी : काय समजतं ?

बाघर : तो साला मोजतो फलं नि मागून इकून पैसा करत्यो.

रूखी : द्येवाच्यान् ?

बाघर : बाटली मिल्ली तर दोगं मिलून पितील. आन् जादा बाटली मिल्ली तर वरल्या सायबाला पाटवून दियील. साला आयला. सारं खाया होवं.

रूखी : हं—चला. तुमीच बसता खाया की नारणाची वाट बगता ?

बाघर : अजून न्हायी आला ?

रूखी : आला त्यो नि तुमच्या पाठी न्हाया गेला. आन् परत जानार हाय. नाताल हाय म्हनत व्हता.

बाघर : बराय. येऊ दे त्येला. चार दिसानी सगल्यानी मिलून खाऊ. फिरून थितंच गेला तर कुनास ठावं !···त्या बिचाऱ्याला जोन्स सायबानं बदडलं.

(दरवाज्जासमोर हातात बत्ती घेतलेला कॉलबॉय प्रवेश करतो.)

कॉलबॉय : एय् बाघरजी, चल.

बाघर : कोन ? कॉलबॉय ? आता काय हाय ?

कॉलबॉय : तुला जाया सांगीतलं हाय रातच्या गाडीला.

बाघर : का ? मरायला ? न्हायी जायाचं मला.

कॉलबॉय : तसं न्हायी चालायाचं. इसपीसल हाय लाट सायबाची. गोरा आगवाला कुनी न्हायी आज. जेनिंग, डिमेलो, ब्राउन सारं नाचाया गेल्यात. बिल्कीला चढवलंय कारन डरावरखाना रिकामा हाय. पयला आगवाला तू हायस आन् दुसरा कुनी मिलतो काते बगाया होवं. मुकादम गेलाय शोधयास.

बाघर : अरे पन हा आत्ताच आलो न्हव का गाडी सोडून ? आंगावरला मळ काढून हा बसतोय तो तू आलास. आता न्हायी जानार.

कॉलबॉय : मुकादम चिडल बाघरजी. नि दीस कापल ते वायलंच.

बाघर : पन अडगेष्ट कसा जाऊ ? हा खवाटा निकामी झालाय दुसरा आगवाला नुस्ता ठोंब्या. आखी रात्र कोळसं फोडून फोडून हात दुखून गेलंत नि शिगनल बगता बगता डोळं सुजून गेलेत. न्हायी, वावा न्हायी—

कॉलबॉय : जान्याबिगर तुजी काय सुटका नाय. तुज्यामुलं गाडी अडून न्हायी न्हायची, पन आरडर हाय. तुला जावंच लागल. घे ह्ये. सयी कर याच्यावर.

(रूखी बाहेर येऊन हे सर्व ऐकत असते)

बाघर : न्हायी रे बाबा ! नेमापरमानं मला चोवीस कलाकाची इश्रांती होवी. दोन अख्ख्या रातीची जागरनं, खायाचं नाव न्हायी. आठ दिसात एक दीस तरी घरात न्हाऊ द्या.

कॉलबॉय : बाघरजी, ठीक न्हायी ह्ये ! मुकादम सवता आला तर जड जायील, आज कुनाचं डोचकं ठिकानावर न्हायी. त्यो बी पिवून बसलाय.

रूखी : मग काय जालं. ते न्हायी येनार. जरा बसू तर द्या. उबं न्हायचीसुद्धा गत न्हायी त्येंची. कंपनी काय त्येना डबोलं द्येनार हायत् जनु ! अरे, काल माजा नारण सालपटं आणायास कारखान्यात गेला, तवा तर तुमी सर्व त्येला खायला उटलात. आन् त्या सायबासाटी टोपली टोपली कोलसं नि राकेल जातं त्येचं कायी न्हायी.

कॉलबॉय : रूखीबाय, या सान्या खजाळी हिथं नका करू. ही रेलवे हाय.

हितं लुटतो त्येचा माल. नि पकडला जातो त्यो चोर. नारणला नको म्हनाया मी न्हवतो थितं.

रूखी : तू नसशील बाबा तर दुसरा. पन कायसा तुज्यावानी कारखानवाला. चार सालपटानं कंपनीला भीक नसती मागाया लागली. भर दोनपारा आज एक राकेलचा डिब्बा डिलो सायबाच्या बंगल्यार जाताना मी पायला आन् हितं बोटभर वात पेटवायला तेलाचा थेंब न्हायी, बाबा, मला जास्त बोलायला लावू नगस.

कॉलबॉय : तुजं म्हननं खरं असल, रूखीबाय, पन आता पुरं. आता या गोष्टी बाजूस न्हाउ दे, अजून मला बारा बंगल्यावर रखडायचं हाय. बाघरजी, सही कर यावर. दोन वाजता फोर टुवेंटी टूमधे आग पेटवायाची. इसपीसलचा टाइम बराबर तीन. म्हंजे आर्धी रात एक नीज काढायची.

बाघर : नुको बाबा, नुको. मला सतावू नुको. मी जानार न्हायी.

कॉलबॉय : जाया लागल बाघरजी. अं ह, ही फरूटची करंडी कुठून आणलीस ? पैसं कुटून देनारहायेस ? कोपरेटी कंपनीचं घेनं तर अजून बाकी हाय. नोकरी गमावली आज तर हाये का कुनी तुजं चालवायला ? चल, सही कर, की मीच करू तुजी सयी ? विजन चांगलं हाय. एच कलास. फोर टुवेंटी टू. घे चल.

बाघर : डरावर कोन हाय ?

कॉलबॉय : अजून ठरलं न्हायी. आता हितून तिथंच जायाचंय. फार करून जोन्स साबची टन असल.

बाघर : जोन्स साब ? छे, छे, कोलबॉय परत जा, मी येनार न्हायी. हे भगवान् ! मला नको ही नोकरी. आखी लाइन बगता डोलं फाटत्यात, विजनात कोलसं घालायचं त्ये येगलच. लाइन क्लीअर घेताना दमछाट व्हते. अरे बाबा, अजून छातीचं दुखनं निपटलं न्हायी. वाऱ्यामुलं छातीला तरास होतो. न्हायी बाबा, न्हायी.

कॉलबॉय : मंग इस्पीतलात जात का न्हायोस ? भल्या मानसा—

रूखी : कशाला इसपीतलात ? आताच ते आल्यात. आनि पाह्यलं

तुमचं ते इस्पीतल. सकाळच्या पारी दोन घंटा उन्हात तापायचं तवा कुटं डागदरला फुरसद मिलते नि तपासत्यात. नि कागदावर खरडून घेत्यात. रोग काय हाय ह्ये इच्चारीत पन न्हाइत.

(रामचरण बाहेर येतो.)

रामचरण : ये क्या खिटपिट लगाई है ओर ?

रूखी : हं—इचारा आता भैय्याजीला इस्पीतालची बात. दोन दिसांपासून ह्ये पन थतं चकरा मारत्यात.

रामचरण : अरे अस्पताल का नाम मत लो. ओ तो दवाईखाना है या कसाईखाना ? उधर जाते वो कभी अच्छा होता नही, ओर सफाईखाने मे सोता वो कभी बहार आता नही. बहादरकी दवाई लेनेकु रूखीबाई गयी, तो रूखीबाईका नामसे ही दवाई दे दिया ! ओर इसमे देखो तो विलायती नमक. नही पूछता के नही देखता के क्या दरद है ! बडा दाकतर तो बडा अंधा हे भाई !

कॉलबॉय : बरं बरं ! बघ हं बाघरजी, मला उशीर होतोय. इकडं बघ, तुज्या नावाची निशाणी करतोय. दोन वाजता ये. जय रामजीकी भैय्याजी.

(जातो.)

रामचरण : अरे ! ये क्या ? डयूटी आयी क्या ? अरे अबी तो आया. ओर ये क्या तमाशा भाई ? ए कोओी साबकी इसपेशल है की मैयत ? सारे दिन वो हैरान हैरान कर रहे है.

रूखी : आता बगा ना रामभैय्या ! काय जुलूम हाय ? हे आले तवा पासून जीव नसल्यागत पडलेत. ही रेल्वे तर जीव घेया बसलीया. चला उटा, नका जाऊ पण दोन घासतर खाऊन घ्या. हा नारण पण आला बघा.

(नारण आल्यानंतर सारे आत जातात.)

रामचरण : हां-हां, खा लो भाई, हमने भी खा लिया. ओर थोडी देरमें हमको भी जाना है. ओ ईसपीशलने तो वडी मुसीबत लगाया. जाओ भाई, जाओ ! हम भी तो जरा गाना लगाते—

(भैया आत जातो. ढोलक व फुटलेली हारमोनियम पेटी घेऊन येतो. एकतारीही आहे. आणि ओटयावर बसून गाऊ लागतो.)

(भैरवी)

तूने अजब बनाया रेल ! रामा. तूने अजब बनाया रेल !
जठर अग्नि ओर सांस धूंवा का, ये मायाका फेल ।
तनका इंजिन छुक छुक चाले, बडा बनाया व्हेल, तूने.
        संसार सडक पर चलते चलते, खूब उडाया स्हेल.
नसीब घंटा हरदम बजता, बहोत लगाया टेल । तूने.
कफकी खखरी चली रहेली, कालसीटीसे प्हेल.
        अरे मुसाफिर, चपटी में सब खतम होयगा खेल । तूने.

(तो गात असता बाघर आणि नारण बाहेर येतात.)

बाघर : खरंय भैय्याजी ! खेल चुटकीत खतम होनार हाय.

रामचरण : रामचद्रकी जय, भाई !

नारण : आये, जातो ग, उशीर व्हईल बघ. टेनस संपल्यावर शीधा ठेसनवर जाईन. वेटिंगरूममधे पंखा खेचायचाय.

रूखी : जा बेटा !

(नारण जाऊ लागतो.)

बाघर : ए नारण हिकडे ये. घे यातलं एक संत्रं खा.

नारण : नको बाबा, आता भूक नाय. नि ती बंगल्यावर न्यायची हायत ना ?

बाघर : बाकीची न्हेइन. तू खा बेटा !

नारण : (एक फळ घेत) बस.

बाघर : हं, जा आता. हे बग, या खेपेचा तुजा पगार तुज्या मायकडं नग देऊस.

नारण : मग ?

बाघर : तुज्याकडंच ऱ्हाउ दे. किती ? पंखा चालवतोस ते पाच नि कलबचे दोन म्हंजे सात मिळत्याल न ? कपडे शीव थोडयाचे.

नारण : पण बाबा, साच मिळत्याल. त्यो चेंडू इरीत पडला ना त्येचा एक रुपाया दंड होइल ना ?

(रडवेला होतो.)

बाघर : बरं, ऱ्रं ! जा बेटा ! एक रुपाया मी देईन तुला, जा !

रामचरण : बहोत अच्छा लडका है. सारा दिन जहेमते उठाता.

बाघर : भैय्याजी, माझा एकुलता एक हाये. हायेवढा···

(कॉलबॉय कंदील घेऊन परत येत आहे.)

रामचरण : ये क्या सितम है भाई ?

बाघर : कॉलबॉय हाय त्यो, भैय्याजी.

रामचरण : यही हय, अभी फिर क्यो आया ? ओर बत्ती भी लालहरी क्यों करता है ?

बाघर : देवाला ठावं !

(कॉलबॉय येतो.)

बाघर : भैय्याजी, म्या म्हटलं कालबायच त्यो हाय, खरं ना ?

रामचरण : तुम भी बडे अच्छे हो भाई ! क्या ये लालहरा तमाशा करते हो ? बोलो, अभी किसके मोतका पैगाम लाये हो ?

कॉलबॉय : कायी न्हायी भैय्याजी. तुमी भजन गात न्हा. बाघर, चल मुकादम बोलावतोय.

बाघर : पण आताच का ?

कॉलबॉय : असंच. आज राती कायी तरी घडनार हाय. दिवाली हाय ना त्या गोऱ्या लोकांची ! थ्री टुवेंटीवन डाउन कॅन्सल जाली. लाइट एंजीन जानार. तुजी पाळी आताच हाय. पहिली मेल.

बाघर : पन इसपेशल ?

कॉलबॉय : इसपेशल बिसपेशल कायी न्हायी. फोरमन आला नि सारं टाइमटेबल बदलून टाकलं त्यानं.

बाघर : कोन कुगी साब ? त्येनं सवता ?

कॉलबॉय : हां, हां. इसपीसलमधे गोरा डायवर आन गोरा आगवाला दोघं ए कलासमधून जात्याल. रुस्तुमजीला फास्ट दिली. आनि पीरमहमदला सकाळची लोकल दिली नि आखी रात फोरमनला कारकान्यात बसवला इसपीसल जायच्या पहिली सा कलाक आनि ती गेल्यानंतर दोन कलाक दरेक कारकान्यावर सकत पहारा अशी आडर सुटली हाय. आन इस्पेर एंजीन

तयार ठेवायचं. बरं, चल. तुमाला आताच गाडीच्या एंजीनला आग घालायची हाय, टू सेवन नाट.

बाघर : टू सेवन नॉट ? अरे ती तर कारकान्यात पाटवायचीय.

कॉल्बॉय : तिच्या दोन टरीपा उशरानं व्हतील म्हनून तर पहिल्यानं बोलावलय. इस्टीम पाइप वगैरे पाहून घ्या. तेल, वायर सर्व मागून घ्या. दिनमणी शंकरानं इस्टोर खोललाय, चला, जलदी करा. मी जातो.

(तो जातो.)

बाघर : भैय्याजी, जय रामजीकी !

भैय्या : हा भाई ! दुसरा क्या हो सके ?हम भी जाते हे अभी. देखा ? 'नसीब घंटा हरदम बजता...'

रूखी : (बाहेर येऊन) कुटं जातायसा ?

बाघर : बगितलं न्हायीस, कॉलबॉय येऊन गेला ना ? फोरमेनची ऑडर हाय, गेलंच पाह्यजे.

रूखी : पन दोन वाजता जायाचं व्हतं ना ? आन् तुमी तर जानारच नव्हता.

बाघर : रूखडी ! येडी कुटली ! थकलो व्हतो म्हून बोलून गेलो झालं! कॉलबॉय काय म्हनला त्ये ऐकलं न्हायीस का ? ह्ये तुजं लुगडं बघ, नारणाची दशा बग, घरात आन्नाचा कन न्हायी, आनि तिथं बिचारी म्हातारी एकटयानं टोपल्या टाकून लोकांची घाण उपसत असल. मी जाऊ नग तर काय करू ? शरीर चालतंय तवर चालायचंच ह्ये, न्हायीतर आहे रामराम !

रूखी : माजी आन हाय ! काय व्हइल ते व्होव् दे, तुमी नग जाऊ.

बाघर : येडी की काय तू ! समद्याचा इच्यार कर. डोईवर चढलेल्या द्येन्याचा इच्यार कर. या रामभैय्याचं किती...

रामचरण : अरे भाई, हमारा तो नाम छोड़ो ! जरा छूट होवे तब देना. उसका फिक्र मत करो.

बाघर : ह्ये तुमचे उपकार हायती, भाई ! पण कायी सूट मिळाया होवी. हाये का उसंत ? 'कालकी सीटी बजे' की मग कसली चिंता ? चल आन माजं फडकं.

(आत जातो.)

रामचरण : अरे वाह् जी ! भजन तो तुमने बडा याद कर लिया !

रूखी : पन भाकरीचं काय ? कदी व्हनार नि कदी नेनार. अजून भांडी नाही घासली. रामभैय्याजी, येंच्या छातीत रोज दुखताय. एका बाजूला रातच्या गाडीचा वारा नि दुसऱ्या बाजूस गाडी-तल्या आगीचा जाळ नि फावडा भरून कोळसं घालीत राह्यचं. हात नाही का दुखत ? आगवाल्याची काय जिंदगी ही ! आठ दिसात एकदा पण घरी यायला मिळत न्हाय. न्हायी पुरं खानं की न्हायी पुरं अंथरूण झोपाया. परमेशरा, तुलाच र काळजी !

रामचरण : सच हय बाई ! पासींजर जानत के दो रुपये का किराया दिया ओर गाडीमें बैठा के चला गाम. लेकिन नही जानता के बैल घोडे मे भी आदमी बेहाल होते है. आगवाळेके पसीनेसे तो सारे एंजीनकी आग बूझ जाय.

बाघर : (मळके कपडे केलेला बाहेर येतो.) ह्ये परमेशरा ! रूखी, छातीत दुखतंय आज. साल जायाचं जमनार न्हायी !

रूखी : मी काय सागीत व्हते ? कायी न्हायी जायाचं. आण हाय माजी ! फोरमन गेला खडयात ! तुमी हात तर सारं !

बाघर : रूखी, रूखी, पोट काय सुटतंय ? (खाली बसकण घेतो.)

रामचरण : अरे बाघरजी, हिम्मत रखो, राम का नाम लो. सब अच्छा हो जायगा। छाती दुखती है सीक रपोट दे दो. रेलवइके लिये क्या जान देंगे ?

(मळकी पाटलोण आणि सदरा पेहरलेला माणूस बत्ती आणि कागद घेऊन येतो.)

रामचरण : ये कौन हयवान आया अबी ?

बाघर : (दूरवर पाहून) कोन ? आ—हा तर इस्टोरकीपर दिसतोय.

रामचरण : यहॉ रास्ता मिला उसको ?

स्टोअरकीपर : ए, बाघरका घर कौनसा ?

रूखी : का-काय हाय ?

स्टोअरकीपर : किधर हय बाघर ? ओ एई ! चलो चलो, कॉलबॉय बोला के

नही ? एकदम चलो.

बाघर : हम नही आ सकता. हम सीकमें जाता.

स्टोअरकीपर : अरे चलो. सीकमे जानेवाला नही देखा तो. क्या हो गया इतनेमे ? दिखता है तो पट्ठा जैसा, चलो फोरमन चिल्लाता है.

रूखी : चिल्लाता—तो चिल्लू दे. आज ते यायचे न्हायीत.

स्टोअरकीपर : तुम हमारी साथ जास्ती बात मत करो. चलो एई, हम तुमकू घसट कर ले जायगा.

बाघर : अरे बाबा, माज्या छातीत दुखतय. जरासा पण जोर न्हायी बाबा ! मी ढोंग न्हायी करत.

स्टोअरकीपर : बखत जाता. आता के नही ? नही तो डिसमिस कराता है, बोलो ?

रामचरण : अरे इसकी हालत तो देखो ! दूसरा कोओ आगवाला मिलता के नही ? बस ये हो बाघरजी हो दिखता. अभी तो आया. अंडररेस्ट कैसा जा सके बिचारा !

स्टोअरकीपर : (हात पकडून) चलो, कायदा बताता है हमको, अंडररेस्टवाले आये ! बौत देखा ऐसा.

बाघर : भाई, येतो मी. रूखी मी जातोय. नोकरी करनाऱ्यानं कदी बादशायी भोगलीय ? जमायचं न्हायी. नारण माजा मोटा होयीस्तवर शरीर झिजवाया होवं. संबाळ ग. रामभैय्या, जय रामजीको !

रामचरण : क्यो, जाते हो, बाघरजी ?

बाघर : जाया होवं. बगत न्हा यांना. भाई, पोट आहे ना, काय करनार ! आता नोकरी गमावली तर कोन दारात तरी उभा करील व्हय ?

रामचरण : जय रामजीकी !
(दोघे जातात.)

बाघर : (जाता जाता) रूखी, धीर धर.

रूखी : (रडत) बरं का, संबाळा जिवाला, रामभैय्या, किती दिस सहन करायचं ह्ये ? असं वाटतं...हे परमेशा...कुटं दडून बसलाय हा परमेशर ?

रामचरण : रामका नाम लो बाई, सब अच्छा हो जायगा.
(भजनाची एक ओळ गातो.)

रूखी : हा काय कमी जुलूम झालाय ? रामभैया ! आगवाल्यानं दोन तास अदुगर जायाचं. एंजिनात आग घालायची. तेल बगायचं. तपासायचं सारं. नि डरावर सर्वांच्या शेवटी राजावानी डोलात जातो, पगार याचा रोजी आठ रुपये, धा रुपये आनि आगवाल्याला कशेबशे धा आनेभी मिलत न्हाय० शिवाय ह्ये मोठं कोलसं फोडायचे, आग टिकवायची, शिगल पाह्यचा, लेनक्लीअर बघायची, गाडी बिघडली की काय ते बगनं येगळंच, एकल्या मानसानं काय काय म्हून करायचं ? जीव द्यायचा त्यानी ?

रामचरण : रेलवेइकी बात मत कहो, ओ तो सब जूठा, सब पोल, बडा घोटाला. टराफीकमे देखो. लोकोमे देखो, अंजीनरीमे देखो, ओर अलेक्ट्रोमे देखो, सब लाचरुश्वतसे सडे हय. ओर गरीब की तो पूछो मत, किसीकी दाद न फरियाद. पीला टंगा ओर टोपस लगाया के साब अफसर बन गया. चलती हे ! राम-रामजी ! रोटी तय्यार करो, बाई.

रूखी : खरं सांगतायसा, पन घासलेटबी न्हायी घरात,

रामचरण : ये रखो हमारा फानस, तुमको जरूरत नही,

रूखी : भैय्याजी, तुमचा शेजार हाय म्हून आमचं कसं तरी भागतंय.

रामचरण : अरे रामका नाम लो.
(दोघे आत जातात. दोन साहेब हातात टेनिसची रॅकेट घेऊन दरवाज्याकडे
जाताना दिसतात. एकाद दुसरा पिऊन तर्र झालेला साहेब मडमसह जाताना दिसतो. रूखी नळावर पाणी आणण्यासाठी जात येत असते. ती जात असता त्याच [illegible]शेनं जोन्स तिच्या-बरोबर चालू लागतो. प्यायला आहे, थोडी [illegible]ढलेली आहे.)

जोन्स : एय्, एय्, यु गर्ल, सुनटा नही ब्लडीस्वाइन !
(रूखी आत निघून जाते.)
एय्, किधर गया ? एय् छोकराकी मा ! ब्लडी फाइन आव.

(विहिरीच्या काठावर बसतो.) हेय्, इसमें गया है बोल ? छोकरा, छोकरा, आ...सब मर गया है (उभा राहातो— झोकांड्या खात रूखीच्या झोपडीकडे जातो.) टरालालाला ...हेय्, अमेरी साथ बोलो, बाट करो, हेय्, इधर आव.(रूखी दारात येऊन उभी रहाते.) हेय् डिअर (तिला मिठी मारण्यासाठी पुढे होतो,)

रूखी : मागं फिर. मेला, दारुडया !

जोन्स : ए, हम पैसा डेटा है.

रूखी : सत्यानाश व्हइल तुजा. चल, चालता हो हिथनं.

(दार बंद करायला जाते, जोन्स लगेच आत शिरतो. पण आतून जोराचा धक्का मिळाल्यामले तो धडपडत ओसरीवर येऊन पडतो. रामचरणही लगेच बाहेर येतो.)

रामचरण : ए, क्या नवा नवा टीक टीक आया—ये कोन जोन्ससाब ? अरे, जाओ यहांसे. ये डरावरखाना नही.

रूखी : मेल्याला मारा चांगला. रामभैया, आत आला व्हता नि कायमंसं घाण घाण बलत व्हता.

रामचरण : ये नयी बला ! रामराम ! रात कयसीही जायगी. एय् जोन्ससाब, चले जाओ यहासे. कैसा गंदा है. इसका रपोट भी कैसा करे ! कौन सुनेगा ? (त्याला धरून उभा करतो आणि ढकलतो.) जाओ इधरसे. नही जायेगा तो रामदंडा फिराऊंगा.

जोन्स : यू ब्लडी स्वाइन. चुप रहो. तुम कौन है ?

रामचरण : अरे तेरा बाप भैरव है. जाता है या नही ? सीधा सीधा चले जाओ.

जोन्स : डॅम यू. ब्लडी बदमाश. हम मारेगा टुमको.

रामचरण : एई, मुं समालके बोलो, गाली मत दो. मारनेवाला नही देखा तो. (आतून दंडा आणून दाखवतो.) बोलो, अबी क्या हिसाब है? जाना हे या नही सीधा सीधा ! नही तो जमीन साथ सपाट कर दुंगा.

जोन्स : (जाता जाता.) यु डॅम्, हम मारेगा तुमको. ब्लडी रोग. (जातो.)

रामचरण : मारेगा ! अबी ओलाद खतम कर दूंगा, बदमाश. जाओ काम करो. बाई, ये आंगलीस दिवाली तो देखो ! साब बना है ! कहांके साब ? आप कौन, मा कौन. राम जाने. गॉटपिट किया तो क्या डर गये ? जानवर जैसा. अखो रेलवईकी खराबी करते वो लोक !

(रूखी आत जाते. कॉलबॉय परत आलेला दिसतो.)

कॉलबॉय : अरे रामभैया ! तुजी गाय आज अशी का सोडलीयस ? कॉकसन साहेबाच्या बंगल्यातली झाड तिनं उपसून काढली. तो चिडलाय नि त्यानं गाईला झोपडून काढलं. तिला बांधून ठेव खुंटीला, न्हायीतर बाघरजीला दंड करील तो.

रामचरण : अबे चल बे, दंडवाला ! बाघरजीका दंड किस लिये ?

(रूखी बाहेर येते.)

कॉलबॉय : आमाला काय ठावं न्हायी. गाय बाघरजीची नि पाळतो तू !

रामचरण : तो क्या हुआ ? गुन्हा किया ? क्या ओ कोकसने उसकू मारा ? ठीक है, अभी देखता हूं.

रूखी : भैयाजी, आमच्या पायी तुमी संकटात पडू नका.

कॉलबॉय : अरे हां, बाघरजी गेला का ? मी सांगाया इसरलो, रातच्या इसपेशलच्या वाटेला मशालजी उभा करायचाय. त्यासाठी नारणचं नाव नोंदलय. आठ आने मिळत्याल त्याला.

रामचरण : कायका नाम ?

कॉलबॉय : ही इसपेशल जवा जायल ना, तवा गाडीच्या लाईनीवर मशाल घेतलेली मानसं उभी ठेवायची हायत, त्यात हाय त्येचं नाव. मला माहीत व्हतं नि मी त्ये केलं. टेशनावर फोन आला व्हता तसा.

रूखी : भैयाजी, काय म्हनताय हा ?

रामचरण : अरे कुछ नही. जाओ. सारा दिनभर तो वो नोकरी करता, रातकु भी नोकरी करता. ओर ये ठंडीमे किधर खडे रहे वे ओर कैसा खडे रहे वे ? जाओ तुम.

कॉलबॉय : माजं काय—असं चालल काय ? न्हायी गेला तर त्याला दंड व्हइल. एक नारणच थोडीच जाणार ? कुनाकुनाची नावं

नोंदली ह्यायत तिथं.

रूखी : अरे पण कशासाठी नाव ?

कॉलबॉय : रामभैय्या सांगल तुला सारं, रूखी. टेसनावर जलदी धाडून दे. (विहीरीपर्यंत जातो आणि तिथेच घुटमळतो.)

रूखी : भैयाजी, ह्ये काय चाललाय ? आज ह्ये गाडीर गेल्ये ते भाकरी-शिवाय गेले. भाकरी तर अजून करायचीय. ते येनार कवा नि भाकरी घेऊन जानार कवा ? नारण गेलाय वेटिंगरूमवर पंखा खेचायला. मेल्याना या थंडीत पन गरमी लागत्ये.

कॉलबॉय : त्यापायी तर दोन रुपये मिळत्यात. ह्ये कशापायी बोलत्येस ?

रूखी : भैयाजी, सांगा, भाकरी खायला टायम मिळल काय ? मी आता करते, नि गाडीवर लवकर पोचल काय ?

रामचरण : हां—सब हो जायगा. नही तो मे ले जाऊंगा. अभी तो गाडी निकलनेकु देर है.

कॉलबॉय : (जाता जाता) रामराम भैयाजी. तुमची की बाघरजीची गाय जाग्यावर बांधून ठेवा. नाहीतर फुकट गमावाल. (जातो.)

रामचरण : (जरा थांबून पुढे येत.) एई कॉलबॉय, एई कॉलबॉय, (आवाज —काय व्हो ?) इधर आओ, जरा इधर आओ. सुनो, आज बहोत दफे तुम इधर आया—अबी फिर जो इधर आया तो मैं तुम्हारी गरदन पकडकर ये कुवेमे डाल दूंगा.

कॉलबॉय : हा-हा-हा-हा (हसतो) भैयाजी, शांत व्हा. जरा थंड व्हा.

रामचरण : अरे हसता क्या बेवकूफ ? ये कुवेमे फेक दूंगा. (कॉलबॉय लालबत्ती हालवीत हसत जातो रामचरण भैय्या चिडलेला उभाच असतो. पडदा पडतो.)

अंक १ ला

प्रवेश दुसरा

पात्रे

लल्लू, डाभई, जीवी, झंखी, मेलभाई
गुलाम महमद, कॉलबॉय

रात्रीची वेळ. कारखान्याच्या बाजूच्या भिंतीला लागून असलेली अरुंद जागा. काळा पडदा. (मागल्या बाजूला पहिल्या प्रवेशाचा देखावा असेल तो बदलून तिसऱ्या प्रवेशाचा देखावा तयार व्हावा.) मेलभाई, लल्लू, डाभई, गुलाम महमद वगैरे क्लीनर मळलेल्या काळ्या कपडयात बसलेले आहेत, येताहेत. दोन बत्त्या समोरा समोर आहेत आणि एक लहान तेलाचा दिवा बाजूला पेटत आहे. बत्त्यांचा प्रकाश हाच प्रकाश.

(सर्व बसले आहेत, दोन बायका टोपल्या घेऊन येतात. सारा वेळ एंजिनचा आवाज, व्हिसल, खडखडाट वगैर मधून मधून चालू असतात.)

लल्लू : मेलभाई नाही आला ?

डाभई : आला व्हता, थोडा उशीराच. मुकादमानं हाजरी घेतली न्हायी म्हून किरपाशंकरकडं गेला हाय.

लल्लू : हा मुकादम मेलभाईवर जळतोय. मेलभाई बिचारा भला माणूस ! कुनाचे नावसुद्धा घेनार न्हायी.

डाभई : ह्येच तर दु:ख हाय. रेलवेला भल्या माणसाची चाकरी मानवत न्हायी. एकदा फोरमनसमोर मेलभाईनं मुकादमाला अटकावलं. त्या दिसाचा मुकादमाच्या मनात दूख हाये. देव जाणे मुकादमाचा दिल ! समजलासा, लल्लूसंग !

लल्लू : मी ?

डाभई : बायकाना पन पिडतो. त्या गुलाम महमदनं नाही दम दिला असता तर त्यो ताब्यात राह्यला नसता.

लल्लू : हां-हां. गुलाम महमदला त्यो फार भीतो. गेल्या महिन्यात जवा पगार जाला तवा त्याच्या हाती पगाराच्या तीन पुड्या आल्या. पन गुलाम महमदला ही खबर कळली तवा त्यो सरळ त्याच्याकडे गेला नि त्याला असा दम दिला···

डाभई : कुनाचा पगार हा ?

लल्लू : एकतर आपल्या बाघरजीचा नि दुसरा रतनीचा नि तिसरा रघलीचा. सर्व मिळून पासष्ट रुपये.

डाभई : गुलाम महमद कसा बाइलर सारखा आहे. तसा तो भक्कम. एक दिली तर दुसरी मागणार नाही असा.

लल्लू : देवमानूस ! गरीबांचा मोठ्ठा वाली !
(दोन बायका येतात.)

जीवी : ए, कोण बसलाय तो ? लल्लूसंग का ? नि डाभई ? झंकी ! जरा टोपली ठेव. जरा शेकून घेऊ या.

लल्लू : बस-बस जीवीबेन ! जरा बस खाली. शेकून घे. आता कुठली गाडी भरायची राह्यलीय ?

जीवी : अरे मान भरलीय बघ, चल रे बाबा ? ही इसपेसल म्हंजे मरण हं ! एयशी टोपल्या तर म्हमईवाल्या गाडीनं खाल्ल्या. नि थोडया डुमकलासमधे टाकल्या. आनि आता मेलगाडी भरायची ती येगळीच. एक टोपली भरली तर जास्तीत जास्त कुठून तरी दोन दिडक्या मिलत्यात. आन त्येच्यातून मुकादम कापतो त्यो कमीच.

झंखी : सत्यानाश व्हइल त्या मेल्या मुकादमाचा !

जीवी : न्हय ग, आत्ता ह्यो झंखीच्या मागं लागलाय. म्हनत्यो कसा,

पाच रुपया देशील तर रघलीचं नाव नोंदून घ्येयीन. ती बिचारी कुटून आननार ग पाच रुपये ?

डाभई : त्येला न्हायी बाइल की न्हायी पोर खानारं. कुनासाटी ही पुंजी जमावतोय ?

जीवी : बायको न्हायी म्हनूनच गावच्या बायका धुंडालतोय ना !

झंखी : हाय ना. बायको हाय. पन धाडलीन तिला बापाकडं. संगतीला ठेवली तर कसं व्हइल ?

लल्लू : ज्येचं करम त्येच्याकडे ! किती जनांचे शियाशाप खातोय तो !

झंखी : कुत्र्याच्या मोतीनं मरल तो, बगा तर माजं शबूद. मुडद्यावर कुनी पानी बी न्हायी घालनार !

जीवी : चल उठ ! त्या नालायकाची गोष्ट कशाला ! त्या काळ-तोंडया गाडया भरायच्या हात ना !आनी रात पडाया आली.

डाभई : हां. आत्ता त्यो शिट्टी देइल बघ.

झंखी : चल ग.

लल्लू : ये बरं का जीवीबाय !

जीवी : ए चलते ना ग ?

डाभई : लल्लूशंग, या असल्या थंडीत बायकांना रातपाली देत्यात हा जुलूम न्हायी ?

लल्लू : काय करतील बिच्चाऱ्या ! पोट हाय ना साऱ्यास्नी !

मेलभाई : अरे राम !

(मेलभाई आणि गुलाम महमद येतात.)

डाभई : काय मेलभाई, थकलात ?

मेलभाई : टनटेबलवर गाडी फिरवली नि पुढे काय झालं ते गुलामभाईना विचार.

गुलाम : काय विचारतोय ? या मुकादमाला एक दिवशी नदीवर न्याव लागणार आहे.

लल्लू : का ? काय नवी भानगड तर उभी राहिली नाही ना ?

गुलाम : भानगड कसली ? त्याचे दिवस भरलेत. हरामखोरानं बाघर-जीला आता मारलं. मी नसतो तर भलतंच झालं असतं. अंडर-रेस्ट तो, का म्हणून जाईल ? साली इसपेशल जाऊ दे

जहान्नममधे. विचाऱ्यानं थोड जास्त तेल मागितलं. साली गाडी एकदम पोची. इस्टीम लीक होते. वाक्युम टयुब ठीक नाही. काय करील ? तरीसुद्धा तो जायला तयार झाला, तर त्यानं मारलं.

मेलभाई : घेतली होती बरीच. डोळे तर पहाण्यासारखे होते.

गुलाम : डोळेच काय ? तोंड नि जीभ कुठं ठिकाणावर होती ? मी तर डोळे पहाताच समजून चुकलो.

मेलभाई : गुलामभाईला पाह्यलं नि थंडा पडला.

गुलाम : थंडा झाला नसता तर आज एक लगावली असती (हसत) साला···साला (उभा राहून नक्कल करतो.) मी जरा असा गेलो की तो मागे हटे. अरे गाडीचं चाक जसं फिरतं, तसं त्याचं डोकं फिरत होतं. (बसतो) ए भाई, काढ तुझी पोतडी. पोटाचा विचार जरा करशील की नाही ?

डाभई : अजून तुम्ही भाकर न्हायी खाल्ली ?

गुलाम : काय खाणार ? आठ वाजल्यापासून हे चालू होतं. दोन तर गाडया फिरवल्या टनटेबल जाता येता.

लल्लू : दुसरी कुठली गाडी ? एक तर दहा वाजता फिरवली.

गुलाम : आता इसस्पेसीलशिवाय बात नाही. टू ट्वेन्टीनाइनचं सालं टनटेबल इतकं जाम झालंय आता. जरासुद्धा हालत नाही. (खायला सुरवात करतात.)

मेलभाई : गुलामभाई लोणचं घ्या !

गुलाम : बस्स बाबा. जास्त घालू नकोस. डोकं तापलं ना तर मुकादमाशी मुकाबला करावा लागेल. (सर्व हसतात.)

लल्लू : आज रात्री डुलकी खायचीसुद्धा आशा नाही.

डाभई : आज रात्री नी रोज रात्री ! नवंजुनं काही घडतंच. आज तर फोरमननं इथंच टेचर टाकलंय.

लल्लू : हा साब, चार वाजेपर्यंत इथं-हा नार आहे.

गुलाम : साला डरताभी कयसा ! साथमें बंदूक रक्खी हय. जर एक ठोसकली ना तर त्याच्या फासळ्या कोळशाची भुक्की होऊन पडतील.

मेलभाई : भाकर खा भाकर ! गुलाम महमद, मधेच त्याचं नाव घेऊन खाणं खराब करू नका.

डाभई : हा काय कारखाना आहे ?

गुलाम : ए बाबा, सारेच असे. माझा भाऊ पीरमहमद डायवरमधे फिरतो. तो पण यांच्या याच गोष्टी सांगतो. त्यानं या लायनीतला सारा डायवरखाना नि कारखाना पाहिलाय. सहा सहा महिन्यांनी त्याची बदली होई. त्यामुळे तो अख्ख्या लाईनचा उस्ताद होऊनं बसलाय. एक एक स्टेशन, ग्रेडीअन, ब्रिज, सिगनल सारं त्याला ठाऊक आहे. आणि नोकरीत कधीही त्याला कलंक लागलेला नाही. सर्व गाडया राइट टाइमवर. ट्राफिक चालू असतो तेव्हा गुडस् ओवरलोड येतात. तर तो टाइम लूज नाही धरायचा. पण ग्रेड 'बी' क्लास. अलिकडेच त्या रुस्तुमजीला 'ए' क्लास द्यायचा अशा गोष्टी चालल्या होत्या.

लल्लू : कोण रुस्तम कोढीआ ?

गुलाम : नव्हे. हा रुस्तमजी वेगळा. नागजी, रुस्तम घुजरो नि माझा भाऊ एकाच वेळी नोकरीला लागले. आणि नागजी बिचारा अजून शंटरमधेच येजा करतोय.

डाभई : नागजीला तर ॲक्सीडेन्ट झाला होता ना ?

गुलाम : कसला ॲक्सीडेन्ट ? मला सारं माहीत आहे. त्या साल्या डायवराचा दोष. दिवा पाहूनही पुढेच जात राहिला. आणि आंधळा होता का त्याला धक्का दिसला नाही ? अरे, सारी केस पुरी बनावट. डायवरला बचावताना नागजीला सस्पेन्ड केला. गरीब बिचाऱ्याचं ऐकतो कोण ?
(आतून आवाज.)

आवाज : ए क्लीमेन ए...गाडी फिरवायचीय.

गुलाम : (पुढे येऊन.) ए...मुडदा न्यायचा आहे ? बसा. जाईल आता ? आणखी कुठली गाडी बाकी राह्यलीय का आता ? जरा मन थाऱ्यावर ठेवून बसलो नाही तोच ही तिकडे बोंबाबोंब !

डाभई : मी नाही म्हणत होतो, की आज रात्री धुमाकूळ माजणार आहे.

(पुन्हा ओरड.)

आवाज : ए क्लीमेन...लोको ओ...?

सर्व : ए ओहो...

लल्लू : चला भाई, चला. नाही तर टनटेबल पोचवताना अर्धा मैल कापावा लागेल. पण एंजिन टनटेबलासह आपल्याला खेचील.

गुलाम : बरं-बरं. हेही खरंच. चला आज तर गाडया फिरवून रात्र काढायची आहे.

कॉलबॉय : कोण बसलंय ? ऐकू नाही का येत ? गाडी फिरवायची आहे.

गुलाम : सुना. अब सुना. बुम मत लगाओ. गाडी फिरानेकी है वो तो फिराइंगे. मगर टनटेबलमे जरासा तेल डालनेका बोलो. एकदम जाम हो गया है.

कॉलबॉय : वो इस्टोरवाळेको बोलो, अमको मत बोलो.

गुलाम : अबे उल्लूका पठ्ठा ! काय डोक्यात जादा चरबी आली आहे की काय ?

(पकडायला जातो. पण कॉलबॉय पळून जातो. सारे जातात. अंधार होतो. त्याचवेळी काळा पडदा उचलला जातो.)

अंक १ ला

प्रवेश तिसरा

पात्रे

जोन्स, स्टॅनली, नारण, प्रवासी, असिस्टंट स्टेशन मास्तर,
डेव्हिड, नोकर, करेजसाहेब, भवानसिंग चायवाला, रुखी.

मध्यरात्रीची वेळ. रेल्वेची वेटिंगरूम. टेबल, खुर्ची, बत्ती, घडयाळ सर्व एकाच प्रकारचे. कांट्रॅक्ट पद्धतीचा माल. एक प्रवासी सामानासह येतो. हमाल सामान ठेवून निघून जातो. नारण डुलक्या घेत बसला आहे. थंडीचे दिवस असल्यामुळे पंख्याचा वारा बंद आहे. एका आराम खुर्चीवर पिवळालेंगा आणि सदरा पेहेरलेला एक देशी साहेब पहुडला आहे. हळू हळू सर्व सोफे भरून जातात. इतक्यात जोन्स येतो. त्याचा पोशाख एंजिनवर कामाला जाण्याचा असतो.

जोन्स : (प्रवेशून) ब्लडी कोल्ड ! डॅम ! अल्लो स्टॅनली !

स्टॅनली : अॅल्लो जोन्स ! यू गोइंग लाईन ?

जोन्स : यस ! ब्लडी गुड्झ. वॉट यू डुइंग ?

स्टॅनली : गोइंग होम, ऑन लीव्ह, मॅन !

(झोपलेल्या प्रवाशांची झोपमोड होऊ लागल्याने ते डोके वर करून पहातात आणि परत पांघरुण घेऊन झोपी जातात.)

जोन्स : ओ ! ए छोकरा ! यु'ल हॅव टी ? आं, जाओ, दो कप चाय

बोलो. यस स्टॅनली ! क्यों, देश जाता है ? हमारा एक काम करना. बोलो तुम कायकू जाता ?

स्टॅनली : यस जरूर ! अम जाता है ग्राऊंड ट्रबल, ब्लडी नेबर !

जोन्स : कहां, अपना गाममे ? यस. कोन ओ लकसमन ?

स्टॅनली : यस लकसमन. कोर्टमे केस लगाया है इसने. यू नो अवर हाऊस. दॅट ब्लडी पॅसेज-मिडल वन. माय अॅन्ड हिज हाऊस. वो जो रस्ता हे ने—?

जोन्स : यस, यस, पिटी—

स्टॅनली : ही सेज दॅट ब्लडी पॅसेज इज हिज.

जोन्स : ओ ब्लडी निगर ! यु गो बॉम्बे फर्स्ट—पेहे—

स्टॅनली : यस मॅन.

जोन्स : हमारा एक वर्क हे. ब्राउनको बोलो हमारा टीपॉई हजी क्यों नहीं भेजा ? यु सी मॅन ! वो हमारी टीपॉई—तो डी. एल. ओने देखा, बस खलास ब्लडी ! सेज आय वॉण्ट इट. बस खलास. तो शॉप कारपेन्टरीकी पास भेजा. अबी पीछे नही आया.

स्टॅनली : धिस डी. एल. ओ. नाइस—मॅन—हं.

जोन्स : व्हॉट नाइस ! ब्लडी स्ट्रींग, टेन मिनिट लूझ टाइम, ब्लडी रिपोर्ट. बस खलास. फोरमेन सेज ही डू नथिंग. बस खलास. हॅव स्मॉक मेन ?

स्टॅनली : थॅंक्स मॅन ! एई छोकरा !—यु ऑर्डर टी ? बोलो चा जल्दी लावो (नारण जातो.) ब्लडी टी मॅन !

जोन्स : कमलॉंग, स्टॅनली ! यु नो ए छोकराका मदर अच्छा हे. ब्लडी फाइन.

(एक प्रवासी देशी पोशाखात सामान घेऊन येतो. रिकामी जागा नाही म्हणून पहात उभा रहातो.)

स्टॅनली : आय सी, रिअली !

जोन्स : यस. ब्लडी गुड वन. आज इधर झगडा हो गया. ब्लडी ही-ही-हीही...

(खदखदा हसतो. त्यामुळे प्रवाशांना त्रास होतो. देशी प्रवासी

येऊन जोन्सच्या समोर असलेल्या खुर्चीवर त्याने ठेवलेला पाय उचलायला सांगतो)

जोन्स : सॉरी ! हम सोता है--जाओ, खुर्सी नही मिलेगा—

प्रवासी : पण दुसरी जागा नाही आहे.

स्टॅनली : गो टू ब्लडी हेल ! हम क्या करे ? ये सेकंडक्लास वेटिंगरूम है—

प्रवासी : हो आहे ना. मीही सेकंडक्लासचं तिकिट काढलंय. खुर्ची दिली नाहीत तर स्टेशनमास्तरना सांगेन.

जोन्स : छा—छा—गो टू हेल आय से ! यस. छोकरा ! आॅ चा किधर हे ? ...ब्लडी ?
(चहावाला चहा घेऊन येतो. प्रवासी बडबडत बाहेर जातो.)
ब्लडी इंडियन ! नो मॅनर्स अॅटोल ! कमलॉग. स्टॅनली, सुगर? टु, थ्री.

स्टॅनली : बॉय, बॉय (चहा पितो) एई (मोठयाने) केकस् किधर है—डॅम ! केकस्के लिये बोलो. जाओ, भागो !
(अ० स्टेशन मास्तर आणि प्रवासी येतात.)

अ. स्टे. मा. : (आढ्यतेने) काय आहे बाबा ? कसलं भांडण ? साला स्टेशन मास्तरला मरे मरे तो—

प्रवासी : कुठं झोपायचं ? सांगा आता ? ही एक खुर्ची.

जोन्स : अलॉ स्टेशनमास्तर ! यु आॅन डयूटी ! क्यो, कयसा हय ?

अ. स्टे. मा. : यस. अच्छा हे—अला स्टॅनली.—ऑन डयूटी टिल थ्री. तीन बजे घरको जाएंगे. साली रात्र धड इथं काढता येत नाही की तिथं ?

प्रवासी : पण आम्ही कुठं बसायचं—कुठं झोपायचं ?

अ. स्टे. मा. : बसा माझ्या डोक्यावर ! जागा नाही त्याला मी काय करू ? तुमच्यासाठी खाटा करायला बसू का ?

प्रवासी : पण हे साहेब उगाच दोन खुर्च्या अडवून बसले आहेत. त्यायली एक सोडली त्यांनी तर ?

एक झोपलेला साहेब : (जागा होऊन) यू डॅम ! कितना आवाज करता है, सोने दो हमको.

स्टॅनली : अल्लो डेविड, यु हिअर ?

डेव्हिड : ड्यूटी, ब्लडी ड्युटी ! गोइंग लाइन.

अ. स्टे. मा. : अरे मि. डेविड, तुझी तार आहे. तुझा होमलाइन टेलिफोन पण बिघडलाय.

डेविड : बी ब्लोन ब्लडी फोन अ‍ॅन्ड होमलाइन ! अच्छा—ट्रेनका टाइम पर जगाओ.

प्रवासी : पण मास्तर साहेब, ही सारी वेटिंगरूम रेलवेच्या नोकरांनी भरलीय. मग प्रवाशांनी कुठं जायचं ?

अ. स्टे. मा. : जागत बसावं प्रवाशांनी, दुसरं काय ? झोपलेल्या लोकांना खेचून बाहेर काढू ?

प्रवासी : कायदा काय सांगतो ?

अ. स्टे. मा. : काय कायदा ? रेलवेत आणि कायदा ?

(नोकर येतो.)

नोकर : मास्तर साहेब, फोनवर बोलावलंय तुम्हाला.

अ. स्टे. मा. : आता बघा मास्तरचा अवतार. तुम्हाला झोपवू की फोनचा जबाब देऊ ?

(जलदी निघून जातो.)

प्रवासी : रेलवेसाठी पैसे खर्च केले तरी सोयी काही मिळत नाहीत.

(बाहेरून घंटा ऐकू येते.)

स्टॅनली : ब्लडी लाइन क्लीअर.

जोन्स : यस. यु लीव्ह अ‍ॅट—स्टॅनली ?

स्टॅनली : टू फिफटीन.

जोन्स : ओऊ ! हम एक घंटा सोयेगा. ए छोकरा ! ये सब ले जाओ, बोलो.

(ट्रेमधे दोन आणे टाकतो. एक कॅरेज स्टाफचा नोकर हातात हातोडा असा येतो आणि एका झोपलेल्या साहेबाला उठवतो.)

नोकर : कॅरेजसाब ! कॅरेजसाब !

कॅरेजसाब : क्या हय—साला कोन हय ?

नोकर : साब ! साबका सलून सीक हो गया है—वो देखनेका हे.

कॅरेजसाब : साले खड्डेमे गया ओ सलून. (डोळे चोळीत उठून बसतो.)

ओ कोन ? जोन्ससाब ! गुड नाइट. किधर जाता ?

जोन्स : ओ भवानसिंग ! क्या तुम नाइटमे हो ? अम गुड्स जाता.

भवानसिंग : हां—नाइटमे हूं. ये दो गाडी निकाल के जरा निंदनेको इधर आया तो नया झगडा आया.

जोन्स : अरे अबी तुम वॅक्युम बराबर नहीं देखता—ओर रस्तेमे हमलोक बाट हैरान होता.

भवानसिंग : हम क्या करे—देखता तो बराबर—मगर (बोलत असता फेटा आणि डगला चढवत असतो.) होस पाइप लिकींग रहेती. अच्छा, आता हूं ये सलून देखकर. गुडनाइट !

(प्रवासी रिकामी झालेली भवानसिंगची जागा सावकाशपणे भरून काढतो. तो गेला असे पाहून त्याचा बिछाना गुंडाळून ठेवून आपला त्याजागी पसरतो नि झोपी जातो.)

स्टॅनली : अभी तुमको जगा मिली.

जोन्स : वो कॅरेज एक्झामिनर हे. अभी आयेगा तो तुमको उठायेगा.

प्रवासी : उठायेगा क्या—रात्रपाळी करतो की मस्करी ? वेटिंगरूम काही रेलवेच्या लोकांना झोपण्यासाठी नाही.

स्टॅनली : डोन्ट बॉदर ! ब्लडी ईडियट !

(चहावाला येतो.)

चहावाला : साब, दुसरा दो आना दो.

जोन्स : क्या ?

चहावाला : इसपेसल चाका. दो कोपका चार आना.

जोन्स : चले जाव. ब्लडी फूल. केक्स भेजा नही. अबी जास्ती पैसा मंगता ? ये लोक बॉत बदमाश हे.

चहावाला : पण साब, दोन कपाचे चार आणे तर खरे ना ?

जोन्स : जाओ ब्लडी ! पॅसेंजरकु अयसा सताता हे ?

चहावाला : साब कायदा आहे हा.

जोन्स : डॅम यू ब्लडी, कायदा बताता ? एय्, केटरिंग इन्स्पेक्टर कोन हे ?

स्टॅनली : यस, कॉल हीम.

चहावाला : साब !

जोन्स : ब्लडी स्वा…ई…न !

(धक्का मारून त्याला बाहेर काढतो. चहावाला बडबडत निघून जातो.)

धीज ब्लडी इन्डीयन्स ! यस स्टॅनली, तो ये लकसमन का क्या झगडा हे ? ए पॅसेजका ओर दुसरा कुछ हे ?

स्टॅनली : नही मालूम तुमको ? लकसमन रिलेटीव क्लेम करता हय. वो बोलता इसका बापका बाप ओर अपना फाधरका कुछ रिलेशन हे. तो जॉइंट प्रॉपर्टी बोलता.

जोन्स : ब्लडी फनी ! उसकु वकीलकी नोटीस दो.

(बाहेर स्टेशनवर घंटा वाजते. दूरवरून आगगाडी धीमे धीमे जवळ येत आहे असा आवाज ऐकू येतो.)

स्टॅनली : आं ब्लडी ट्रेन ! ऑल राइट, गुडनाइट. यार गुड्स आफटर वन अवर.

जोन्स : गुडनाइट ! स्टॅनली, गुडनाइट.

स्टॅनली : चिअर यू !

(बाहेर जातो. इतर दोघे तिघे उठून बाहेर जातात. धीमे धीमे गाडी जवळ येत आहे. खिडकीतून गाडीचा दिवा दिसतो. बाहेर प्रवाशांची धावपळ.)

जोन्स : (झोपलेल्या प्रवाशांना) एय पॅसेंजर ! तुम नही जानेवाला ?

प्रवासी : नाही. या बाजूला नाही जाणार. त्या बाजूच्या गाडीला पहाटे जाणार.

जोन्स : ओ ! (झोपायची तयारी करतो. जवळच्या पेटीतून व्हिस्कीची लहान बाटली काढतो. नजर नारणकडे जाते.)

एय छोकरा ! जाओ, एक ग्लास सोडा ले आओ. लो ये पैसा.

(नारण जातो.)

(थोडया वेळाने रूखी डोकावते.)

रूखी : (हळूच) नारण ! नारण !

जोन्स : हे —कोन तुम ? इधर क्यू आया ?

रूखी : हत् रे मेल्या. (ओरडत निघून जाते.)

जोन्स : एय्, एय् !

(बाटली लपवण्याचा प्रयत्न करतो नंतर बाहेर जातो. थोडया वेळाने नारण सोडा घेऊन येतो. लगेच रूखी मागोमाग येते.)

रूखी : नारण ! तुझा बाबा कुठाय ?

नारण : तो ह्या गाडीवर न्हायी जायचा, आये !

रूखी : मग ?

नारण : एक घंटयानं गुड्सनं.

रूखी : मग घे ह्ये भाकरीचं गाठोडं त्येस्नी दे हं.

नारण : हां, हां आये.

रूखी : त्या गाडीचा डरावर कोन हाय रे ? म्हाइत हाय तूस ?

नारण : हा जोन्ससाब, आये.

रूखी : सत्यानाश व्हनार ! हा मेला कसा आला वाटयाला ? मेला दारुडया ! ह्ये ह्येचंच गलास ना ?

नारण : हां. आये, तू हिथं बस. तो माझा जीव घेईल आज.

रूखी : त्या नलाच्याजवल बसत्ये मी, बाबा. हा गेला की ये. मिळूनच घरी जाऊ.

नारण : पाच वाजल्याशिवाय हितून सुटका न्हायी, आये.

रूखी : मग मी बसत्ये बघ थितंच. ये हं थितंच.

(जोन्स आत येतो.)

जोन्स : एय् ! वेटिंगरूममे क्या खटपट करता है ?

यू ब्लडी नीगर ! अंदर कायकू आता ? बाहर जाओ.

(रूखी लगेच तिथून निसटते.)

(पेल्यातील सोडा घेतल्यानंतर नारणला.)

तुम बी बहार जाओ, डॅम !

(त्या सोडयात थोडी दारू घातल्यानंतर पितो.)

छोकरा ! छोकरा ! (नारण येतो.) देखो, हमको तीन बजे जगाओ. ओर मास्तरको बी बोलो. नया डीपोटी आयेगा, डयुटी चेंज होगी, इसको भी बोलो. ओर हमको सताओ मत.

नारण : अच्छा साब !

जोन्स : वो तुम्हारी मा किधर गई ? (निद्रेच्या धुंदीत) ट्रालाला ला ला ला···लालाला·ला···ए, छोकरा, बत्ती बुझाओ.

(नारण बत्ती विझवतो.)
ट्रालाला···
(बाहेर गाडी गेल्याचा आवाज. जोन्स हळू हळू झोपी जातो. त्यानंतर काही वेळानं त्या खोलीत कुणी येत आहे अशी चाहूल.)

भवानसिंग : (मोठयानं) हमारे बिस्तरपर ये कोन सोता—उठो.

प्रवासी : काय आहे ? गाडी आली ?

जोन्स : (धडकून) छोकरा, छोकरा ! बत्ती लगाओ ! एंजिन फेल हो गया क्या ?
(नारण धावत येऊन बत्ती पेटवतो. भवानसिंग प्रवाशाला धरून उठवतो आहे.)

प्रवासी : काय आहे ? का उगीच सतावता ! रेलवेचे नोकर तुम्ही नि प्रवाशावर असा जुलूम करता ? ही एवढी जागा रिकामी पडलीय तरी इथंच झोपायचा अट्टाहास का ?

जोन्स : डॅम धिस नॉइज. छोकरा ! स्टेशन मास्तरको पूछो कितना टाइम हुवा ?

भवानसिंग : सारा खंडमे अंधारा कर दिया—तो मे—

प्रवासी : मग दिवा लावून बघायचं होतं.

जोन्स : (मोठयाने—किंचाळून) शट अप ! यू फू···ल.
(पडदा पडतो.)

अंक २ रा

प्रवेश १ ला

पात्रे

असिस्टंट स्टेशन मास्तर, १ लोक, २ लोक, रामला, रूखी, गोरा साहेब, हरगोवन, दयाळजी, अबदुलकरीम, हरजीवन, बुकस्टॉलकीपर, माणेकशा, लोको.

दुपारची वेळ. स्थळ-स्टेशन मास्टरचे ऑफीस. 'लोक' शब्दावरून प्रवासी, जनता, ग्रामजन, शहरी माणूस, म्हणजेच जनतेतील कुणीही माणस असा अर्थ समजायचा. हा असिस्टंट स्टेशन मास्तर पहिल्या अंकातील नव्हे. हा दुसरा आहे.

(स्टेशन मास्तरचे ऑफीस. ऑफिसच्या मध्यावर आणि बाजूला टेबल, खुर्ची, स्टूल वगैर-रेल्वेत असते त्याप्रमाणे जाडजूड भक्कम. समोरच्या दाराबाहेर 'प्लॅटफॉर्म' समजायचा. बाजूच्या दोन्ही खिडक्या उघडलेल्या असतील किंवा बंद असतील. एका बाजूला तिकीट ऑफिसची खिडकी आणि दुसऱ्या बाजूला 'कंट्रोल' चा टेलिफोन.)

अ. स्टे. मा. : (फार कामात) काय आहे तुमचं काम ? का जीव खाता ?

१ लोक : साहेब, आमची करंडी नाही आली. रसीद तर कालच मिळालीय.

अ. स्टे. मा. : ते मला हो काय माहीत ? तुमची करंडी मी उचलून आणणार होतो का ? मला काय विचारता ? इथं ही नोकरी

करायची की तुमच्या करंडीचा तपास करीत राह्यचं ? आज नाही आली तर उद्या येईल. हे, कोण आलं ? इसरिआ ! कुठं गेला हा ? घे हे कागद कॅरेजवाल्याला दे.

१ लोक : पण साहेब, त्या करंडीत फळं आहेत. आजारी माणसासाठी मागवली आहेत.

अ. स्टे. मा. : ही रेलवे काय तुमच्या आजारी माणसासाठी चाललीय ? फळं आहेत ना, ती येतील दोन दिवस उशिरानं. खाल्लीसुद्धा असतील कुणी रस्त्यात. बरोबर पॅक केली नसतील तर. पैसे वाचवायला गेला असेल.

२ लोक : (प्रवेश करून) साहेब !

अ. स्टे. मा. : आता तुमचं काय इथं ?

२ लोक : रात्रीच्या गाडीचं रिझर्व्हेशन हवंय.

अ. स्टे. मा. : जीव घ्यायला आलात माझा. जसा काही मी तुमच्या बापाचा नोकर लागून राहिलोय.

२ लोक : कुणाला सांगता आहात, मास्तर ?

अ. स्टे. मा. : अरे, तुम्हाला नाही सांगत. गरम नका होऊ. बोला, काय हवंय ?

२ लोक : दोन सेकंड क्लास आणि एक थर्ड क्लास रात्रीची रिझर्व्हं हवीत.

अ. स्टे. मा. : अशी रिझर्व्हं नाही मिळायची. चोवीस तास आधी सांगायला हवं होतं. आता येऊन कसं होणार ? थर्ड क्लास रिझर्व्हं म्हणजे ? किती तिकिटं हवीत ?

२ लोक : आठ.

अ. स्टे. मा. : ते शक्य नाही. थर्ड क्लासची दहा तिकिटं हवी असली तर मिळतील. हे पहा, कायदा काय आहे ते माहीत नाही. मग का हैराण करता ?

(शिपाई तार घेऊन येतो.)

ही आणि काय आफत आणलीस ? (वाचतो.)

२ लोक : मास्तर, किती वेळ थांबायचं ?

अ. स्टे. मा. : मला काय सांगता ? मला नोकरी करायचीय. तुमच्या बरो-

बर गप्पा मारात बसू म्हणता ? पहाता आहात तुम्ही. मी रिकामा नाहीय. ए इसरिआ ! रामला ! कुणी नाही. कुठं गेला मरायला इतक्यात ?

(एक नोकर येतो.)

जा. कॅरेजवाल्याला सांग, सलून नंबर बेचाळीस थ्रीफॉर्टी नाइन डाऊन म्हणून जाईल. बघ, ए मूर्खा, कॅरेजवाल्याला सांग, की लाइट, पंखा, संडास सारं काही बरोबर आहे की नाही ते पहा. त्यात काही चूक झाली तर मेलोच म्हणावं. साल्यांची टापटीप काही कमी आहे ? हा साहेब चिडका आहे. समजलं ?

(फोन वाजतो.)

आता तुला काय झालं बडबडायला ? पहा, आता तुम्हीच पहा. फुरसद आहे का मला ? (फोनकडे जातो.) एलाव, यस. फोर ट्वेन्टीटू निघाली. हं, येऊ दे. जागा खाली आहे. कोण ? रनिंग लेट ? मरेल साला. आपल्याला काय त्याचं ? बरं !

(जाग्यावर येऊन बसतो.)

२ लोक : हे पहा दहा तिकिटं घेतो मी. दोन जास्त घेतो. पण रिझर्व्ह होतील ना ?

अ. स्टे. मा. : तुम्ही दोन तिकिटांचा रेलवेला फायदा देता आहात. रेलवे त्याबदल तुम्हाला काही डबोलं देणार नाही. आपले लोकच असे.

२ लोक : मग तुम्ही काही सुचवता का ? आज रिझर्व्हेशन पाहिजेच.

अ. स्टे. मा. : हे पहा. जरा थांबा. सांगतो हं. बसा. ए रामला, शेठना खुर्ची दे बसायला. वरात जायची आहे की वधूवर जायचेत ?

२ लोक : वधूवर.

अ. स्टे. मा. : लग्न आटोपून चाललात. आमच्या गावची मुलगी घेऊन जाताहात···बोला, आता काय करायचं तुमचं ? तुमची करंडी आलेली नाही. बुकिंग ऑफिसमधे चौकशी केलीत ?

१ लोक : तिथं नाही म्हणून तर इथं आलो.

अ. स्टे. मा. : तिथं नाही म्हणजे नाहीच. मी काय नवीन करंडी उत्पन्न करणार आहे ?संध्याकाळी येऊन चौकशी करा.

१ लोक : पण साहेब, ही चौकशी करायला यायचं म्हणजे गाडीसाठी दुसरे बारा आणे खर्च करायला हवेत.

अ. स्टे. मा. : मग काय मी येऊन तुमच्याकडे देऊन जाऊ, बोला ? शेठ, बघा आता, यांची करंडी इथं अजून आली नाही त्याला काय करू ? एंजिन घेऊन जाऊ आणि आणू का ?

(१ लोक जातो.)

आता तुमचं काम. बघा, दहाचं लेबल लावलं जाईल. एका तिकिटाचे —

२ लोक । हां—हां—तसंच करा. मग तुम्हाला हवं ते सांगा ना ?

अ. स्टे. मा. : अहो, तुम्ही जाणता मग मला का बोलायला लावता सारं ? नाहीतर काही लोक येतात, "मास्तर, कायद्यानं सांगा" असं म्हणतात. यांना माहीत नाही रेलवेचा कायदा. कायदा काय ? इथं साराच बेभरवशाचा कारभार आहे. पण हे ठीक आहे. रात्री बाराची गाडी न ? ऑलराईट ! नाव काय तुमचं ?

२ लोक : रसिकलाल माणेकलाल शेठ. (एक नोट पुढे करतो.)

अ. स्टे. मा. : म्हणजे 'शेठ अ‍ॅन्ड पार्टी' असंच. हे नक्की झालं !

(नोट झटपट खिशात टाकतो.)

साहेब, आमची अख्खी रेलवे चहाड्या आणि चुगलखोरांनी भरली आहे.

२ लोक : त्याची नको काळजी.

अ. स्टे. मा. : छे, छे, तुमच्याबद्दल नव्हे.

(रूखी दाराजवळ येऊन हाका मारु लागते.)

रूखी : मास्तरसाब, अहो मास्तरसाब !

अ. स्टे. मा. : कोण आहे ? उभी रहा बाहेर ! साले, कुठे कुठे भटकून इथं आलेत.

२ लोक : मास्तर, मी रजा घेतो.

अ. स्टे. मा. : ओ यस ! थँक्यू. दोन सेकंद (नाव नोंदवतो) आणि दहा थर्डची. तुम्ही सहाच तिकिटं घ्याना. मी बसवून देईन त्यांना.

२ लोक : पण नंतर काही तक्रार व्हायची नाही ना ?

अ. स्टे. मा. : गार्डला मी सांगून ठेवतो ना ! जरा थांबा. कोण गार्ड आहे पहातो. (पहातो) मंचरशा गोटला ! बस, बस. तुम्ही फिकीर करू नका. साहेबजी शेठ, साहेबजी ! हे पहा, गार्डच्या हातात एकाद दुसरा रुपाया द्या म्हणजे झालं.

२ लोक : हो-हो साहेबजी ! (जातो)

रामला : छाब ! भाईर रूखली हाय ती कायी इच्यारतीय तुमास्नी.

अ. स्टे. मा. : कारे बाबा, तुझी कुणी लागते का ती, की काही दोस्ती बिस्ती आहे ?

रामला : (हसत) तसलं कायी न्हायी साब ! मी तर आता म्हातारा झालोय. अहो कुणा आगवाल्याची वायको हाय ती.

अ. स्टे. मा. : विचार तिला काय हवंय. का डोकं खाते ? आगवाल्याच्या बायकोचा इथं संबंध काय ? जा म्हणावं लोकोच्या कारखान्यात. (रामला बाहेर जातो.) ट्राफिकच्या बाजूला कशाला आली ? साली रखडू ! भंगीण असेल कुणी. नाताळचं पोस्त मागायला आली असेल. तू सांग तिला इथं काही काम नाही, जा डी. एल. ओ. च्या बंगल्यावर.

रामला : छाब ! ती नारणबद्दल काय सांगतीय. त्याला नोकरीतून का कमी केलं म्हनून इच्यारतीय.

अ. स्टे. मा. : कुणाला ? नारणला का काढलं ते जाऊन विचार म्हणावं डी. टी. एस. साहेबाला.

रूखी : (दारात उभी) मास्तरसाब, पंखावाल्याच्या नोकरीत पाच रुपय मिळत व्हते. गरीबाच्या पोटावर का पाय टाकतायसा ?

अ. स्टे. मा. : अग मूर्खे, माझ्या घरची गोष्ट आहे का ही ? आणि थंडीच्या दिवसात तर साऱ्याच पंखेवाल्यांना रजा दिली जाते.

रूखी : पण सायेब, त्याला वटींगरूमचा चारज बाय म्हनून तरी राखा. इतके दीस त्योच व्हता.

अ. स्टे. मा. : हो. पण आता काटछाट चाललीय. तुला नाही माहीत ? रेलवेत काटकसर करायला सुरवात केलीय. साऱ्या पंखावाल्यांना काढून टाकलंय.

रूखी : हाय भगवान ! पाच रुपयात काय रेलवेला भीक लागली असती ?

अ. स्टे. मा. : चल जा पाहू. डोकं खाऊ नको माझं. रामला, तिला सांग, तुझं इथं काही चालणार नाही. तशी वेळ आली तर रेलवे आम्हालासुद्धा लाथ मारून बाहेर काढील, समजलीस ?

रूखी : बराय मास्तर सायब. दुसरी कोनची पन जागा खाली झाली तर नारणसाठी बगा. मायबाप ! इतकं जरा ध्येनात राखाल तर गरीबावर मेरबानी व्हईल.

अ. स्टे. मा. : बरं—बरं ! पाहीन. नोकरी अगदी रस्त्यावर पडलीय जशी.

रूखी : मायबाप, तुमच्या हातची गोष्ट हाय. आनि मास्तरसायब, ह्ये अजून न्हायी घरी आले. ते कुटल्या गाडीनं परत येत्याल ? तेचा तपास करा. दोन दिसात परतले पाहिजेत. न्हायी तर...

अ. स्टे. मा. : कोण 'हे' ? तुझा बाप काय ?

रूखी : ह्ये...बाघरजी.

रामला : छाब, हिचा धणी आगवाला हाये ना त्यो !

अ. स्टे. मा. : तो मला कुठं माहीत आहे ? जा, कारखान्यात जाऊन विचार.

रूखी : सायब ! सकाळपासनं थितच व्हते. पन कुनी न्हायी सांगत की ह्ये कवा येनार ते, कुटल्या गाडीनं परत येत्याल ते. येवडं तरी म्हाइत करून द्येवा. दोन दिसात परत येत्याल ना. (इसरिआ येतो.)

इसरिआ : डी. टी. एस. फलाटावर आलाय.

अ. स्टे. मा. : चल, चल, निघून जा. मग ये. मोठेसाहेब आलेत—

रूखी : मायबाप, नारणचं जरा ध्यानात राखा.

अ. स्टे. मा. : जा आधी. नाही तर तुला नि मला दोघांनाही खाऊन टाकील. इसरिया, आण बघू माझी टोपी. हे संकट याच वेळी कुठं आलं ? रामला, पहा, जरा लक्ष ठेव. ही धाड कुठं कुठं जातेय ते पहा.

(रामला जातो. मास्तर तयार होऊन टेबलावरील कागदाची उलथापालथ करीत आहे. गोरा साहेब लेंगा आणि खमीस अशा पेहेरावात प्रवेश करतो. खिडकीतून पहात.)

गोरा साहेब : टॉमी ! टॉमी ! ए एई, इसकु देखो बराबर !
(असं बोलत कुऱ्याला बाहेरच स्वाधीन करतो. परंतु लगेच कुऱ्याचं ओरडणं ऐकू येतं. त्यावेळी साहेब फोनकडे जातो.)

अ. स्टे. मा. : (एकदम उठून) गुड मॉनिंग सर !
(साहेब डोकं हालवतो. फोनवर न समजेल अशा इंग्रजीत बोलू लागतो. तसाच परत फिरतो. एवढ्या उन्हात दाराशी जाऊन 'टॉमी टॉमी' करीत निघून जातो. मास्तर वगैरे मंडळीच्या जिवात जीव येतो.)

अ. स्टे. मा. : हुश्श !

रामला : ह्यो सायब काय बडबडून गेला ?

अ. स्टे. मा. : त्यानं बापाचं शुभचिंतन केलं. आता आठ दिवस फोनवर 'हॅपी न्यू इअर' च ऐकू येईल.

रामला : अरे, त्येचा बाप कवाच मेला. त्येच्या मेवण्यानं सांगितलं.

अ. स्टे. मा. : मग त्याच्या कुणा नातलगाला सांगितलं असेल. तुला काय करायचं ? बघ, बघ, हे वारं कुठं कुठं जातंय ? (रामला जातो.) भर दुपारी कुठं हे भूत उपटलं ? हे एक संकटच आहे.

रामला : तो गेला होता त्या बाजूच्या बंगल्यावर, मडमीजवळ.

अ. स्टे. मा. : सुटलो एकदाचा !
(मळका जाड अर्धा कोट तसंच मळलेलं धोतर आणि मखमलची गोल टोपी अशा पेहरावात एक जाडा माणूस प्रवेश करतो. त्याचं नाव हरगोवन.)

हरगोवन : साहेबजी, मास्तरसाहेब !

अ. स्टे. मा. : आहोहो, हरगोवन ! यावेळी ? काय साहेबाला करंडी पाठवून मोकळा झालास ना ?

हरगोवन : साहेब, असं काय एक करंडीनं ह्योंचं पोट भरतं का ?

अ. स्टे. मा. : अस्सं ? गेल्या मोसमात तू रडवलंस. आता बोल. या मोसमात काय हिशेब चुकता करणार आहेस ? ए इसरिआ, रामला, स्टॉलवाल्याला सांग चहा आणायला.

हरगोवन : नको-नको. मी चहा आताच घेतला.

अ. स्टे. मा. : बैस, बैस. दिवशी दहा दहा कप चहा झोकणारा तू मला

बनवतोस ? जा रे, गेला का ? बोल !

हरगोवन : तुमची मेहेरबानी हवी. दुसरं काय ?

अ. स्टे. मा. : आमची मेहेरबानी, अस्सं का ? तुझी तर जीभच वेगळी आहे. काय, या खेपेला किती मालाचा अंदाज आहे ?

हरगोवन : तीसेक वॅगन तर मला आताच पाहिजेत. पहिल्या खेपेचा घास आता बांधून ठेवायचा. तीस पस्तीस वॅगन तर पाहिजेतच.

अ. स्टे. मा. : मग वॅगनमागे तू मला काय देणार आहेस ?

हरगोवन : असं बोलता मास्तर साहेब ? कधी तरी तुम्हाला विसरलो आहे का ?

अ. स्टे. मा. : अरे बाबा, आजकालच्या जमान्यात सख्ख्या भावाचा भरवसा राहिलेला नाही. हरगोवन, माहीत आहे तुला, आता कशी काटछाट चाललीय ते ? साला पन्नास रुपयाच्या मास्तरावर काटछाट् असे बारा मास्तर काढणार आणि हजारा हजाराचे दोन यांचे मामाकाका विलायतेहून आणून आमच्या डोक्यावर हफिसर म्हणून बसवणार. आणि मग आमच्या मसणवटीत काटकसर चालणार.

(चहा घेऊन येतो.)

हरगोवन : असंच असतं साहेब.

अ. स्टे. मा. : घे. चहा घे. (इतक्यात दयाळजी 'साहेबजी' करीत येतो.) या दयाळजी. काय रे, एक कप चहा आणखी आणायला सांग.

हरगोवन : मास्तर, या तुमच्या चहावाल्याची जाहिरात वाचली आणि मी तर थक्क होऊन गेलो. काय फसवाफसवी ही !

दयाळजी : अरे भल्या माणसा, ही रेल्वेची जादू आहे. आताच मी रेल्वे स्टॉलवरून आलो. आणि तिथूनच हे एक ढोंग आणलंय. काय काय तऱ्हेच्या जाहिराती छापल्या आहेत, पहा !

अ. स्टे. मा. : हे काय आणलत दयाळजी ? काही नवीन आहे का ? आमच्या दयाळजींच्या खिशातून काही नवंजुनं मिळायलाच हवं. औषधांच्या जाहिराती, नाटकांचे कार्यक्रम, कुणाच्या लग्नाच्या आमंत्रण पत्रिका नाहीतर गोष्टीची पुस्तकं, वर्तमानपत्रं, मासिकं काही ना काही असलंच पाहिजे.

दयाळजी : अरे भाई, रात्र आणि दिवस घालवायचा कसा ? साला गाडीचा टाइम असा की मधेच एखादी डुलकी काढणं शक्य नाही. प्रत्येक गाडीचं चाक ठोकून पहायच म्हणजे गाडीवर हजर असलंच पाहिजे. म्हणजे हे असलं मधेच वाचायचं.

हरगोवन : हो—हो. वाचायचा एक षोक आहे. पण हे द्याना जरा. हे काय आहे ?

दयाळजी : थांबा जरा. अशी घाई करून चालणार नाही. हं, हे घ्या. (तपकीर काढतो.) ओढा. हं मास्तर, तुम्हाला माहीत नाही. ह्या बेटया मोठया लोकांनी हे नव ढोंग आणलेय. या लाईनवर जितके स्टॉल आहेत त्यासाठी एक इन्स्पेक्टर नेमला आहे. आता या इन्स्पेक्टर ला फर्स्ट क्लासचा पास, चारशे रुपये पगार आणि दरेक स्टेशनवर चिरीमिरी ती वेगळीच.

अ. स्टे. मा. : पण या बावळटाचं काम काय ?

दयाळजी : अरे काम—या फळाच्या टोपलीवर जाळी राखा, ही जिलबी शिळी आहे, या ऊसवाल्याला येऊ देऊ नका, या केळीवाल्याचे कपडे चांगले स्वच्छ नाहीत. जिथून तिथून पैसे काढतो नि फळ चाखताना मूठभर उचलतो ते वेगळंच.

अ. स्टे. मा. : ही त्याला स्वतःला शिक्षा का ?

दयाळजी : अरे आपल्यालाच शिक्षा देतात. पहा हे हेंडबिल ! यात चहाचे गुण दाखवले आहेत. (वाचतो.) 'चहामुळे सर्दी जाते, आणि उन्हाळयाच्या दिवसात चहा थंडावा देतो. चहामुळे न्युमोनिया, टॉयफाइड नि मलेरिया ताप नाहीसा होतो.' नतर हा चहा कसा बनवायचा त्याच्या सूचना दिल्या आहेत. आता सांगा साहेब, हे बेटे आपल्या वैद्य आणि डॉक्टराच्या जाहिरातीच्या पुढे गेलेत. मी असं विचारतो की साले लोक शिकलेले आहेत की बेवकूफ आहेत ? हे आंधळे गाडीतून रोज जातात येतात. अशाच जाहिराती वाचतात. पण कधी याला सणसणीत उत्तर दिलेलं कुठल्या वर्तमानपत्रात वाचलं का ?

हरगोवन : ज्यात काही अर्थ नाही अशा गोष्टीकडे कोण ध्यान देतं ?

दयाळजी : अर्थ नाही कसा ? हरगोवन, आपले गरीब लोक ! बिचारे

असं काही वाचतात आणि भोळसटपणाने चहा ढोसतात. म्हणतात दे नारे, एक आण्यात तरतरी येईल आणि ताप पार जाईल.

अ. स्टे. मा. : पण चहाची इतकी स्तुती करण्याचं कारण ?

दयाळजी : हां, हीच तर गोष्ट आहे ! ही साली रेलवे आहे चोरटेपणानं भरलेली. अख्ख्या रेलवेवर ब्रुक बॉण्डचं कॉंट्रक्ट. याच्याशिवाय दुसरा नाही वापरायचा. स्टॉलवाल्याला बोलवा आणि विचारा. तर तो म्हणेल, की ब्रुकबॉण्ड नाही वापरला तर साराच कारभार आटपला. आता इन्स्पेक्टर नि ब्रुकबॉण्ड-वाला दोघे मिळालेले. साले आपलेच डबे देत राहातात. मास्तर साहेब, तुम्ही नि मी आपल्या सात पिढ्या होतील तेव्हा चारशे पगार पाहू. पण या अर्धवटांना चारशेचा स्टार्ट नि भत्ता वेगळाच.

अ. स्टे. मा. : कोण आहे हा ?

दयाळजी : अहो आहे कुणी स्मिथ. मद्रासकडचा साला घेड. किरीस्ताव झाला नि साहेबी पोशाख केला की बनला साहेब. असे बरेच लोक साहेब झालेत.

अ. स्टे. मा. : हां—हां—आता जरा थंड व्हा. हरगोवनला या मोसमात तीस वॅगन द्यायचेत.

दयाळजी : ती सोय करायलाच पाहिजे. त्याला नाही थोडंच म्हणायचं ? (हाजी अब्दुलकरीम मुसा, मुसलमान, मळलेला, दाढी असलेला, डोक्याला टक्कल, हातात काठी, विजार आणि लांब पैरण असा वेश, प्रवासाने थकलेला. प्रवेश करतो.)

करीम : मास्तरसाहेब, अहो कॅरेजवाला साहेब, आमच्यासाठी काही करा ना !

दयाळजी : ये मियां, तूही ये. तूच एक नव्हतास.

अ. स्टे. मा. : काय रे ? तुझं काय काम आहे ? काही पार्सलाची तूट पडतेय का ?

दयाळजी : मास्तर, रात्रीपासून तळमळतोय. त्या डेप्युटीनं सांगितलं, होईल तुझं काम. सकाळपासून माझं डोकं खातोय. रात्रीची

गुड्स कॅन्सल झाली. त्यात याचे दहा वॅगन होते. म्हैशी, घोडे, बकऱ्या भरल्यात. त्या इस्पेशलच्या घबडक्यात गुड्स कॅन्सल झाली. आणि आता दुसरी गुड्स नाही. एक गेली तीच अवर-लोड गेली.

अ. स्टे. मा. : मग काय झालं ? रात्रो जाईल.

अब्दुल : साहेब, रात्री कसं ? माझी नव्हे पण बिचाऱ्या जनावरांची दया करा. वॅगन दोन मैल दूर साइडिंगला टाकलीय. तिथं नाही पाणी. जनावरं ओरडून थकली. चारा तरी गरीब माणूस किती नि कुठून आणील ? गावात माझ्या मुलाला पाठवला आणि चार हारे चारा आणवला. साहेब, एक दिवसाचा जादा खर्च काय कंपनी देणार आहे ? आताच कुठली-गाडी जाणार असेल तर माझं काम करून टाका, साहेब !

अ. स्टे. मा. : अरे हो हो ! माझ्या बापाचीच रेलवे न ? तुझ्या आरडा-ओरडयात काही अर्थ नाही.

अब्दुल : साहेब, जनावराला काही जीव आहे की नाही ? बिचारी वॅगनमधे घुसमटून मरतील. साहेब, गरीब माणूस मी.

दयाळजी : अरे भल्या माणसा. तू गरीब नि आम्ही साहेब ? चूक होतेय तुझी. ही टोपी नि डगला रेलवेचे भाडोत्री कपडे. घरात तर तुझ्यासारखेच कपडे घालतो आम्ही. या साहेबडयांना लाज वाटते आमची म्हणून हे असले कपडे घालायला देतात. हे बघ, तू जा डी. टी. एस. च्या बंगल्यावर आणि सांग सारं. तो बसला असेल यावेळी मडमेला घेऊन.

अब्दुल : साहेब, मी कसा तिथं जाऊ ? मेहेरबानी कराल तर ठीक होईल.

दयाळजी : अब्दुल मियां ! गाडी माझ्या घरची असती तर तुला आताच एक एंजिन देऊन सोडली असती. पण ही भिकारचोट लोकांची रेलवे आहे. दया, न्याय की खानदानी रेलवेत नाही. आता मडमेचं डोकं दुखलं ना, तर बारा फोन होतील. नि बत्तीस नोकर आणि बावन्न गाडया धावतील नि बहात्तर गावचे डबे इथं येतील. या लोकांना तुझ्या ढोरांची काय पर्वा बाबा !

जसं ढोर तसा तू आणि आम्हीही तुझ्यासारखेच. आपण सारे लोखंड नि लाकडासमान. जेव्हा जाऊ तेव्हा ते आपल्यावर घण घालतील, लाकडासारखं सोलतील.

अ. स्टे. मा. : अगदी बरोबर, दयाळजी !

दयाळजी : जा भाई ! तू तुझ्या प्लॅटफॉर्मवर एका बाजूला जाऊन नमाज पढ आणि खुदाच नाव घे. जो गाडी पहिली जाईल, त्यातून तुला पाठवू.

अब्दुल : साहेब ! मेहेरबानी होईल. ओ खदा—(जातो.)

हरगोवन : चला, मी पण निघतो. साहेबजी !

अ. स्टे. मा. : चाललास ? बरं ये. या दयाळजीला तर साहेबजी कर !

हरगोवन : दयाळजीभाई, साहेबजी, साहेबजी.

दयाळजी : साहेबजी ! नाही रे बाबा, तू तुझ्या मास्तरनाच साहेबजी कर. मला पोचेल तो.

(दोन तारा येतात.)

अ. स्टे. मा. : (वाचतो) 'वन बफेलो रन ओव्हर' झालं, एवढं एक कमी झालं. ही घे. कॅरेजवाल्याची आहे.

दयाळजी : द्या साहेब. आणखी कुठली गाडी बिघडली असेल. (वाचतो) 'सलून नंबर ना. न्टी टू व्होल बेरिंग लूज कीप अटेंडंट रेडी. कापी डी. एस. ओ. लोको...' मास्तर, मी असं विचारतो, सलूनची गोष्ट, त्यात आमचा काय संबंध ? सत्तर जणांना याची कॉपी काय म्हणून देतात ?

अ. स्टे. मा. : अरे बाबा, म्हैस कापली गेली त्याचा हा ऑल कन्सर्न मॅसेज.

दयाळजी : म्हणजे अख्ख्या लाइनला ही वेदना अनुभवायला हवी. बिचाऱ्या जनावरांची मृत्यू नोंद मला वाटतं एकट्या रेल्वेत नोंदली जाते.

अ. स्टे. मा. : वार्षिक फाइलमधून निघते ना, किती गुरं कापली गेली ?

दयाळजी : मास्तर, हा ड्रायवर अगदीच मूर्ख आहे. तो तार करतो. नाहीतर किती गाई कापल्या गेल्या याला नाही कुणाचा विरोध की नाही कुणी उपवास करीत. फालतु गोष्टीला भलतं स्वरूप द्यायचं ही आमच्या लोकांची रीत. ही प्रजाच मूर्ख.

फेन्सींग नाही त्या लाइनला रोज ढोर मरणारच. रडतो बिचारा खेडूत.

अ. स्टे. मा. : हो—हो. तू खेडूत, जा मग तूच तक्रार कर.

दयाळजी : मास्तर, जमीन असूनसुद्धा या रेल्वेत नोकरी करावी लागली. जमीन काय, पांढरा हत्ती. मर मर मरायचं तेव्हा कुठं सरकारी सारा कसा तरी भरला जातो. ठीक आहे. चला, बसा. या सलूनचं रामायण सांगतो. मास्तर, या साल्या सलूनची हकिगत तर ऐका. एक सलून, त्यासाठी चार नोकर. एक बबर्ची, दुसरा सलून अटेंडंड—

अ. स्टे. मा. : तो काय करतो ?

दयाळजी : सारं करतो. तिसरा साला शिपाई नि चौथा मेकॅनिक. साहेब एक. त्यासाठी हा विस्तार तर पहा. आणि म्हणतात काटकसर केली.

अ. स्टे. मा. : पण या चार जणांचं काय काम ?

दयाळजी : हेच ना, चार खांदे हवेत ना, नाहीतर हे घूड उचलणार कसं ?

अ. स्टे. मा. : बस-बस जरा. कोण आहे रे, स्टॉलवरून आजचा पेपर घेऊन ये. आणखी काय आहे नवी जुनी बातमी ! दयाळजी, म्हणतात की त्याला डिसमिस केलं.

दयाळजी : कुणाला ?

अ. स्टे. मा. : तो चोरीची केस झाली होती तो ? मेलमधे सॉटिंग करणारा, टपाल नि रजिस्टर कागद चोरणारा तो ?

दयाळजी : हां—हां. मी ऐकलं होतं खरं.

अ. स्टे. मा. : मोठा बदमाष निघाला. तिकिटं बनवणारा पण ठरला.

दयाळजी : मास्तर, या रेल्वेत पकडला तो चोर बाकी सारे साव.

अ. स्टे. मा. : अगदी खरं !

(वर्तमानपत्र घेऊन स्टॉलवाला स्वतःच येतो.)

स्टॉलवाला : साहेब ! आता आम्ही तरी काय करणार ! सकाळ होते नि हे तुमचे साहेब किंवा कधी कधी सरकारी अंमलदार इथल्या गाडीनं निष्कारण येतात, वर्तमानपत्र उचलतात, सील तोड-

तात नि वाचून परत करून चालायला लागतात. रोजचं गिऱ्हाईक हे अंक घ्यायला तयार होत नाहीत.

दयाळजी : अरे हे मामालोक गाडीवर फिरायला का येतात ? वर्तमानपत्र वाचायलाच येतात. एवढा मोठा पगार घेतात पण मन तेवढंच.

स्टॉलवाला : साहेब, पण मी काय करू ?

दयाळजी : तू आहे त्याला सामोरं जायचं-सहन करायचं. दुसरं काय करणार. तक्रार केलीस तर स्टॉल वरून तुझी लाईनक्लीअर झालीच म्हणून समज.

स्टॉलवाला : यापायी रोज मला दोन-तीन आण्याची खोट येते.

दयाळजी : ते धर्मादाय खाती घातले असं समज. कळलं बाबा ?
(घंटा वाजते. मास्तर फोनकडे जातो. तिकिट ऑफिसच्या समोर लोकांचा गलबला ऐकू येतो.)
ए, ओरडू नका.

एक आवाज : पण साहेब, गाडीची वेळ झाली.

दयाळजी : माहीत आहे थांब जरा. (मास्तरला) गाडी निघाली की नाही?

अ. स्टे. मा. : हो.

रामला : छायेब ! एक दिवस रजा पाह्यजे.

अ. स्टे. मा. : रजा हवी ? मग इथं तुझा बाप नोकरी करणार काय ? जा, जा, काम कर.

रामला : पण छाब, मेहुण्याच्या लग्नाला जायचंय.

दयाळजी : ताडी प्यायला ? काय रे, किती वेळा तुझ्या साल्याचं लग्न होतंय ?

रामला : तिसऱ्यांदा. दोन वेळा लग्न केलं पण त्या बायका पळून गेल्या.

दयाळजी : मास्तर, या साल्या रामलाची जात आणि आपल्या साहेबडयांची जात एक आहे. तो साला मॅगी त्याची मडम दोन वेळा पळून गेली. तसाच तो वुल्फ तीन वेळा विधुर झाला नि तीन वेळा त्यानं लग्न केलं. तसंच त्याची मडम तीन वेळा विधवा झाली आणि तीन वेळा लग्न करून चुकली.

अ. स्टे. मा. : (हसतो) जा-जा आता. नंतर गोष्टी करू.

दयाळजी : हा, निघालो. गाडी येईल आता. साहेबजी !

अ. स्टे. मा. : बरं. तिकिटं काढून घेतो. आपला बुकिंग क्लार्क रखेवरून अजून परत आला नाही.

दयाळजी : (जाता जाता) म्हणत असाल तर मी काढून देतो ? पण मला हिशेब जमतच नाही. येतो मी. (जातो.)

अ. स्टे. मा. : (खिडकी उघडतो आणि स्टुलावर बसतो) हं—चला या (तिकीटावर तारीख मारून तिकीटे देतो. हे आवाज ऐकू येतात. अर्थहीन आरडाओरडा चालू आहे.) ए, मोठ्यानं बोल. काय ? दो भडोच ? हं घे दोन भडोच. ती नंतर. पहात नाहीस, त्याचे पैसे पडलेत ? काय ? किती ? चार ? उचल, एक, दो, तीन, चार, घे, हां हां पण पैसे देशील की नाही ? की पहिल्यानं तिकीटं ?......देतोस ते केव्हा ?......किती तिकीटं ? एक ? नोट आहे-दहाची ? (फेकतो) उचल. सुट्टे नाहीत. चार आण्याचं तिकीट पाहिजे आणि दहाची नोट देतोस. चल, वेळ नको लावूस. दुसऱ्याला येऊ दे...पण सुटे नाहीत. मग काय तुझ्यासाठी सुटे करायला जाऊ ? इथं तो धंदा मांडलाय का ? शेवकुरमुऱ्यांचं दुकान समजलास का ? हं. चल निघ इथून...दोन गोध्रा...संखेडा...साडेतीन... किती वर्षांचं मूल आहे ? पंधरा वर्षांचं ? सबंध तिकीट द्यावं लागेल—जायला नाही देणार. चल घे. अहमदाबाद किती ? दोन प्लॅटफॉर्म...एक वढवाण ?...चाल...काय ? सुट्टे परत ?...काय गळी पडतोयस ? हरामखोर ? परत दिले ते ? साला चोरटा ! बदमाशी करतोस ? नाही दिले तर काय मी खाल्ले ? चालता हो इथून. भामटा कुठला ! हात कढा...हात काढ...गप्प रे, (फोनची घंटा वाजते.)

(माणेकशा गार्ड प्रवेश करतो.)

अलाव, अलाव ! हां ऑलराइट !...माणेकशा, हे पहा, तू जातोयस का ? बघ, या गाडीतून मुलं जायची आहेत. घेऊन जा. बघ कुणाचा त्रास नको हं !

माणेकशा : किती आहेत ? सेकंडमध्ये बसवून देईन.

अ. स्टे. मा. : बरं बरं, चौघं आहेत. त्यांना स्टेशन बाहेर उतरून दे. तिथ हरामखोर तिकीट कलेक्टर जमा झाले आहेत.

माणेकशा : बरं-बरं.

(तार येते० सरक्युलर येतं. बाहेर तिकीटासाठी सौम्य आवाजात ओरडा चालू आहे.)

अ. स्टे. मा. : थांबा जरा. ए, ओरडू नका.

रूखी : (बाहेरून) मास्टर सायेब, माजं कुनी ऐकत न्हायीत. नारणला कुनी···

अ. स्टे. मा. : पुन्हा कुठून आली ही पीडा ? चल-चल.

रूखी : अवो, माजे धनी कवा परत येत्याल ?

अ. स्टे. मा. : ए गघडे, मला काय विचारतेस ? जा कारखान्यात नि बघ तिथं. हां—उद्या रात्री स्पेशिअल आहे. त्यासाठी तुझ्या नारणचं नाव नोंदवलंय. चार आणे मिळतील तुला, सांगितलं का—

रूखी : नको मास्टरसायेब, मला या थंडीत नारणला पाटवायचा न्हायी जल्ले ते चार आने !

अ. स्टे. मा. : ए रांडे, अक्कल गेली का तुझी ? त्याचं नाव नोंदवलय न ! नाही गेला तर कैद करतील त्याला, माहीत आहे ? सारे पंखेवाले पाठवायचे आहेत तिथं. बघ गाडी निघते आणि जाते तोपर्यंत मशाल घेऊन प्लॅटफॉर्मजवळ उभं राहयचं, समजलं ?

रूखी : न्हायी बापजी नाही. माझ्या नारणला तुम्ही असं नका घेऊन जाऊ. मास्तर सायेब, जरा दया करा माज्यावर, मायबाप !

अ. स्टे. मा. : माझं डोकं खाऊ नको, जा. रात्री नारणला पाठव. स्पेशिअलच्या वेळी मशाल घेऊन रस्त्यावर उभा राहील. थोड थोडया अंतरावर एकेक जण उभा राहील. तुझा नारण एकटाच नाही. समजलीस ?

रूखी : हे भगवान् !

अ. स्टे. मा. : भगवान बगवान झोपून गेला. चल जा आता. (तिकीट देत) दे, चार···कुठली ?

रूखी : न्हायी-न्हायी. नारण येनार न्हायी.

अ. स्टे. मा. : (किंचाळून) तुझे बारा वाजवीन नाही पाठवलास त्याला तर. जा आता कंदाशिणी ! जमादाराला पाठवतो बघ, आत्ता. (प्रवाशाला उद्देशून) घे, तीन रुपये परत दिले नि दोन म्हणतोस. हरामखोर ! तू पाचाची नोट दिलीस. नि दोनाचं तिकीट. वाच ना तिकीटावरचं. काय लिहिलंय ? नि तीन परत दिले. आं ? दोन दिले ? चल, चल, खोटारड्या ! तो एक डोकं खाऊन गेला नि तू दुसरा. साले ढोंगी !…कोण आहे ? यू ? यस, यस. हाऊ डू यू ? नो, मिस्टर, तुम्ही तिथं उभे, तुम्ही तिथं, तुम्हाला काय माहीत ? इंग्रजीत बोलून भिववू नका…ऑलराइट ऑलराइट ! डू इट, सी इट… बोलला…आय विल सी ! घ्या चला. हे पहा, मोजून घ्या तुमचे पैसे. नाही तर नंतर तू नको गळी पडूस.

रूखी : (बाहेरून) मास्तर सायेब, बाघरजी—

(फोनची घंटा. बाहेर लोक जात येताहेत. एकाचे टोले पडतात. मास्तर टोपी घालून बाहेर पडतात. जाताना)

अ. स्टे. मा. : यस, अलाव ? टु थर्टी ? यस. आं—गाडी आली. काय साली पीडा ! जातेस की नाही इथून ?

रूखी : बाघरजी—

अ. स्टे. मा. : बाघरजी गेला मसणात. चल, दूर हो. गाडी आली.

(धावत धावत बाहेर पडतो.)

(पडदा पडतो.)

अंक २ रा

प्रवेश २ रा

पात्रे

तिकीट कलेक्टर, उतारू, जाणारे, शिपाई, दयाळजी, रामला, मास्टर, फकीर, गरीब, साधू, काबुली, विद्यार्थी, काठियावाडी.

संध्याकाळ. स्टेशनच्या बाहेरचा रस्ता अथवा चौक. प्लॅट-फॉर्मवरून बाहेर जायचा दरवाजा डाव्या किंवा उजव्या बाजूने सहज दिसेल असा योजलेला आहे. जवळच तिकीट कलेक्टर हातात पंच घेऊन उभा आहे.

(मागोमाग येणारे प्रवासी तिकीट देऊन निघून जात आहेत. इतक्यात एक जात असता तिकीट कलेक्टर त्याला ओरडून थांबवतो.

ति. कले. : एय्, एय् उभा रहा. कुठे चाललास ? तिकीट पाहू ?

उतारू : साहेब, आताच दिलं ना.

ति. कले. : चल रे खोटारड्या, चल उभा रहा इथं, या बाजूला. चला, चला, एय् हे सामान कुणाचं ?

एक उतारू : माझं.

ति. कले. : उभा रहा बाजूला. वजन करावं लागेल.

उतारू : पण साहेब एका तिकिटात...

तिं. कले. : कटकट करू नको. जास्त बोलू नको. डोंगरा एवढा नग बांधून आणलास. रेलवे फुकटात नाही नेयाला देणार ?

उतारू : अहो साहेब, या खटपटीत कशाला पडता ? काही समजून घ्यायचं ते घेऊन टाका.

ति. कले. : असे सरळ या. हं थांबा जरा.

(उतारू पावली काढून देतो.)

ति. कले. : नाही-नाही. असं काही चालणार नाही.

उतारू : अहो साहेब, हे घ्या. मी गरीब माणूस आहे. यात राजी व्हा.

(दुसरी पावली देऊन निघून जातो.)

ति. कले. : साला मोफत मणचे मण माल घेऊन जायला पहातो. काय रे तुझा काय विचार आहे ? तिकीट दे नाही पेक्षा पैसा भर.

उतारू : अहो पण साहेब, मी स्वतःच तुम्हाला तिकीट दिलंय.

ति. कले. : चल, चल, तिकिटाशिवाय आला नि उलट···

(एकजण जाऊ लागतो.)

ए मिस्टर, काय ?

जाणारा : मी एकाला पोचवायला आलो होतो.

ति. कले. : हो ना मग प्लॅटफॉर्म तिकीट कुठंय ?

जाणारा : नाही घेतलं.

ति. कले. : मग ? बापाची रेलवे आहे का ? आणा देऊन टाका.

जाणारा : ऑलराइट ? आणा घ्या. पाल्हाळ नकोय मला. घ्या नि रिसीट द्या.

ति. कले. : काय ? एक आणा भरणार नि त्याची रिसीट हवी ? आला मोठा कायदा सांगायला.

जाणार : रिसीट देणार आहात की नाही, नाहीतर जातो स्टेशनमास्तर कडे. (उतारूला) तुम्ही सुद्धा पैसे द्याल तेव्हा रिसीट मागून घ्या.

ति. कले. : बरं, बरं ! शहाणपणा नकोय तुमचा. समजलो सारं. जा दोघं ही. तुमच्यासाठी रिसीट द्यायला वेळ नाही. जा बाबा जा. मला काय ? रेलवेचं नुकसान.

(दोघेही जातात)

साले एकेक वेगवेगळी माणसं येतात. जाऊ द्या झालं ? अरेच्या, ही पलटण पुन्हा आली.

(एक शिपाई भिकाऱ्यांच्या जथ्याला हाकलून लावीत आहे. यात एक फकीर, काबुली स्त्री-पुरुष, साधू, काठियावाडी अंत्यज स्त्री-पुरुष, मुलं, आंधळे शिवाय एक मध्यम स्थितीतील गरीब जोडपंही आहे.)

ति. कले. : आले का परत चीनचे सावकार ? काय अफाट भटके आहेत ? सारेच थ्रू का ?

शिपाई : चला, साले !

फकीर : अबे, जाता है. गाली मत दो.

ति. कले. : अरे. चल चला, मवाली ! मोफतची मुसाफरी करायला हवी नि रुबाब दाखवतोय. समजतोय जाऊ देईन म्हणून नाही तरी आता पोलीसच्याच स्वाधीन करतो.

फकीर : अबे, देखा तेरा पोलीस.

गरीब : मायबाप ! पैसा असता तर तिकीट नसतं का काढलं ? पण गावात दुष्काल पडला नि बापजी—

ति. कले. : दुष्काळ पडलाय, दुष्काळ ! मग काय रेलवेनं तुम्हाला मोकळीक द्यावी ? काय सांगता ? इकडे पहा इकडे. हा साला ढोंगी आंधळा, काही नाही तरी एक महिना याला पाहातोय. इथून तिथं आणि तिथून इथं, स्टेशन आलं की त्याला कसं दिसतं.

साधू : अरे टिकिट मास्तर, कायकू खपा होते हो ? जाने दो बाबा ! साधूलोक है.

ति. कले. : हो, साधू ! तुला साल्या कोण साधू म्हणेल ? तगडा आहेस. साधू बनून आला आहेस. यात्रा करायची ना तुला, मग जा चालत. रेलवेत कशाला येतोस मरायला ?

साधू : अरे मास्तर, सारा हिंदुस्तान फिरा मगर तुम्हारा जैसा नही मिला.

फकीर : हां सच है. हम ओर ये दोनो सब देश घूमें, मगर ऐसा नही मिला.

ति. कले. : तो बच्चा आज तरी मिळाला ना ? माझा चेहरा पाहून ठेव नीट. दिकरा, माझ्यापायी पण एक यात्राच घडली. चला भटक्यानो.

काबुली : क्या जाओ जाओ ? ये तो रास्ता है. तुम्हारा बाप का है ?

फकीर : अबे, चलो बे, धरमशालामे. ओ पठ्ठे को टकटकने दो.

ति. कले. : काय रे ? धावत का सुटलास ? फकीर ?

एक दूसरा : अब्बे अगडीवाले नही देखा तो. ए मास्टर, सुन ! सारे हिंदुस्तान फिरा, मगर अबी तक एक पायीकी टिकिट नही निकाला.

ति. कले. : असं काय ? बच्चा, हा तुझा बाप तुला चांगला ठिकाणावर आणणार आहे. पहातो ना कसा नि कुठल्या ट्रेननं जातोस ते. चला, निघा.

साधू : हम तो यहीं बैठें. तेरेमे ताकत हो तो उठाव.
(एक विद्यार्थी येतो)

विद्यार्थी : काय पेस्तन, ही सारी फलटण कशाला गोळा केली आहेस ?

ति. कले. : अरे पहाना, साले. रेलवेला ठकवायाला निघाले आहेत. नि तो साधू काय दम भरतोय आपल्याला आणि तो पेहेलवान पाहिलास ?

साधू : एइ, हम साधूलोकको गाली मत दो.

ति. कले. : बघितलं, हा मोठा महात्मा आहे, त्याला शिव्या द्यायच्या नाहीत. अरे साला बदमाश, फुकटचा...

फकीर : (जोराने) चुप रहो.

काठियावाडी : ए बापजी, आम्ही तर तुझ्या पाया पडतो. तीन दिवस झाले. खाल्ल नाही, पोटात गोळे उठताहेत.

ति. कले. : त्याचं काय, माझ्या घराला धर्मशाळा करू का ?

विद्यार्थी : पेस्तन, या सर्वांना उतरवलं, ते आता नाही जाणार. हो ना ? ते रात्रीच्या गाडीनं जातील.

ति. कले : अरे बाबाच्या तबेल्यात जातील. हे पहा, वॉच अ‍ॅन्ड वार्ड-वाल्याच्या माणसांना कसं उभं करतो ? साले भाऊ बापा-वरूनच नव्हे तर दादागिरीच्या गोष्टी करताहेत ?

विद्यार्थी : पेस्तन दिकरा, माझं तू ऐकणार असशील तर सर्वांना जाऊ दे

ति. कले. : काय ? तू पण अस्सल हिंदू निघालास की दानधर्म करायला तुला रेलवेच मिळाली होय. कुणाच्या घरची दिवाळी ?

विद्यार्थी : अरे पुरे रे. तूच काय तो रेलवेचा पाठीराखा, तुझ्यासारखा पाहिलाच नाही काही ! मी खरं सांगू ? जाऊ दे यांना.

ति. कले. : यांची तिकीटं कोण तू काढणार ?

विद्यार्थी : अरे दिकरा पेस्तन ही मोट काही गावाला जड नाही. तू तर अगदीच बेअकली आहेस.

ति. कले. : आता तू मले अक्कल शिकवायला आलास होय ?

विद्यार्थी : ए पेस्तन, हे सावकार काही इथं मेहनत मजुरी करणार नाहीत, आजवर त्यांनी केली नाही आणि पुढे करायचे नाहीत.

साधू : अरे बाबा ! हम तो साधूलोक है.

विद्यार्थी : तू समज…हे सारे साधूलोक आहेत.

ति. कले. : पण त्यात इथं कुणाच्या बापाला…

विद्यार्थी : अरे मूर्खा, ऐक तर खरं, असे भिकारी देशात किती तरी आहेत. तुमची जात एवढीशी, त्यासाठी तुमच्या पंचायती—कडून तुम्हाला धानसाक खायला मिळतं. अरे बाबा, अनेकानी खोटी कमाई करून जे पाप केलं ते हे बिचारे भोगताहेत.

ति. कले. : अरे तू कशाला आला आहेस? शाळा चालवायला आला आहेस म्हणून भाषण देतोयस ?

विद्यार्थी : अरे माझ्या बघडया, खरं सांगू ? या सर्वांनी भीक मागितली तरी पुरं खाणं कुणी देणार नाही. म्हणून हे गावात चोऱ्या करतील.

ति. कले. : मी तरी हेच सांगतोय. साला एक तर हे फुकट प्रवास करतात. प्रवाशांना हैराण करतात आणि रात्री चोऱ्या करतात. काहींचे खिसेसुद्धा कापतात. नाही तर—

विद्यार्थी : नाही तर घरफोडयाही करतील. ही तुमची उघडयावरची रेल्वे क्वार्टर पहिल्याच सपाटयाला निवडतील. आणि बाळ, तू त्या क्वार्टरमधेच रहातोस, विसरू नकोस.

ति. कले. : कान पकडले, बाबा ! तू तर अगदी कमाल करतोस. साला

तो फकीर मलाच रोखून पहातो नि माझ्यावर गुरगुरतो. सीधा माझ्या घरावरच हमला करील की काय ?

फकीर : एय्, गाली मत दो. हम कबी चोरी नही करता.

ति. कले. : नाही रे बाबा ! तू तर सावकार. चोरी कशाला करशील ! हातचलाखीचे खेळ तुला चांगले माहीत. बच्चा, तुला माहीत नाही. तू हे असं सांगून मला सावध करतोस खरा. पण दुसरीकडून आमचे अमलदार मला खाऊन टाकतील. नि तसाच कुणी शहाणा पॅसेंजर मधेच येऊन माझं डोकं खाईल.

विद्यार्थी : या साऱ्यांना एका कंपार्टमेंटमधे कोंबून ठेव. नाही तर आज रात्री फिरता फिरता चार दोन घरं खतम होतील. आणि तू लाइनवर गेलास की तुझं तळं पण साफ झालं म्हणून समज.

ति. कले. : हे खुदा ! बोलवा त्यांना. परत बोलाव, परत बोलाव. ए सावकारांनो, ए शेटजींनो, ए बाबांनो, या-परत या. ए फकीर-साब ! या पहिल्या ट्रेननं रवाना करतो. रेलवे तरी माझं काय भलं करणार !

विद्यार्थी : अरे ते तुझे वॉच ॲन्ड वॉर्ड डिपार्टमेंटवाले काय झोपलत ? बोलाव त्यांना ?

ति. कले. : ए, तू आता बोलू नकोस. साला सारी रात्र हे रिकामे बसतात. कधी रेलवेच्या डब्यातून कुणाची छत्री शोधून आणतील तर कधी एखाद्या हिंदूचं तांब्याभाडं उचळून आणतील. कुणी कधी एखाद्या बाईची रिकामी बॅग कुठून लांबून घेऊन येईल. वर्षात चोरीच्या साडेतीन छत्र्या शोधण्यासाठी हे भलंमोठं खा ं काम करतं. अरे बाबा, बोलाव त्या साधू लोकांना !

विद्यार्थी : पेस्तन, तू पण एक छत्री शोध नि पेटी, बॅग किंवा किमती वस्तू गुल कर. भिकाऱ्यांना कशाला नावं ठेवतोस ? ते तर चोर म्हणूनच चोरीचा धंदा करतात. तुम्ही पैसेवाले असून चोऱ्या करता.

ति. कले. : आता तुझ्या जादा गोष्टी बंद कर. मोठा फिलॉसॉफर आला-यस तो. बघ, बघ तो माझ्या क्वार्टर कडेच चाललाय. एय्, इधर आवो, सब इधर आओ.

(एक वाच ॲन्ड वार्डचा शिपाई येतो.)

एय्, ओ सबको बोलाव पीछा. ओर आरामसे बिठाओ. बच्चा ! रात्रीच या सर्वांना रस्ता दाखवतो. नाहीतर पैसे गोळा करून या सर्वांना पाठवून देईन.

विद्यार्थी : एय् साहेबजी ! जरा दूरवरचा विचार करीत जा. नाही तर तिकीटकलेक्टर मधेच अडकून पडशील.

ति. कले. : अरे बुद्धिपेक्षा इथं खणखणीत नाण्याचा जोर जास्त असतो, समजलास ? अरे चल, जातोस कशाला ? चहा पिऊन जा.

(भिकारी परत एका जागी जमा होतात.)

विद्यार्थी : चल आण, तुला थोडाच पैसा खर्चावा लागणार आहे ?

ति. कले. : नाही रे, स्टॉलवाला माझा कुणी नातेवाईक नाही.

(दोघे जातात.)

फकीर : (गात गात येतो)

यही दुनियामें दो रोज रहेना,
बडा मुसाफिरखाना है;
इधर पडा क्या, उधर गिरा क्या,
सबकु एक दिन जाना है.

(पडदा)

अंक २ रा

प्रवेश ३ रा

पात्रे

रामचरण भैया, डेप्युटी स्टेशन मास्तर, भैयाजी, सोनार, पारशी, बोहरा, वैद्यराज, मारवाडी, कोळी, अनावला, विद्यार्थी, मजूर

रात्रीची वेळ—प्लॅटफॉर्म
(रामचरणची रात्रपाळी आहे. पहिल्या प्रवेशातील डेप्युटी स्टेशन मास्तर प्रवेश करतो.)

डे. स्टे. मा. : (आतील दरवाजातून बाहेर आल्यावर दोन्ही दिशेकडे पाहून हाक मारीत) एय् भैया ! ओ ! एय् रामचरण ! (आत घंटेचा आवाज होतो. तो ऐकून आत जातो. परत बाहेर येतो.) ए केबिनवाला, अरे ए केबिनवाला, (दुरून होकार येतो) ए मेन लाइन क्लीअर करो. शंटिंग एंजिन लेनेका है ? बरोबर (आवाज येतो 'बरोबर') ओर लूपलाइन संभालो. ए...ए...(काही वेळाने भैया येतो) क्यों भैया, किधर गया था ?

रामचरण : किधर भी नही, साहब. केबिनमेसे देखा वो डिस्टंट सिगलका लाइट बराबर नही चलता था. वो बराबर करनेको गया था.

डे. स्टे. मा. : करा बराबर ?

रामचरण : हां साहब ! ये देखो अभी सफेत दिखे बराबर. पहले तो बिलकुल अंधेरा था. वो दिवसपालीवालेको बोलो नही तो रपोट लगाओ. दफे दफे वो कही नही तो कही बत्ती नही जलती. जाकर देखा तो इधर बत्तीमे गॅसतेल भी कम.

डे. स्टे. मा. : अरे भाई, तुला माहीत नाही, अर्धं घासलेट क्वार्टरवर जात असेल.

भैया : हां तो, यही तो मैं कहता हूं. साले चोरी करता घासतेल की, ओ टेशीनमास्तर ओर इस्टाफकी ऐसीही गलती. ओर गुन्हा आपना नाम पर चढेगा.

डे. स्टे. मा. : काय करणार आपण ? कुठं कुठं पाह्यचं ? त्यांचं कर्म ते भोगतील.

भैया : वो तो ठीक है, साहब ! मगर टरेनका भी ए करम देखने जेसा कर देंगे. साले मरनेवाले मरेंगे. वो लोकको कुछ है ?

डे. स्टे. मा. : बरं जा आता. केबीनपर मेन लाइन क्लीअर रखो, शंटिंग एंजिन लूपलाइन पर लो. (आत जातो.)

भैया : हां साहब ! यहां से ही कहता हू (मोठयाने) ए केबिन पर गोबिंदराम है न ?हो...हो...मेनलाइन क्लीअर करो.ओ... ओ...संटिंगका एंजिन लूपमे लेओ...ओ...(उत्तर तेच येतं) बराबर ! ऑलरेट ! जे रामजीकी ! जे रामजीकी ! अभी आता हू. (जातो)

डे. स्टे. मा. : (हातात काही कागद घेऊन परत येतो) अरे भैया, देखो, सब गाडी दो घंटा लेट है.

भैया : सब गाडी ? सब एंजिनको सर्दी लग गयी क्या ? के कुछ तुटाफुटी ? रेलवइ है. साली रोजकी बीमार !

डे. स्टे. मा. : तसं नव्हे रे. त्या स्पेशलसाठी पायलट जाते आहे ना, त्यामुळे. म्हणजे त्या साऱ्या गाड्या सायडींगमधे टाकल्याहेत. आता त्या लाइनवर धावतील.

भैया : अरे हां ! वो इसपीसल, ओर उसका बडा पायलोट भी. ये भी तो बडी बीमारी है न ?अब कहां तक वो बला चलनेवाली है ?

डे. स्टे. मा. : कोण जाणे ! एका स्पेशलसाठी केवढी धावपळ ? आता ती जाईल आणि नंतर परत येईल.

भैया : ओर पिछो भी लेटने वाली ? क्या एक ही रोजमे लाटसाबका काम खतम होगा ? अच्छा भाई ! ठीक हय. सब गाडी लेट. चलो नींद निकालेंगे. आज डबल डयुटी भी हय.

डे. स्टे. मा. : अरे नींद क्या निकालेंगे ? आता कंट्रोल चालेल. नि धमाधम कॉल चालतील. अरे हो, तुला ती डबलडयुटी आहे. पण मी उद्या सकाळी दहा वाजता सुटेन.

भैया : हां साहब ! ओर हम तो देखेंगे कल की साम चोबीस घंटे की डयुटी ! मास्तर साहब, ए तो बडा जुल्म हय. (आत घंटा वाजताच मास्तर जातो.) हां साहब, तुम करा करो परेड. यहां से उधर ओर उधर से यहां. दो घंटा तक गाडीही नही ! (लहान बाक बाहेर आणून त्यावर बसतो.) साला ये बंकडा भी बुड्ढा हो गया, सब हड्डी ढिली हो गयी, रेलवई है चलता है.

(बसतो आणि जोरजोराने गाऊ लागतो.)

रघुबीर कहे ओ सुन मेरे भाई...ई...ई...

तुम चलो झटपट ओर ढूंढो सीता माई...ई...ई

हनुमंत कु लाओ... (मास्तर बाहेर येतो.)

डे. स्टे. मा. : अरे भैया, आत ऑफिसात काहीसं गरम वाटतंय, गरम. नि डास तर जातच नाहीत. इथं खुर्ची आण.

भैया : हां तो साहब ! वो तो इंजनरी की बोलबाल हय. सब इस्टेसन जेलका कमरा. ये लो साब. बयठो. उधर तो मच्छर सारी रात गुनगुनते हय.

डे. स्टे. मा. : हं आता गा. बाबारे भजनबिजन गा थोडं. नाहीतर झोप येईल.

भैया : हां. तो, अभी यही करनेका रहा.

डे. स्टे. मा. : तुझी पेटी आण, नाहीतर ढोलक ?

भैया : ढोलक तो साहब, ऐसा था वो दिन तूट गया वो. ओर दूसरा एक तुटा हुआ एंजिन पर पडा हय. गोविंदराम ! ओ

गोविंदराम ! वो पेटी भेजो तो ? (पेटी येते आणि भैया गाऊ लागतो.) (बिहाग राग)

काल घंटा बजावे, महा काल घंटा बजावे.
साधू हो के सैयां हो सब, कोइ जावे कोइ आवे,
कोइ समेटत बिस्तर तो फिर, कोइ रोवे कोइ गावे ॥काल…
पुन्य पाप की गठरी लेकर, जीव मुसाफर जावे,
रामनाम की टिकट कढाले, फिर अवसर नही आवे ॥ काल…
टननन, टननन; टननन, टननन, आखर घंट बजावे,
राम नाम मे सुन लो भैया, सोहं ध्यान लगावे॥ काल घंटा…

(बाहेरून आवाज आणि गोंगाट ऐकू येतो.)

डे. स्टे. मा. : शाबास भैया, शाबास ! पहा तिथं काय गडबड चाललीय ? (भैयाजी जातो. दरम्यान डेप्युटी स्टेशन मास्तर पेटीवर काही वाजवण्याचा प्रयत्न करतो.)

रामचरण : (प्रवेशून) पासिंजर लोक. ठठ मचाई है. ट्रेन लेट है तो वो अंदर आने नही देता. इसलिये गडबड मचाते हय.

डे. स्टे. मा. : अरे येऊ दे त्यांना, येऊ दे, जा. सांगून ये. बिचारे तिथं कुठं बसतील ? (भैया जातो.)

(प्रवाशांचा घोळका एकदम येतो. दोघे तिघे जण वेटिंगरूमकडे जातात. पण आत जागा नाहीसे पाहून बडबडत परत येतात. दोघे चौघे वरचेवर मास्तरला विचारतात की गाडीला किती उशीर होणार आहे. मास्तर सांगतो अंदाजे दोन तास. सर्व बडबडत बसकण घेतात. कुणी पुढे जातात आणि परत येतात. प्रवाशात सारे पंचरंगी लोक आहेत. कुणी पारशी आहेत, कुणी सुरती आहेत, कुणी अहमदाबादचे आहेत, कुणी पेटलादचे आहेत, कुणी बोहरी आहेत, कुणी महाराष्ट्रीय आहेत, कुणी पंजाबी आहेत, कुणी काठियावाडचे जोशी आहेत. वैद्य आहेत, विद्यार्थी आहेत. चारदोन स्त्रियाही आहेत, पण त्या मागल्या बाजूला जातात. सर्वांकडे पुरेसं सामान आहे. कित्येक स्वतःच उचलून आणतात. तर कित्येक हमालाकडून आणवतात.)

सोनार : काऽऽय मास्तरसाहेब ! चालू द्या. दोन तास नाही तर जायचे कसे ? होऊन जाऊ द्या भैयाजी.

डे. स्टे. मा. : हो, भाई ! जरा भजन गात होता.

सोनार : हो ना. यात वाईट काय आहे ? आम्हीसुद्धा स्वर्गात जाऊ.

पारशी : गाओनी, गाओनी. असा काय करता ? साला टाइम कसा जायल ? मास्तर, ये काय तुमची पक्चुआलिटी काय ? जरा गझल कवाली होऊन जावू दे ना ?

डे. स्टे. मा. : अरे बाबा, स्पेशलची बोलबाला आहे ही.

पारशी : स्पेशीअल ? कुनाची ? व्हॉइसरॉयची की गवर्नरची ? की कोओी स्तेतची राजारानी जानार हाय ? पण त्यात आमाला कशाची सजा ?

बोहरी : अरे त्येचा काय ? गवंदरची इस्पेसल जानार मग आपल्या मानसाची तरेन कांसी जायेल ? दोन घंटे तेब्लो करायच्या आपला ? मी इतकी मुसाफरी करली पन इकता अंधेर बघितला नाय.

पारशी : मल्लाजी, कुटं कुटें जाऊन आला ?

बोहरी : कुटं कुटें फिरला इच्यारते ? ही आपली गाडी पाऊन तो मला वैताग येते. आख्खा जर्मनी फिरला, इटली फिरला, इस्वीझरलॅंड फिरला, ने तेंची टरेन काय वघेल ? इस्टेसन कसा ? सगवड पन कशी ?

मोनार : ओ…हो तुम्ही मल्लाजी काही देशदेशचं पाणी चाखलं नाही का ? व्यापार असेल.

बोहरी : हो ना ! लोखंडाचा वेपार. तीन बार जर्मनी जाऊन आला. पन मी इंग्रजी नाही शिकला. तरी पन मला मुसीबत न्हायी पडली. हिंदुस्तानात नायी शिकलो ते काय विलातमधे जाऊन शिकनार हुतो ?

दक्षिणी : तर मग तुम्ही सेकंड कलासमधून जाणार असाल ?

बोहरी : अरे सेकंदकलास बेकिनकलास गेला. उडत धंदा रोजगारीमधे टक्कल पडलं. एटले आ अपना बद्धा क्लासमा मजा येते.

पारशी : बद्धा कलास की गद्धा कलास ?

काठियावाडी : अरे गद्धा कलास हाये भाइसाब ! गद्धा कलास च्यांगला. आमच्या बापूच्या गाडीमदे तो भाइसाब, डोकं नि पायं असे लांब केले की दोन्ही दाराच्या बाहेर. इथं तर घेडकलास पण चालतो बापू ! घेड कलास ! यांच्यासाटी अखा डबा ठेवतात. इथं तर सरकार मायबापचं राज हाय. तेत थोडं तरी चांगलं हाय.

वैद्यराज : अरे आमच्या बापूच्या गाडीची गोष्टच विचारु नका. नुसती बसायची सोय नाही एवढंच दुःख नव्हतं, ती गाडी चाले तिच्या मर्जीप्रमाणे आणि उभी राही तिच्याच मर्जीप्रमाणे. तसंच रस्त्यात अडकून पडे तेही तिच्याच मर्जीप्रमाणे. या गाडीत तिकीटवाल्याचा जुलूम, टी. सी. चा जुलूम, माल तपासणाऱ्याचा जुलूम. लाइनदोरीसाठी लाच घेणाऱ्याचा जुलूम. आता थंडी आहे ते ठीक. पण उन्हाळा पेटला असेल तर गळा ओला करायला थेंबभरसुद्धा पाणी मिळणार नाही.

मारवाडी : अरे, साले कोंबडीसारखे भरतात ते वेगलंच.

पारशी : ए काय म्हणते ? हे कोंबडी कशाचा ?

सोनार : तो साव कसा म्हणतो, की एकेक डब्यात जशा काही कोंबड्या भराव्यात, आंबे पाकात टाकावे तसे—

बोहरी : अरे आंबा काय. जगा असल तर ना—पण साला माणसाला अंधारकोटडी विचारायची. मूरख. पाटी लावतो की धा माणस बेसेल पण बायकोची शपत, मोजा दहापेक्षा कमी निघेल तर.

कोळी : ओ हो हो ? कौन रे तैयबअली ? आटवतं का ? आपुन इस्टीमरवर भेटले होतो ते ?

बोहरी : कोन—कुटे—एं—कोन मानूस ? अरे हां—हां ! कैसरपर मिलले ना ? हां—हां—याद आली. तू कबा आला?

कोळी : आताच दोन दिसापूरवी इस्टीमरवरून इलो. हितं जरा फिरून यायचं नि परत पोर्टमधं जायचं.

पारशी : काय मुल्लाजी. कैसरशी सेकंड करुन आलास का ?

बोहरी : अरे बावाजी मस्करी काय करते ? कैसरहिंद इस्टीमरवर आमची याची भेट झाली होती. हा कैसरवर क्रूज होता. अजून-पन टोज छे के बाबा ?

कोळी : हां. कैसरवरून लंडनच्या वीस फेऱ्या केल्या. आनि डिटराचा दर्या तो काय माज्या पायाखालचा. आता रजेवर इलो.

बोहरी : साला काय नशीब हाय ? आखा पीएनचा मेल आपल्या हित्मून कोली लोक चलावतात. आनि दुनियेला वाटते सायबाची बादुरी.

एक जण : (लेंगाशर्टमध्ये) स्टेशनमास्तर, नो रूम इन वेटिंगरूम ? जस्ट सी.

मास्तर : यस—(म्हणत उठून उभा रहातो.)

बोहरी : बिचारा इस्टेसन मास्तर काय करेल ? यस फेस केलं म्हनून वेटिंगरूम. तां जगा मिलली न्हायी म्हनजे बगा कसी फुसफुस व्हयील तो.

दक्षिणी : कुणी रेलवेचा माणूस दिसतो.

बोहरी : तो मंग कोपरबरास !

दक्षिणी : म्हणजे ?

बोहरी : खुदाबकस. आता हा सीपाय बंदूक घेऊन येनोय. अस्सल सिकारी दिसतोय. (मास्तर येतो) काय मास्तरसाब, झोपवला काय त्वेला ? सांबाला भाई, कुनी पक्का सिकारी हाय.

मास्तर : अरे शिकारी कसला ? या इथल्या जवळच्या तलावातलं बदक मारतो. तेवढयासाठी दोनचार ऑफिसर मिळून जातात, जसा काही वाघ मारायचाय. आणि आता किती किती धमाल करील.

बोहरी : मी तर समजलो की कुनी मोठ्ठा लढवय्या असल. चेहरा तर आफलातून हाये. बंदुक उचलू शकेल नाही···ही···ही.

(गेलेला पारशी परत येतो.)

काय कावसजी, कुटे जाऊन आले ? चायचा कप घेऊन आले काय ?

पारशी : अरे नाय रे. जरा घडी लावून आलो.

अनावली : अरे आता घडी काय लावायची? ए तो यायच्या तेच वेली येल. तो काय आपल्या मरजीपरमाने गाडी आणेल काय ? ए तो देवाची आगगाडी. कुणी शीक असंल तेवेली तर ही गाडी जरूर उशीरा येल.

पाटीदारभाई : तो काय आपुन रस्त्यामंदी पडले हाय. लेकानं टिकीट दिलं मंग आता भोंगा वाजलाच पाहिजे.

पारशी : अरे तुमी बधा असा रेलवेवर का गुस्सा करते ? असा म्हना की ही कशीबी हाये, ती उपयोगी पडते.

(दोन तीन विद्यार्थ्यांसारखे दिसणारे लोक एका बाजूला बसून हे सारं ऐकत होते. त्यातील एक जण चिडून बडबडू लागला.)

विद्यार्थी : कमली उपयोगी पडते ? आणि उपयोग होत असेल तर उपकार थोडाच करतात ? पैसे घेतात इतकंच नव्हे तर लुट-तात. आपला देश अगदीच अज्ञानी त्यामुळे हम करे सो कायदा असा व्यापार चालतो. पाया नसलेल्या गोष्टी आपण शिकतो त्यामुळे आतापर्यंत रेलवेचा फायदाच होत गेलाय. कुणाही शाळेतल्या मुलाला विचारा तो पोपटासारखं पटपट सांगत सुटेल 'पूल' बांधले, प्रवासाच्या सोयी वाढल्या, तारेच्या दोऱ्या टाकल्या, व्यापाराचा लाभ झाला—'

बोहरी : कोना बापाचा वेपार ? अरे, मी सांगतो ए तो—

विद्यार्थी : जरा थांबा ! दोन मिनटं थांबा मल्लाजी.

बोहरी : हां हां बोला.

विद्यार्थी : सारे साडेसत्तर लाभ सांगतील. पण पहा, तुम्ही हिंदुस्थान सारा पालथा घाला, मोठमोठी शहरं स्टेशनपासून दूर दोन मैलावर, काही दहा मैलांवर. वारेवा ! व्यापार बघाल तर जकातचा अंदाज नाही. परदेशाहून मुंबईला माल येतो तो असतो स्वस्त आणि दिल्लीहून मुंबईला माल आला तर तो असतो महाग.

बोहरी : मोरीसची साखर मुंबईच्या बाजारात आपाल्याला सस्ती परते आनि नीनीतालची महाग परते. माफ कर बच्चा !

विद्यार्थी : थोडक्यात काय, की तार, टपाल, रेल्वे प्रजेच्या कामात किंवा प्रजेच्या सोयीसाठी नाहीतच. ती फक्त कमाई करण्यापुरतीच. बाकी खरा लाभ कोणाला मिळतो हे साऱ्यांनाच माहीत आहे. कुणाला सांगता हे? हे पूल बांधले यात बहादुरी कसली? खरं तर मोगलांनी कलकत्ता ते दिल्लीपर्यंत मोठमोठे दूरवरचे रस्ते बांधले होते. त्यामधे नदी होती की नाही? हे नाले आणि खाड्या अशा आकारहीन बांधल्या आहेत की पुढला मागला विचारच केला नाही. पावसाच्या पाण्याला वाट मिळत नाही. खाचखळगे भरून रहातात आणि अख्ख्या देशात डास लोकांचं रक्त शोषतात नि मलेरिया वाढत रहातो.

वैद्य : अहो, मलेरिया कसा वाढतो! एवढा विषारी, एवढा विषारी की आमच्या वैद्यकशास्त्राला आव्हान देतो. एवढ्याशा गोष्टीसाठी भलते उपाय करण्यानं साराच सत्यानाश होतो. मलेरियावाले मोठ-मोठे डॉक्टर येतात, आणि रोग्याऐवजी डास तपासतात इथून तिथून. नंतर भर भर भरून क्वीनीनचा मारा करतात. निंब, काडेचिराइत, तुळस या झाडांचा सत्यानाश करतात, पाहिल्याबरोबर कापू लागतात. मलेरियाच काय पण त्याचे काका मामा इतर ताप शरीरात कायमचं घर करतात.

बोहरी : अहो, आपले हुसेनभाई मुन्सफा हकीम पण अशीच ओरड करतात.

विद्यार्थी : तेच. आता हा पूल बांधला. काय याचा उपयोग? ते असं समजतात, की शंभर टक्के व्याजानं रक्कम अटकवायची. एक पावसाळा गेला की नंतर पहा किती रूळ वाहून जातात, किती पूल तुटतात! तुम्ही आजच पहा ट्रेनमधून जाताना. पूल आला की तिथं दुरुस्ती काम चालू. आता ते एक काँक्रीटचं ढोंग आलंय त्यामुळं सीमेंटचा ढीग पडलेला. शिवाय नवा इंजिनीयर आला की त्याचं काहीतरी. बारा महिने काही ना काही काम चाललेलं असतंच. कुठं रूळ घालणं असतच. स्टेशन कसं बांधलय पहाना. एक नवं स्टेशन बांधलं की पावसाळयानंतर भिंतीला चिरा. आकार तर तबेल्याचाच. जिथं मिळेल तिथून

कॉंट्रॅक्टर आपापले खिसे भरून घेतात, काम चालू ठेवतात. आणि यात पंधरा जणांची भागी असते, ते वेगळंच. हे साले माती भरायच्या उघडया गाडीत मजुरांना भरून पळवतात इथून तिथे. न्हाणं धुणं तर काय बिचाऱ्यांना एक वेळेचं जेवण बनवायलासुद्धा वेळ मिळत नाही. सारं बांधकाम तकलादी, खातं चोरांचं ! खर्च पहाल तर लाख लाख. पण माल तुटका फुटका परदेशातून येणार जाणार. ते तिथलं घडयाळ पहा. मोजक्या चार आकडयांच्या किमतीत खरीदलं असेल. आपल्या मास्तर साहेबांची टोपी, शिटीआणि बत्ती पहा. इंजिनीयरिंग, मेडिकल, लोको, ट्राफिक, पर्मनंट वे, कॅरेज, इलेक्ट्रिक, रोलिंग-स्टॉक कोणतंही खातं पहा. दहा आकडयाचा माल आणि टिकायला तकलादी. मग तिकिटाचे दर आपल्याला महाग पडतात यात नवल ते काय ? जास्त सोयी मिळणार कुठून ? आणि वर मोठया पगाराचे अंमलदार आहेतच की !

डे. स्टे. मा. : अरे भाई, आत्ताच काटकसरीच्या नावाखाली तीन नोकर कमी करायचे आणि वाढवायचे तेरा अंमलदार असा हिशेब आहे. दहा दहाचे पाच नोकर कमी करायचे आणि पाचशेचे पाच अंमलदार वाढवायचे नि ते वीस वीस वर्षांचे बच्चे, कमलाच अनुभव नाही.

बोहरी : सरल तिथून पारसल केलेला, तद्दन टाजो माल !

विद्यार्थी : पण ते असंच होतं ना ? डायरेक्टरचा नातेवाईक, मामा मावशीचा—तिथं नाही जागा त्याला—तो कचरा इथं पाठवायचा. अहो साहेब, मास्तरना विचारा, एक मेल ट्रेन रिकामी जायला लावतील. मर्जी लागली तर या गाडीत दोन पॅसेंजर—साहेब नि मडम—त्यांच्यामागे वीस माणसं, स्वयं-पाकासाठी आणि दिमतीला काही लोक. मुंबईहून पेशावरला आणि पेशावरहून कलकत्ता, तिथून मद्रास, मद्रासहून मुंबई. पंजाब मेल, अफगान मेल आणि फ्रंटियर मेल, मोठमोठी नावं. फर्स्ट क्लास, सेकंड क्लास. प्रत्येक गाडी नुकसा नतीधावते.

याचा सारा खर्च आपल्या या लाल तिकिटातून काढायचा. अर्थशास्त्राच्या दृष्टीनं व्यापारात गैरसोयी काय आहेत हे तुम्हाला आता कसं समजावून देऊ ?

बोहरी : अरे, अरथशासतर नि बरथशासतरच्या गोष्टी काय करते ? वेपारच्या सतियानाश टो मी जानतो नी ? मिस्टर तुमी लेक्चर छान दिला. पण येमधी काय मिलाला ?

काठियावाडी : भाई, शिकलेला हाय म्हनून ह्ये समजते त्येला. कवा तरी ह्येच्यामधून कायी फायदा मिलेल.

बोहरी : कावसजी ! थंडी लयी लागते की काय ? जरा चायचा कप घे ना.

पारशी : अरे आ पंचात आताच का काडली ? ए मिस्तरच्या पन ताजा कोलेजचा वारा भरलाय, तवा ही बडबड चालते. नायतर कोनी टिकीट कलेक्टरानी बेवडा पिवून सतावलं असेल. वाईट वाटून घेऊ नको बाबा. बोला तुमी बी चाय पिएल ना ? मल्लाजी तुमी बी ? दुसरे कोन कोन बोला ?

बोहरी : हो, हो, काय ? एकदम धरम कराया आले ?समदे पितील.

पारशी : चला देते. चला देतेच. हां—किती कप—पाच दस—

डे. स्टे. मा. : तुम्ही बसा. मी नोकराला बोलावतो. एय्, कोण ? भैयाजी ? स्टॉलवाल्याला चहा सांग.

बोहरी : ए भैयाजी, जरा ऐक, अपना तरफथी खारी बिस्कीट. सगल्यानला.

पारशी : तुमाला पन काय तरी झाला.

बोहरी : तेत काय जाला ? सगली मजलिस बसली हाय. मग कुनी कुटं जातील, कुनी कुटं जातील. मागून कवा मिलेल खुदा जाने ! नाही तर त्या तिथं !
(आकाशाकडे बोट करतो.)

पारशी : मास्तर साहेब ! खरी मिजलस हाय. जरा भैयाजीला सांगा ना, की म्हन म्हनावंगानं. ही घिया पेटी. बावाजी आमाला ते पें पें करायला येत नाय. नायतर आता मीच सुरुवात केली असती.

सोनार : एवढया जणात कुणी असेल त्यानं द्यावी एक तान ठोकून. शांतवेली धीम्यानंच होऊ द्या.

बोहरी : काय, तुमी झोपून गेलात ?

सोनार : नाही हो, एक डुलकी काढली. पण आता मी सांगतो, चला होऊन जाऊ द्या. जरा तरतरी येतेय.

(एकाएकी कोपऱ्यातून काठियावाडी.)

काठियावाडी : ए ऽ ऽ ऽ ऽ

सोनार : वाहवा !

काठियावाडी : ए ऽ ऽ

नववधू, वाडी, नि गाडी, पैशा विण ना राहते
(पण) कडू गोड मायपरि, पैशा विणही सांभाळते.

एक जण : शाबास ! शाबास !

वैद्य : (एकदम) ए··· तिरळी, जाडी नि वेडी, वैद्य विण चाले कधी
पण वेडावली नाडी, वैद्य विण चाले नाही

एक जण : वा: वैद्यराज ! वा: ! चालू द्या, चालू द्या !

काठियावाडी : कण तो खुपतो नेत्री, कंटक सलतो चरणी
विंधी हृदया दु:शब्द असह्य वियोग सर्वाहुनी.

वैद्य : परि वियोग केव्हा हो सुसह्य, ग्रहपीडा त्याहून दुर्निवार्य
तो खराच समजा जीवनान्त, विन्मुख हो जेव्हा भिषग्वर

एक जण : वाहवा वैद्यराज ! काय मल्लाजी ?

बोहरी : यात आमची भागी नायी. आ जो वेड हाय ने ते आमी समजते. तंटा बिटा आमाला करायचा न्हायी. काय कावसजी ? आता ते तुमची पाळी हाय.

पारशी : अरे बाबा, मी काय कुणा बावाचा चेला—

बोहरी : काय, तुमी तुमच्या बावाजीचा चेला. हं होऊन जाऊ द्या.

एक जण : हां भाई, वेळ काढायचाय.

पारशी : तर मग ऐका. ही एक छानशी चीज सुनावते. यात ताल तंबुऱ्याचा नि थाट ठुमरीचा.

(भजन)

अ···अ···अ···

सुखदुख मनमा नहो आनीए रे घत साथे रे घडोआं,
ताल्या ते कोइना नव तले रघुनाथनां जरीआं ।। सुखदुख.
(सर्वजण 'सुखदुख' म्हणू लागतात)
ए, हरिसचन्दर सरीखो राजीओ, जेनी मंडोड्री रानी,
बार वरस वनवन भतकी, नइ मले अंन ने पानी ।। सुखदुख
ए, रामचंदर, जेवो राजीओ, जेनी दमयंती रयानी,
अरधे वस्तर वनवन भमी, रामजी रूए रे साद तानी।। सुखदुख.
ए नल राजा सरखो राजीओ, जेनी तारामती पतरानी,
एना छप्पन पर भोगल वाजीआ, ने थयुं बढुं धुलधानी ।।सुखदुख
लोग हो आमाला हे असलं येतं, तानपलटाची यात ते वरी न्यारीच हाय.

बोहरी : अरे वा ! फसकलास गायला. मला शब्दन् शब्द समजला. तुमी बी बाबाजी ठीक शिकलात. चला, आता दुसरा कोन निकलते ?

(घंटा वाजते, मास्तर जातो.)

सोनार : चहाची ऊब कुणाला लागली नाही का ?

(मास्तर परत येतो.)

पारशी : काय सायेब, आज ट्रेन येल असा वाटते काय की आज रजा पाडवायची ?

डे. स्टे. मा. : येईल, येईल. धीर धरा. काय जंगलात आहात का ? आता फार वेळ नाही लागणार.

एक जण : हं—दरबार चालू—

काठियावाडी : कुसुंब्याच्या धुंदीत दरबार चालविण्याचे दिवस केव्हाच संपले. दरबारचे थाट चालत तेव्हा तर बापू गिरिकन्दरात चहु-बाजूनी 'वाहवा वाहवा' चा प्रतिध्वनी उमटत असे. समुद्राच्या लाटाप्रमाणे त्या दरबारचं लष्कर जात असे आणि पवन-वेगी सांडणी देशातील कोपऱ्या कोपऱ्यातून किल्ले सर करीत चालत असे. जनसमूहाचं यशोगान गगन मंडळात जाऊन पोचत होतं तेव्हा रयतेच्या शेताशेतातून माणसाएवढी मोठी पिकं वाऱ्यानं झुलत असत. बापूजी ती त्यावेळची कथाच वेगळी

आणि आता तर—

(गाणे)

अगनगाडी आंगण आवी...

हे, फूले फाल्या मलकनी मांय, अगनगाडी आंगण आवी.

ए, लीलालीला सीमाडानी छांय, उपजनी मांगण आवी.

—अगनगाडी.

हे, कुंजन वन ने नाघेरनी सोड, काळमूखी वाघण आवी

रे, मीठा पमरे वायराथी चोड, तेमा रे गंधारण आवी.

—अगनगाडी.

(स्टेशनमास्तर आत जातो.)

ए, आघा आघा देश परदेश, एनां रुडां लसांघण लावी,

रे, कूडा कीध कणबीना वेश, एने माटे लांघण लावी,

—अगनगाडी.

ए भोळा भोळा भारतने भाग्य, परदेशी कामण लावी,

मलक फरतां झेरी फूंफाट. डंखीली नागण आवी

—अगनगाडी.

दोघेतिघेजण : अरे वाहवा ! शाब्बास ! आगीनगाडी अंगणी आली. वाहवा ! मजेदार आहे.

(स्टेशन मास्तर येतो.)

हे. स्टे. मा. : गाडी निघाली. चला.

बोहरी : हो-हो पैसा वसूल होयेल खरा.

पारशी : ओ खोदा ! घ्या तुमी जे गायला ते खोदायजीने तुमची अर्जी ऐकली नि गाडी डिस्पॅच केली. चालो, जमेल तो समदा लोक साथेच बसू द्या. रात चांगली जायेल.

एकजण : काय बावाजी, झोपायला देणार आहात की नाही ?

(सर्व आपापले बिछाने तपासू लागतात. उभे राहातात, नमस्कार करतात, आपसात बोलू लागतात.)

एकजण : ए भाई, बोलला चालला त्याची माफी करा.

दुसरा : यात बोल ला काय नि चालला काय ? आता गाडीच बोलेल आणि गाडीच चालेल.

एक : (दूर पाहून) आली खरी, आली खरी. हा झळकता दिवा तिचाच ना ?

दुसरा : अरे, हा तर नागिणीचा मणी.

एक : अरे, मणी नागाचा असतो.

दुसरा : मग नागाकडून चोरून आणला असेल. रात्री रस्ता दिसत नाही ना, म्हणून !

डे. स्टे. मा. : (हातात तार धरून उतावीळपणाने, घाईत) भैया? ए भैया !

रामचरण : हाँ साहब

(टेलिफोनची घंटा होते. मास्तर धावत फोनकडे जातो.)

एकजण : एकदम काही गडबड झालेली वाटते.

रामचरण : क्या नसीअयत है साहब ?

डे. स्टे. मा. : भैयाजी, आज जे काही घडेल ते थोडंच म्हणायचं ! काही समजत नाही. एक तार आहे, देखो इस्पीसलका लाईट एन्जिन तय्यार रखो. केबिनको बोलो.

(पुन्हा घंटा. मास्तर जातो.)

रामचरण : ए केबिनवाला···आ···ए···ए···

डे. स्टे. मा. : (एकदम धावत गेऊन) भैया ! वन काऊ रन ओवर !

रामचरण : क्या साहब ?

डे. स्टे. मा. : एक गाय कट गयी. ड्रायव्हर रिपोर्ट करतोय. विनाकारण एक काम वाढवून फिरतोय.

रामचरण : साहब, गाडी आ रही.

डे. स्टे. मा. : अरे हां. एक घंटा लगाओ.

(स्टेजच्या एका बाजूने फूट लाईट लागतो. हात उंच करून पॅसेंजरना बाजूला सारणारा पोर्टर सूचना देत एका बाजूने येऊन दुसऱ्या बाजूने जातो. सारे पॅसेंजर येणाऱ्या गाडीच्या दिशेकडे पहात प्रेक्षकांकडे तोंड करून उभे रहातात. लगेच गाडीची घंटा वाजते.)

मजूर : बा···आ···जू !

(पडदा पडतो.)

अंक ३ रा

प्रवेश १ ला

पात्रे

साहेब, उजलसिंग, नारण

मध्यरात्रीचा अंधार. रुळावर एक ट्रॉली पडलेली आहे. जवळच एका नाल्यावरील पुलाच्या बाजूला दगडाचा ढीग असावा असं वाटतं. पेट्रोमॅक्स जळत आहे.
(दोन तीन साहेब बोलत उभे आहेत. त्यातला एक पंजाबी असावा असं त्याच्या शीख फेटयावरून वाटतं. एक्स. ई. एन., पी. डब्ल्यू. आय. टी. आय., बी. आय., इंजिनीयर, रस्त्याचा मुकादम, टेलिग्राफ इन्स्पेक्टर आणि पूल मुकादम सरदार उजलसिंग.)

एक साहेब : अबी कोयी नही आटा ?

उजलसिंग : यस सर. अभी आता होगा. पांउसे चलना और ठिकाने ठिकाने पर आदमी खडा रखना इससे देरी हुअी होगी.

दुसरा साहेब : ब्रिज बराबर हय ?

उजलसिंग : हां साब. अभी देखा.

तिसरा साहेब : सब ऑलराइट उजलसिंग? आदमी लोकवु सब समजाया

हय—कैसा खडा रहना, क्या करना, कहां तक—सब ?

उजलसिंग : हां साब ! सब लोकको बोला हय—वो मशाल हाथमे रखना, ऐसी पीठ करके खडा रहना, और लंबा न… रखना. इसपीसल चली जावे फिर भी पंदरा मिनट तक खडा रहना. सब बराबर समजाया हय.

एक साहेब : धीस ब्लडी कोल्ड !

उजलसिंग : हां साब. थंडी तो बहोत हय. मगर ये मशालकी गरमीमे ठीक रहेगा.

दुसरा साहेब : उजलसिंग, उसको बोला हय कि ट्रेन चले गये बाद दोडना नही ?

उजलसिंग : हां साब, बराबर कहा हय. हमको याद हय एक बखतका नतीजा. अखबारमे पढा था. एक बखत कोई नेटिव्ह स्टेटकी इसपीसल चली जा रही, और जंगली मशालची गाडी के पीछे मशाल लेकर भागा. वो समझा सरकार माबाप की गाडी के पीछे भागना ही चाहिये. मीटर गेज और इस्पीड कम होगी. तो साब, बॉडीगार्डने देखा ओर एकदम बंदूक लेकर गोली छोडा ओर शूट किया. ही ही ही ही ! ऐसा हो जाता है कभी कभी. सब जंगली लोक, बिलकुल समझे ही नही.

एक साहेब : येस…पुअर मॅन !

उजलसिंग : हां साब, दुसरा क्या हो सके ? मशाल लेकर ही भागा. वो तो समझा के में डयुटी करता हूं. मगर शूट हो हो गया.

दूसरा साहेब : नाले की, एवो बाजू एक, ओर ये बाजू भी एक रखेगा ? ऐसा इधर एक लेबररको रखना.

उजलसिंग : अच्छा साब. ऐसा ही है लिस्टमे भी. ये आ रहा—एक.

एक साहेब : इधर तक अपना डिस्ट्रिक्ट है—ये नाला अपना डिस्ट्रिक्टमे आता हय ना ?

उजलसिंग : हां साब, यहा तक ही अपना. वो छेल्ला एक ही मशालवाला इधर रहेगा.

[इतर दोन तीन ऑफिसरबरोबर नारण मशाल घेऊन येत आहे.)

(नारणला) देखो, इधर खडा रहना. पूलकी ये बाजू इसपीसल जावे, पीछे भी पंदरा मिनीट तक यहां ही रहना. पीछे लौट आना. समझा ?

एक साहेब : ही इज अे बॉय !

उजलसिंग : हां साब, लडका ही हे, इतना लेबरर भी सब मुष्कील से मिला. ये थंडमे कोई आता नही. ओर पैसे कम पडते .

दुसरा साहेब : ऑलराइट, अब जायेंगे तो ? टेलिग्राफ़ ऑलराइट. लाइन ऑलराइट. ब्रिज ऑलराइट ?

उजलसिंग : हां साब. आलराइट सब. (नारणला) अच्छा ! देखो क्या नाम तुम्हारा ?

नारण : नारण

उजलसिंग : नारण, अभी इधर से हटना नही. साहब देखेंगे तो मारेंगे. इधर ही खडा रहना. समझा ?

नारण : हां साब.

एक साहेब : पुअर बॉय ! अच्छा चलो.

उजलसिंग : ट्रॉलीमॅन ! एय ट्रॉलीमॅन—किधर गया ?

एक साहेब : क्या टाइम हुआ ?

उजलसिंग : एक पंधरा. अभी तो दो घंटेकी देरी है साब. अच्छा ! नारण, इधर खडा रहना. हे···एय···ट्रॉलीवाला···

(ट्रॉलीवाला येतो. सर्व ट्रॉलीवर उडया मारून बसतात. ट्रॉली ढकलायला सुरवात होते.)

(पडदा पडतो.)

अंक ३ रा

प्रवेश २ रा

पात्रे

पोर्टर, केबिनवाला, डेप्युटी स्टेशन मास्तर,
रामचरण, गुलाम महमद, कॉलबॉय.

पहाटेचा समय.
(प्लॅटफॉर्मच्या एका बाजूचा शेवट. जवळच केबिन. फारसा उजेड नाहीच. मागे काळा पडदा.)

पोर्टर : (बत्ती हालवीत) केबिनवाला···ए···हे···शॅटिंग एन्जिनला लुपलाइनमधे जाऊ दे···

केबिनवाला : (केबिनच्या खिडकीतून) कबसे धकेल दिया—अब क्या चिल्लाता हय ? अरे पोर्टर, मास्तर साहब किधर हय. अभीतक नही आये ?

पोर्टर : ते येत्यात सायडींगमधून. साली थंड लयी लागते. एय भैया, मेनलेन क्लीअर करो···

केबिनवाला : अरे ये क्या टिकटिक लगाया है ? अभी विसल तो दिया भी नही. तुम तो कोइ दिन किसीकु पटक देगा !
(डेप्युटी स्टेशनमास्तर येतो.)

पोर्टर : बगा, बगा मास्तरसाब, या बाजूला तार पडलीय नि त्या बाजूला पायतण आडवं पडलंय.

डे. स्टे. मा. : हो बाबा, आडवंच टाकलंय. अरे भैयाजी, ए भैयाजी ?

रामचरण : आये मास्तर साहब ? बहोत देर लगी ? अभी क्या झगडा है ?

डे. स्टे. मा. : अरे झगडा फार मोठा आहे. या स्पेशलनं गार करून टाकलं. अजून इथं कोण जाणे किती वेळ कुडकुडत रहावं लागेल. अरे पोर्टर, पहा वरं, ऑफिसमधे मोठे मास्तर जागे आहेत की झोपलेत ? फोन बिन आला नि हे झोपलेले असले तर भरलीच शंभर वर्षं !

(पोर्टर जातो.)

रामचरण : बडे मास्तरकी आप क्या इतनी फिकर कर रहे हो साहब ? वो तो लपेट गये होंगे.

डे. स्टे. मा. : अरे बाबा ! तो सुद्धा आपला भाऊच आहे ना ? नाहक नोकरी गमावून बसेल त्यात काय फायदा ?

रामचरण : ठहरो साहब ! में इस्टुल भेजू नीचे ?

डे. स्टे. मा. : अरे नको रे बाबा नको. ही नोकरीच आहे खडी ताजीमची. उगीच कुणी चहाडी करायचा आणि मत्सराच्या जाळयात अडकायला व्हायचं. आता सकाळ व्हायला उशीर नाही. किती वाजले ?

रामचरण : चार पचास. इसपीसल तो निकल गयी होगी. अब वो गुड्स लेने की रही. अभी कुछ लाइन क्लीअर नही आया.

डे. स्टे. मा. : येईल ना ! अजून वेळ आहे. रामभैया, इसपेशलचा रुबाब अगदीच वेगळा होता.

रामचरण : हां साहब. सुपरहीटर अंजिन, ओर पंधरा रोजसे घिसघिस के चमकता बनाया. ओर बोगी भी अच्छी थी.

डे. स्टे. मा. : उभी होती तेव्हा आणि स्टार्टपण छानच घेतला. पण रामभैया तू नसतास तर असं झालंच नसतं.

रामचरण : हा साहब, केबिन तो उसका, समजो न, के कलेजा है.

डे. स्टे. मा. : हो. रुळाचं वळण ठीक होतं. आणि लाल—हिरवी बत्तीसुद्धा

ठीक होती. खरं तर तुझ्या ह्या दोन सांध्यावर सारा आधार आहे.

रामचरण : रामजीका आधार, साहब !

डे. स्टे. मा. : हा सांधा जर सुटला तर सारं खतम···अरे या शंटिंग एन्जिन को लो मेन लाइन व···र···हं बरोबर. भैया जाने दो···

रामचरण : ये कौन है आज ? छन्नुमियां क्या ?

डे. स्टे. मा. : हो. छन्नुच तो. जबरा धांदली ! रामभैया, इतका नालायक माणूस, आगवाला आणि ड्रायव्हर. काय भपका अन् रुबाब ! अन् ही राक्षसी गाडी ? धडधडाट करीत चालली ! आहे का तिला चिंता? झपाटयासरशी, नाही एंजिनला फिकीर. हे दोन फाटे अन् धडधडाट चालत जाणार. नाही कुठला समोर खड्डा की टेकडी, नदी की नाला. सगळं सारखं हिला.

रामचरण : साहब. आगगाडी हय. चली वहां तक चली. मगर आगकी साथ रमत हय साब.

डे. स्टे. मा. : ते तर खरंच. सहज चूक घडली तर 'राम बोलो भाई राम', तो तर साक्षात अग्नी, कोपला तर सत्यानाश.

रामचरण : अरे साहब, उसका जोर देखो ओर उसकी नौकरी देखो. कैसा काबूमे रहता हय वो ? मगर अपने आदमी लोक ? आप कम-जोर और गुस्सा कितना करते हय.

(पोर्टर येतो.)

पोर्टर : साहेब, तार हाये. फलाटावर पार्सलाचा हा ढीग पडलाय, तो कशातून जानार ?

डे. स्टे. मा. : दे. बत्ती वर धर पाहू. (वाचतो.)भैया, भैयाजी! कारखान्यात विचार फोनवरून, काय झालंय ?

रामचरण : क्या है साहब ?

डे. स्टे. मा. : अरे तुम पुछो. वन ट्वेन्टी टू का एन्जिन पर बाधर आया— कुछ गडबड हय !

रामचरण : (मोठयाने) अलाव रनिंगशेड, ये कौन है ? स्टोरवाले ? साला कोई जवाब नही देता—कहां मर गये ? एई अलाव···एई ···कौन हे तुम ? कहाँ मरा था ? अच्छा क्या कुछ अक्सीडंट

हुआ…बाघरकु ? हां…हां…हां…पिछे ?…;हां…हो…
बाघरजी ?…मास्तर साहब, सुनो, कहता हय के बाघरजी अंजिनपर से गिर पडा, ओर हालत गंभीर हय. अभी वो गुड्स आया—कहां, किधर गिर गया वो कुछ कहता नही. अभीतक कारखानेमे हय ओर डाकटर के लिये भेजा हय.

डे. स्टे. मा. : मला वाटलंच होतं. ही तारसुद्धा काय सांगते ते कळत नाही. पुछो भैयाजी, कारखान्यात ठेवताहेत की घरी नेताहेत.

रामचरण : (टेलिफोन ऐकल्यानंतर) साहब, बोलता हय के अभी कोठडी-पर ले जाता है. साहब, बोलो क्या करना—साली नोकरी हय या गुलामी ?

डे. स्टे. मा. : पोर्टर ! जा बरं, मोठया डॉक्टरांना माझ्या वतीने बाघरच्या कोठडीवर यायला सांग. वर दुसरें कुणी आहे ? त्याला बसव नि तू चल.

रामचरण : अयसा आ सकता हुं साहब ?

डे. स्टे. मा. : हं…हं…चल. रेलवेसाठी माणसाचा प्राण गेला तरी त्याला रेलवेचा नोकर एवढीसुद्धा मदत करू शकणार नाही का ? डयुटीचा अर्थ मला कळतो, समजतोही. पण कुठे ? (दरम्यान भैया खाली यायला निघतो) इथं—आठ तासाची…चौदा चौदा तासाची नोकरी आहे. नोकरीत कोणत्याही प्रकारची कदर केली जात नाही, प्रामाणिकपणा नाहीच. सारं तंत्र सडलेलं तिथं कर्तव्याचा आदर्श राखणं…

(रामचरण येतो)

रामचरण : चलो साहब, हमको भी सब घोटाळा मालूम होता हय. वो साला जोन्स बडा दारुबाजी करता—

डे. स्टे. मा. : भैया, आपल्या कारखान्यात काय चांगलं आहे ? ते लोक त्याला घरी नेत असतील तर इथूनच नेतील. याच रस्त्यानं.

रामचरण : हां साहब. ये भी ठीक है. अभी आते होंगे.

डे. स्टे. मा. : हो ना. आणि मला वाटतं की तो तोच येतोय.

रामचरण : साहब, डाकटर क्या आज आवेगा—ये दिवालो चलती

है तो रातकू सोता भी नहीं होगा. वो पट्ठा उठने वाला ही नही.

डे. स्टे. मा. : एय्, कोण आहे रे ?

एकजण : कलीमेन साहेब ! बाघरजीला घेऊन जातोय.

(चार क्लीमेन बाघरजीला एका तुटलेल्या खुर्चीवरून उचलून आणतात आणि घेऊन जातात. मागे गुलाम महमद आहे. तो जरा थांबतो.)

डे. स्टे. मा. : कोण गुलाम महमद ? काय, तो कसा आहे ?

गुलाम महमद : ठीक आहे साहेब. खुदा रहेम करे और जीये…

डे. स्टे. मा. : का ? जास्त लागलंय का ?

गुलाम महमद : ते तर आता काय सांगणार ? पण मास्तरसाहेब, रक्त सळसळतंय.

डे. स्टे. मा. : पण काय झालं ते तर सांग.

गुलाम महमद : साहेब, विचार करा, आजपावेतो किती आगवाले एन्जिनवर चढले आणि उतरले, नि बाघरजीच पडला ? आणि ते सुद्धा कबूल. पण एन्जिनवरून पडला तर गालाला सूज येईल ? डरावरलोक किती पिऊन गाडीवर जातात हे माहीत आहे ना ?

रामचरण : साहब, मैं नही कहता था ?—वो साला जोन्स है ही शयतानकी औलादका.

गुलाम महमद : अरे भैया, तो शयतान खरा. पण शयतानच्या औलादचा नाही.

डे. स्टे. मा. : म्हणजे ?

गुलाम महमद : साहेब, तुम्ही तर मोठे माणूस तुम्हाला काय कळणार हे डावपेच ? बाघरजी आणि जोन्स एकाच वंशातले हे तुम्हाला नाही ठाऊक. एक सोन्यासारखा तर दुसरा माती-सारखा.

रामचरण : कहा कहत हो भैया ?

गुलाम महमद : कहा कहत क्या ? तू तर आलास परदेशाहून. अलीकडे आलास रहायला. मी लहानपणापासून ओळखतो. माझा म्हातारा

सांगतो म्हणून ठाऊक. जोन्सला कमी नका समजू साहेब ! दुरून पहाल तर एका रक्ताचे. जोन्सचा बाप लहानपणीच किरीस्तांव झाला. या गोष्टीला पन्नास वर्षं झाली—आणि बाघरजीच्या बापाजवळ जमिनीचा तुकडा होता. जोन्स-बाघरजीचा चुलत चुलत भाऊ. ते वैर···

डे. स्टे. मा. : काय सांगतोस गुलाम महमद ?

गुलाम महमद : खरं वाटत नसेल तर विचारा माझ्या नूरा म्हाताऱ्याला. ते सर्व एका जमान्याचे, साहेब. त्या जमिनीच्या तुकडयासाठी बाघरशी वैर. त्याची निष्ठा बदलली नि तो बदलला. पण खवीस कधी बदलतो, साहेब ? खुदाकडे त्याचा इन्साफ होईल.

डे. स्टे. मा. : तो का बाटला ?

गुलाम महमद : राहू दे ते साहेब ! लांबण लावण्यात काय फायदा ? बाटला. हलकी जात, गरीबी, पैसा मिळत नसे. हिंदू जवळपास फिरकू देत नसत, नजरसुद्धा टाकत नसत. अशांना मिशनवाल्यांनी पंखाखाली घेतलं. बाघरजीचा बाप इमानदार, तो वाचला, आणि या जोन्सचा बाप किरिस्तांव झाला—नंतर शिकला सवरला, साहेब झाला !

डे. स्टे. मा. : चल बाबा, चल. ते लोक पोचलेसुद्धा असतील. अन् डॉक्टरही तिथं येऊन पोचले असतील.

गुलाम महमद : साहेब, डॉक्टर येत असेल. जोन्ससाहेब चुकेल असं समजू नका. मी काय म्हणतो समजलात ना ? तो स्टेशनजवळच पडला नि बेशुद्ध झाला. गार्डच्या बराकीत ठेवून आलो, असा रिपोर्ट त्यानं केलाय. दुसऱ्या आगवाल्याची त्याच्यावर सही. त्यानं दम दिला असेल. त्याला नोकरी करायचीय. म्हणून त्याचीसुद्धा हीच जबानी. जोन्स येऊन कारखान्यात उभा राहयला नाही. तो डॉक्टरकडे गेला असेल नि नोट दाबली असेल. या एवढया कारखान्यात एकच ईश्वराचा माणूस होता. बाघर, तो बाघर ! तो भला म्हणून त्याच्यावर जास्त रोख.

डे. स्टे. मा. : मी आताच पोर्टरला पाठवलंय, माझा निरोप देऊन. ही आताच तार मिळाली तसाच त्याला पाठवला.

गुलाम महमद : आता तार आली साहेब ! आता बघाच. या गोष्टीला चार तास झाले. गाडी इथं आली, गेली आणि तार मागाहून यावी ? साहेब, स्टेशनमास्तरला पण आपलासा केला. खूप पैसा खाल्लाय. तो सरळ बाहेर काढा —या अल्ला !

रामचरण : राम राम ! साला मिले तो उसकी हड्डी तोड दूं !

गुलाम महमद : भैयाजी, माझं रक्त कमी नाही तापलेलं. ही रेलवे, ही नोकरी हा जुलूम, आणि असला हा गैर न्याय ! अब्रू तर इथं कुणालाच राहिलेली नाही. साहेब, रोज बारा कलाकाची गुलामी केल्या-नंतर रेलवे मेहरबानी म्हणून पोट भरण्याइतकं देते. विचारु नका साहेब ! ही आमची हाडाची लाकडं जळतात या धुमाडयानं, आणि रक्त सळसळतं या वाफेनं. ही आगगाडी चाललीय. रुळाच्या फाटयावर कुटुंबासह झोकून घ्यायचं आणि गाडी अंगावरून गेली की बस्स ! आता शेवटचा हा एकच रस्ता राहिलाय. न्याय, खरेपणा, इमान, प्रामाणिकपणा सारं खोटं. हा काळा कपडा यामुळेच हे काळं मन झालंय, साहेब रेलवे—

रामचरण : अरे कही तो दिल भी नही है.

गुलाम महमद : तर हे मन नसलेले लोक काळं मन विकत घेऊन ठेवतात ना, बाबा !

डे. स्टे. मा. : (डोळयात आलेले अश्रू रुमालाने टिपीत) चला रे, चला. सकाळ झाली. तिथं पोचायला उशीर होईल—डॉक्टर आला असेल

गुलाम महमद : तुम्ही साहेब. देवमाणूस आहात. या असल्या थंडीत क्लीमेन-साठी डाक्टर उठून येईल ? खिसा भरलेला असेल. त्या भारानं त्याला उठायला व्हायचंच नाही. हं—चला, फार उशीर झाला.

(पूर्ण अंधार. केबिनच्या बाजूवरचं छप्पर आणि शिडी आत खेचून घ्यायची. मागचा काळा पडदा तसाच राहू द्यायचा. नंतर दुसऱ्या बाजूने हातात बत्त्या घेऊन हळूहळू गुलाम महमद, मास्तर आणि रामचरण येतात.)

डे. स्टे. मा. : बघा बाबांनो इथं सांभाळा, तारा आहेत. हा रस्ता कधी सुधारेल का ?

गुलाम महमद—खरं आहे साहेब. हे साहेब लोक इथून जायचे असले म्हणजे पन्नास बत्त्या नि एकदम नवा रस्ता तयार होतो—

डे. स्टे. मा. : ते बिचारे परदेशातून येतात म्हणून इथल्या रस्त्यांची त्यांना कल्पना नसते. म्हणून त्यांना सारं नवीनच हवं.

रामचरण : ये तो साला रस्ता है—

(मधोमध आल्याबरोबर समोरून बत्तीचा प्रकाश पडतो. एक जण येतो.)

गुलाम महमद : कोण आहे रे ?

कॉलबॉय : अँ···कॉलबॉय कारखान्याचा.

गुलाम महमद : कुठं गेला होतास ?

कॉलबॉय : रामचरणच्या खोलीवर—ही तार द्यायला.

रामचरण : क्या टंटा लाया हय फिर हमारे लिये ?

डे. स्टे. मा. : जा—जा, बाबा जा. मला माहीत आहे. तार दे इकडे. चलो भैयाजी. काही नाही.

(तार घेतो आणि कॉलबॉय जातो.)

रामचरण : काहेका, मौतका पैगाम हय और भी ?

डे. स्टे. मा. : अरे भाई, तासापूर्वी मला कळलंय. या मूर्खाला धीर नाही धरला, तो तिथून आला असेल. भैयाची गाय धावत्या गाडी-खाली आली त्याची तार ही.

गुलाम महमद : काय गाय कापली गेली ? कुठल्या गाडीखाली ?

डे. स्टे. मा. : स्पेशल खालीच !

रामचरण : अरे ! वो तो बाघरजी की गोआ थी !

गुलाम महमद : या एका गोष्टीवर तरी कृपा करायची होती ? या अल्ला ! या गाडीच्या आवाजात देवालाही ऐकू येत नसेल का ?

रामचरण : अरे राम ! क्या हो रहा है ये सब ?

डे. स्टे. मा. : (निश्वास सोडून) चला बाबांनो. आता आणखी काही जास्त घडलं नाही तर बरं.

(सर्व जातात.)

(काळा पडदा उचलला जातो. अथवा बाहेरचा पडदा टाकून पुन्हा लगेच उचलला तरी चालेल. परंतु या ऐवजी तिसरा प्रवेश एका या दृश्याबरोबरच ठेवावा. म्हणजे मागचा काळा पडदा उघडून. मागे तयार असलेलं शेवटचं दृश्य सादर करून नाटकाचा सरळ प्रवाह राहावा. नाटकाच्या दृष्टीनं ते ठीक होईल.)

अंक ३ रा

प्रवेश ३ रा

पात्रे

डेप्युटी स्टेशन मास्तर, गुलाम महमद, रामचरण, कॉलबॉय, रूखी, कम्पाउंडर, बाघर, एक निशाणवाला.

सकाळ झाली आहे. त्या उजेडामुळे विहीर, झापा, खोली वगैरे स्पष्ट दिसत आहे.

(चार पाच क्लीनर बाघरच्या खाटेपाशी उभे आहेत. गुलाम महमद वगैरे दाखल झाले आहेत. एकेक जण हातातील बत्ती विहिरी पाशी ठेवतो.)

डे. स्टे. मा. : काय रे, कसं आहे ? डॉक्टर नाही आले ?

एकजण : ते तर नाही आले. कम्पाउंडर आता येईल.

गुलाम महमद : पण बडया डॉक्टरांना सांगितलं होतं, खरं ना ?

एकजण : कसं सांगायचं ? उटीवलं न्हायी नोकरानं. भायीर दोन कुत्रं नि येक पठान. जागीवनार व्हतो पन कुत्र्याच्या भुकण्यानं तो कसला जागा होतोय ? त्यो बरीच घेऊन झोपला असल.

गुलाम महमद : साहेब, हे डॉक्टर आजाऱ्यासाठी नाहीत. निरोगी माणसाला

आजारी पाडण्यासाठी हे आहेत. दोन नोटा सरकावल्या की सीक सर्टिफिकेट तयार. बाकी मरायला टेकलेल्यांना बचावण्यासाठी हे नाहीत.

(रूखी खाटेजवळ डोक्याला हात लावून रडत बसली आहे.)

हे. स्टे. मा. : खाट आत जात नाही का ?

रामचरण : ये खाट कोटरीमे नही रह सकती साहब.

हे. स्टे. मा. : रूखीबाई, धीर धर. नारण नाही इथं ?

रामचरण : अरे साब, ओ डिपोटीको दुसरा कोओ मिला नही तो नारणीआ को वो मशाल लेके भेजा.

हे. स्टे. मा. : अरेरे ! त्यालासुद्धा हे काय सुचलं ? एवढया लहान मुलाला या कामासाठी नेमायचं ? साहेबाला खूष करण्यासाठी केलं असेल. पण स्पेशल जाऊन चार तास झाले. अजून कसा नाही आला ?

गुलाम महमद : हा कम्पाउंडर आला.

हे. स्टे. मा. : मी असतो तर नारणला जाऊ दिलं नसतं. अरे राम !

गुलाम महमद : खुदा हाफीज !

(कम्पाउंडर येतो.)

हे. स्टे. मा. : काय, डॉक्टर नाहीत येणार ?

कम्पाउंडर : डॉक्टर साहेब आहेत.मनाला वाटलं तर येतात, नाहीतर नाहीच येत.

हे. स्टे. मा. : ठीक आहे. तुम्ही तर तपासा.

(कम्पाउंडर तपासायला जातो.)

गुलाम महमद : आता काय झालं ?

(कॉलबॉय बत्ती हातात घेऊन येत आहे.)

कॉलबॉय परत का आला ?

कॉलबॉय : या रपोटावर बाघरजीचीसही न्हायीतर आंगठा घेयाचा हाय. मुकादमानं पाटीवलं.

रामचरण : अरे हैवानका बच्चा, तेरा रपोट ओर मुकादम जाओ जहन्नममें —खड्डे. ये क्या नफरत लगाई है ?

(चिडून त्याला मारायला धावतो.)

कॉलबॉय : अरे भैयाजी !

रामचरण : अरे हरामका बच्चा, जाता है या नही ? जान लेता है.

(कॉलबॉय पळून जातो. पळताना दिवा विझतो.)

रूखी : मी न्हायी म्हनले व्हते या कोलब्याला की ते न्हायी यायचे ? त्येना आज न्हेऊ नका रे. आनि डयुटीवर घेऊन गेले भैयाजी ऽऽऽ, भाई ऽऽऽ !

रामचरण : शांत हो बाई ! रामजी का नाम लो.

रूखी : रामाचं नाव घेयाचंच बाकी -हायलंय आज भाई. त्या मेल्या जोन्मचा मत्यानाश व्हयील. त्येनंच हे बाघरजीचं हाल केल.

डे. स्टे. मा. : शांत हो बाई, औषधानं वरं वाटेल त्याला.

रूखी : अवो मोटं साब. तुमी माजे एक आधार आहात. माजा संसार आज खलास जाला, या आगगाडीपायी. हे भगवान् ! माजा नारण अजून न्हायी आला .

(कम्पाउंडर बाघरला तपासतो. दरम्यान डेप्युटी स्टेशन मास्तर आणि गुलाम महमद बाजूला होऊन बोलू लागतात.)

डे. स्टे. मा. : गुलाम महमद, मला शंका येते. हे दुःख असह्य आहे.

गुलाम महमद : साहेब, याला काही उपाय नाही का ? या आगवाल्यावर काय गुदरलं हे ?

डे. स्टे. मा. : नाही बाबा नाही ! या बारा बारा तासाच्या नोकरीत जोपर्यंत घट होणार नाही आणि जास्त माणसं या एवढया कामासाठी ठेवणार नाहीत, तोपर्यंत आपले दिवस बदलणार नाहीत.

गुलाम महमद : हे खरं आहे साहेब, पण डोक्यावरचे हे अमलदार आपले रक्ताचे जोपर्यंत नाहीत, तोपर्यंत हा जुलूम कमी नाही होणार. त्यांना तर साहेब, पैसे कमवायचे आहेत, आपलं रक्त शोषून. माझ्यावर जर तुम्ही असता तर असा जूलूम केलाच नसता.

डें. स्टे. मा. : खरंय बाबा ! पण हिंदी माणसाला अशा नोकरीसाठी कोण ठेवतं ? आणि ज्या दोघा चौघांना घेतात, ते अगदीच फालतु असतात.

(कम्पाउंडर पुढे येऊन मास्तरशी कानगोष्टी करतो. गुलाम महमद बाघरजवळ जातो.)

बाघर : (हळू हळू) रूखी !

गुलाम महमद : रूखीबाई इथंच आहे. तुमच्याजवळ.

(रूखी त्याचं डोकं मांडीवर घेऊन बसते.)

बाघर : नारण ऽऽऽ ! —

रामचरण : अभी आता है. भाई, अभी आता होगा.

गुलाम महमद : (एका बाजूला जाऊन) अरे, हे काय आणताहेत ? (सर्वांकडे पहातो.)

डे. स्टे. मा. : भैया, इथं आण (हळूच) घे हे रुपये. बाघरसाठी काही पुण्य कर. बाघर आता घडी दोन घडीचा सोबती···

(बोलता बोलता अश्रू पुसतो.) (कम्पाउंडरला) काही होण्या-सारखं नाही का ?

कंपाउंडर : लगेच ट्रीटमेंट मिळाली असती तर बचावला असता. पण आता तर···; ह्यीच

(थोडया वेळानंतर चौघे जण—दोन निशाणवाले आणि दोन सफाईवाले मजूर—झोळी घेऊन येतात. झोळी एका बाजूला ठेवतात.)

एक निशाणवाला : राती साप चावलासा दिसतो. रुळाच्या बाजूला मुडदा पडला व्हता. म्या वळकलं त्येला. घ्येऊन आलो इथं.

रूखी : (मोठयानं किंचाळून) रे माज्या नारण्या ! म्हनलं व्हवतं नारणाला नका नेऊ, बाघरजीना नका न्हेऊ. जबर-दस्तीनं खेचून न्हेलं दोघास. अरं देवा रे ! (रडत अंग टाकते.)

डे. स्टे. मा. : (कम्पाउंडरला) बघा, काय झालं त्याला ?

(तो तपासतो.)

गुलाम महमद : मास्तर साहेब, इच्छा नसताना ही अशा प्रकारची नोकरी

अजून किती दिवस करावी लागेल ? या लोकांनी नारणला जुलूमानं ओढून नेलं. याला जबाबदार कोण ?

डे. स्टे. मा. : जबाबदार आपलं नशीब! अरे, असंच बाघरजीला सुद्धा ओढून नेलं ना ? आणि हे याचं मरण म्हणजे याचा खून म्हणता येईल का ? हे प्रभू !

कम्पाउंडर : साहेब, मी जातो. आता पहाण्यासारखं काही नाही.

(जातो)

(मास्तर, गुलाम महमद आणि भैया ताठरल्यासारखे उभे आहेत. काही वेळ शांत वाटतं. आणि एकदम मास्तर चमकून पाहू लागतात.)

डे. स्टे. मा. : हे काय आणता आता ? जे असेल ते घेऊन जा. याशिवाय दुसरा रस्ता तुम्हाला सापडत नाही का ?

रामचरण : ये तो मेरे बाघरजी की गौआ. इसपीसलसे कटा हुआ. ओ राम !

गुलाम महमद : ओ खुदा ! एवढी एक गाय होती ती पण तू कापून टाकलीस !

(निश्वास टाकतो आणि खाली बसतो.)

(पडदा पडतो)

शब्द-सृष्टी

शब्दकोष फक्त साहित्याच्या दुनियेतच असतो असं नाही. साहित्य जगतात कित्येक साहित्यकृतीनिमित्त लेखकानं वापरलेल्या अवघड शब्दांचा अर्थ देण्यात येतो. आणि कित्येक वेळा त्याच अर्थाचे सोपे शब्द मूळ कृतीत वापरले तर ती कृती जास्त चांगली होते. परंतु इथं त्याहून उलटा क्रम लागतो. साहित्याच्या क्षेत्रात तसंच तुरुंगाच्या क्षेत्रात, कारखान्याच्या क्षेत्रात, आगगाडीच्या क्षेत्रात प्रत्येकाचा खास शब्दकोष असतो. यातील कित्येक शब्दांचा उपयोग नाटकातील वातावरणासाठी आवश्यक वाटल्यामुळे तो केला आहे. आणि म्हणूनच त्या शब्दांचा विस्तृत अर्थ इथं द्यावा लागत आहे.

डरावर : ड्रायव्हर. एंजिन चालवणारा.

लाइट एंजिन : भाराशिवाय एकटं चालणारं एंजिन.

डरावरखाना : ड्रायव्हरांना रात्री रहाण्यासाठी बांधलेलं घर.

कॉलबॉय : ड्रायव्हर वगैरेंना कुणाला कुठली गाडी न्यायची आहे ते सांगायला जाणारा, त्यांना बोलावून आणणारा, रात्री उठवायला जाणारा, वगैरे कामं करणारा कारखान्याचा नोकर.

टनटेबल : टर्न टेबल. एंजिनचं तोंड एका दिशेकडून दुसऱ्या दिशेकडे फिरवणारं, गोल खड्ड्यात रूळ ठेवून त्यावरून फिरणारं टेबल.

लोको : Loco. आगगाडीच्या क्षेत्रात मुख्यत्वे दोन भाग असतात. लोको आणि ट्राफिक. त्यानंतर एंजिनिअरिंग, मेडिकल वगैरे. स्टेशन आणि त्याला पूरक अशी व्यवस्था ठेवणारं खातं. लोको म्हणजे एंजिनची साफसूफी, डागडुजी करणारं खातं.

ड्रायव्हर, आगवाला हे सारे त्या खात्याचे जंतू आहेत.

डी. टी. अस : डिस्ट्रिक्ट ट्राफिक सुपरिटेन्डेण्ट. विशिष्ट भागाच्या लोको खात्याचा अधिकारी.

डी. एल. ओ. : डिस्ट्रिक्ट लोको सुपरिटेन्डेण्ट. ट्राफिक खात्याचा अधिकारी. कित्येक ठिकाणी ही दोन्ही खाती एकाच अधिकाऱ्याकडे असतात. त्याला ट्रान्स्पोर्ट सुपरिटेन्डेण्ट म्हणतात.

एक्स्. इ. एन्. : एंजिनियरिंग खात्याचा वरचा एक्झिक्युटिव्ह एंजिनिअर.

टी. आय. : प्रवास करताना जो तिकिटं तपासायला येतो तो तिकिट इन्स्पेक्टर.

बी. आय. : पूल तपासणारा ब्रिज इन्स्पेक्टर.

सुपर हिटर : एका जातीचं चांगलं चालणारं आणि जास्त शक्तिशाली एंजिन.

कप्लिंग : दोन डब्यांना जोडणारा दुवा.

बफर : डब्याच्या मागे पुढे जो गोल धक्का लावलेला असतो तो.

डेड एण्ड : रूळमार्गाच्या पुढे जाण्याला अटकाव करण्यासाठी उंच बांध-लेला धक्का.

केबिन : खरं विचाराल तर आगगाडी क्षेत्राचं हृदय, जिथं रूळ मार्गावर सिग्नलचा सांधा जोडलेला असतो. इथल्या लिव्हरच्या खेचाखेचीत चूक झाली की गाडीचा सत्यानाश होतो. गाडीला एका रूळमार्गावरून दुसऱ्या रूळमार्गावर नेणं, गाडी उभी करणं हे सारं या लहानशा खोलीतून काम करणाऱ्या केबिन-मॅनच्या हाती असतं.

टेक सर्किट : टॅक्ट सर्किट. केबिनमध्ये विजेची करामत अशी असते की एका रुळावर एंजिन किंवा गाडी दूर उभी असली तर तिच्यासमोर जायला दुसऱ्या गाडीसाठी कोणत्याही जातीचा सिग्नल पडू शकत नाही, तो सांधा हालू शकत नाही. सुरक्षिततेसाठी असलेला उपाय.

कंट्रोल : कंट्रोल. एका मुख्य कचेरीत गावोगावच्या स्टेशन मास्तरांशी संपर्क साधण्यासाठी राखलेला टेलिफोन असतो. या ठिकाणा-हून अमुक गाडी कशी जावी आणि कोणत्या वेगानं जावी याची

सारी देखरेख आणि जबाबदारी सांभाळली जाते.

रनिंग शेड : एंजिन ठेवायचा मोठा तबेला, कारखाना.

लुप लेन : लूप लाइन. बाजूचा रूळमार्ग.

मेनलेन : मेन लाइन. मुख्य रूळमार्ग.

पाइलोट : स्पेशल जाण्यासाठी रूळमार्ग बिनधोक आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी धावणारं एंजिन. याबरोबर एखाद्या अमलदाराचं सलून असतं.

फोरमेन : रनिंग शेडचा अधिकारी.

संटर : शन्टर. स्टेशनवरील गुड्सचे डबे इथून तिथे खेचून नेणारा एंजिनवाला. फायरमॅन, नतर शटर, नंतर ड्रायव्हर अशा चढत्या पायरीनं जाता येतं.

शॉप : वर्कशॉप. जिथं एंजिनची व्यवस्था पाहिली जाते.

टेचर : स्ट्रेचर. आजारी किंवा जखमींना घेऊन जाणारी, पाय नसलेली कॉटसारखी झोळी.

धक्का : डेड एण्ड.

कोपरेटी : कोऑपरेटिव्ह सोसायटी.

Printed at Diamond Lithographers Pvt. Ltd. A-17, Phase-II, Naraina Industrial Area, New Delhi-110028